97 - 1

ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र – ज्येष्ठ १९३०
एप्रिल – जून, २००८ / खंड ३२, अंक १




- आर्थिक पत्रकारिता – एक चिंतन
- रोजगार
- केंद्र सरकारचा कर महसूल
- महाराष्ट्रातील नागरीकरण – प्रवृत्ती, कारणे, परिणाम आणि आव्हाने
- रूपयाचे अवमूल्यन व ''जे वक्र '' सिध्दांत कल्पना
- अर्थ शब्दांची वाट पाहे
- भारताचा भविष्यवेध – नव्या अर्थनीतीचा शोध – बोध

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून २००८,/खंड ३२,अंक १



**प्रमुख संपादक**
जगन्नाथ शामराव पाटील

**सहाय्यक संपादक**
संतोषकुमार बबनराव यादव

**सल्लागार मंडळ**
(२००६-०९)
अवधूत नाडकर्णी
अ.ब.देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री देवदत्त खांबेटे



**संपादकीय पत्रव्यवहार**
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी-९,
८८०/८८१, शनिवार पेठ.
सातारा. ४१५ ००२
मो.९४२२३६१७९६
फोन :(०२१६२)२३३१५२


! अ नु क्र म णि का !


* **संपादकीय**
जगन्नाथ शामराव पाटील . . . . . . . . . . . . . . . ०१

* **आर्थिक पत्रकारिता - एक चिंतन**
ज.शा.पाटील . . . . . . . . . . . . . . . ०४

* **रोजगार (भाग-३)**
शरद शंकर जोशी . . . . . . . . . . . . . . . १५

* **केंद्र सरकारचा कर महसूल**
भ. सो. म्हस्के . . . . . . . . . . . . . . . ३६

* **महाराष्ट्रातील नागरीकरण:प्रवृत्ती,कारणे,परिणाम आणि आव्हाने**
रा. सु. सोळुंके ग.बा.गावंडे . . . . . . . . . . . . . . . ४७

* **रुपयाचे अवमूल्यन व 'जे वक्र' सिध्दान्त कल्पना-एक तपासणी**
मकरंद चिकोडीकर . . . . . . . . . . . . . . . ६८

* **अर्थ शब्दांची वाट पाहे**
शि.ना.माने . . . . . . . . . . . . . . . ७८

* **भारताचा भविष्यवेध - नव्या अर्थनीतीचा शोध-बोध (ग्रंथ परीक्षण)**
सौ.जयश्री उपाध्ये . . . . . . . . . . . . . . . ८३

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ(२००८-०९)

अध्यक्ष

विनायक भगवानराव भिसे (औरंगाबाद)

कार्याध्यक्ष

ज. फा पाटील(कोल्हापूर)

कार्यवाह-खजिनदार

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक "अर्थसंवाद"

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

सदस्य

१) हिरालाल चव्हाण(जळगाव)
२) प्रशांत काटोळे (अमरावती)
३) अविनाश निकम (शहादा)
४) कृष्णराव पाटील (नागपूर)
५) सुभाष टकले (हिंगोली)
६) माधव गायकवाड (औरंगाबाद)
७) तानाजी गिते (पुणे)
८) बाळासो पाटील (सांगली)
९) बबनराव खामकर (सिंधुदूर्ग)
१०) अंभोरे एस.एस. (औरंगाबाद)
११) मोहन चौधरी (पुणे)
१२) आत्माराम पोळ

अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार

(आजीव सदस्य नोंदणी, वर्गणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह - खजिनदार - मराठी अर्थशास्त्र परिषद,

"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी ४१३ ४११. जि.सोलापूर

दूरध्वनी (०२१८४) २२४२९४ मो.९०११३३९९०६

परिषदेचे प्रमुख कार्यालय :

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.६ एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

**वर्गणी :**

| | |
|---|---|
| अ) परिषदेचे सदस्य : | |
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. १५०० |
| साधारण सदस्य | : रू.३०० (वार्षिक) |
| आ) संस्था सदस्य | |
| शैक्षणिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |
| इ) अर्थसंवाद वर्गणीदार | |
| ग्रंथालये | : रू.२५० (वार्षिक) |
| ई) अर्थवर्ष | १ एप्रिल ते ३१ मार्च |

* परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.
* कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी. संपादकांकडे पाठवू नये. रीतसर पावती कार्यवाहांमार्फतच प्राप्त होईल.

# संपादकीय

९ जानेवारी १९७७ मध्ये मराठी, अर्थशास्त्र परिषदेची स्थापना झाली. याचवर्षी 'अर्थसंवाद' मार्फत मराठी वाचकांसमोर अर्थशास्त्रीय लेख नियमितपणे त्रैमासिक रूपात प्रसिध्द करण्याचे ठरले. गेली ३१ वर्षे 'अर्थसंवाद' महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर अर्थशास्त्रीय विचार पोहचवत आहे. अर्थशास्त्रीय विचार समृध्द मराठी भाषेमध्ये प्रसारित करून अर्थसंवादने आतापर्यंत महाराष्ट्र फाऊंडेशन, न्यूयॉर्क यांचे १९९६ चे वैचारिक नियतकालिकाचे रूपये ५०,०००/- चे व १९९८-९९ चे रूपये २५,०००/- चे सिकॉम आनंद भडकमकर पारितोषिकही प्राप्त केले आहे. देशातील व राज्यातील प्रमुख आर्थिक प्रश्नांची अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना माहिती करून देण्याचे कार्य अर्थसंवाद करीत आहे. प्रचलित आर्थिक प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून मराठीतून विचार प्रस्तुत करण्याचे काम अर्थसंवाद करीत आहे. या त्रैमासिकाचे संपादकत्व आतापर्यंत सर्वश्री आनंद नाडकर्णी, भ.ग. बापट, रवींद्र दोशी आणि विनायक देशपांडे यांनी उत्कृष्टपणे पार पाडले आहे. त्यांच्या योगदानाबद्दल अर्थसंवादचा प्रमुख संपादक या नात्याने मी सर्व सभासदांच्यातर्फे त्यांचा ऋणी आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेची कार्यकारिणी व समस्त सभासद बंधूंनी एप्रिल २००८ पासून अर्थसंवादची धुरा माझ्यावर सोपविली आहे. ही जबाबदारी मी निष्ठेने व प्रामाणिकपणाने पार पाडू शकेन असा मला विश्वास वाटतो. परिषदेचे कार्याध्यक्ष गुरूवर्य ज.फा. पाटील यांच्या मार्गदर्शनामुळेच अर्थसंवादचे संपादकपद स्वीकारण्याचे धाडस मी करू शकलो. येथून पुढेही अर्थसंवादचा दर्जा आणखी वाढविण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरणार आहे. मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

आतापर्यंतच्या सर्वच संपादकांनी 'अर्थसंवाद' सामान्य वाचकांपर्यंत आणि सभासदांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. गेली ३० वर्षाहून अधिक काळ भारताच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासाबाबत

विविध प्रकारचे लेख प्रसिध्द करून अर्थसंवादने सामान्य वाचकांवर आपला ठसा उमटविला आहे. राज्याच्या विविध भागातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीशी सुसंगत असे लेख प्रसिध्द करून अर्थसंवादने सर्व भागात व स्तरात प्रवेश केला आहे.

सध्या मराठी अर्थशास्त्र परिषदेची आजीव सदस्य संख्या ११९० इतकी आहे. याशिवाय राज्यातील कांही महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये अर्थसंवाद पोहचला आहे. तथापि अर्थसंवादच्या व्यक्तीगत व संस्थात्मक वाचकांची संख्या अद्यापही वाढविण्याची गरज आहे. कारण अर्थसंवादचा छपाईचा खर्च व मिळणारे उत्पन्न यात संतुलन ठेवणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक अंकासाठी तीन जाहिराती मिळवणे आवश्यक असते. जाहिरातीद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नामुळे अर्थसंवादची तूट कमी करणे शक्य होते. तरी मी सर्व आजीव सदस्यांना, कार्यकारिणी सदस्यांना, अर्थसंवादवर प्रेम करणाऱ्या व्यक्तींना जाहिराती उलपब्ध करून देण्याविषयी आवाहन करीत आहे.जाहिरातीच्या दरपत्रकासंबंधी आवश्यक ते टिपण सर्वांच्या सोयीसाठी या अंकात पृष्ठ क्र.७५ वर छापलेले आहे. संभाव्य जाहिरातदारांचे नेमके पत्ते व संदर्भ दिल्यास आम्ही त्यांच्याशी तातडीने आवश्यक तो संपर्क साधू. सभासदांनी तसे कळवावे ही विनंती अर्थसंवाद हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रश्नांची जाणीव करून देणारे महत्त्वाचे त्रैमासिक आहे. त्यामुळे भारत व महाराष्ट्राच्या पातळीवर विविध विषयांची निर्भीडपणे वास्तववादी मांडणी करण्याचा प्रयत्न प्रत्येक संपादकाने केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेशी संबंधीत शेती व्यवसाय, साखर कारखानदारी,औद्योगिक विकास, प्रादेशिक असमतोल, दारिद्र्य निर्मूलन, नवीन आर्थिक धोरण, भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, जागतिक व्यापार संघटनांची पार्श्वभूमी, बँकिंग क्षेत्राची कामगिरी, विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादी विषयांवरील लेख प्रसिध्द केले आहेत. महाराष्ट्र पातळीवर कुपोषण, बचत गट, रोजगार हमी योजना, नागरीकरण, शेती कर्जमुक्तीचा प्रश्न, सहकारी चळवळ इत्यादी विषयांवर लेख प्रसिध्द केले आहेत. हे सर्व लेख पाठविणाऱ्या लेखकांचे अर्थसंवादच्यावतीने हार्दिक आभार. याशिवाय अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात प्रसिध्द केले जाणारे अर्थ शब्दाची वाट पाहे, ग्रंथ परीक्षण, अध्यक्षीय भाषणे व पारितोषिक प्राप्त लेख इत्यादी सदरे लोकप्रिय ठरत आहेत. अलिकडे
अर्थशास्त्राच्या अध्यापकांनी पीएच.डी. चे केलेले संशोधन सारांश रूपाने वाचकांसमोर ठेवण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री. शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३१ व्या वार्षिक अधिवेशनात कार्यकारिणी सदस्य, आजीव सभासद, कार्यवाह -खजिनदार, अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी माझी एकमताने संपादकपदी निवड केल्याबद्दल मी परिषदेचा आभारी आहे. यापूर्वीचे अर्थसंवादचे संपादक विनायक देशपांडे यांनी हे त्रैमासिक अधिक दर्जेदार बनविण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: अर्थसंवादसाठी अधिकाधिक जाहिराती मिळवून परिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न मला प्रेरणादायी ठरतील असे वाटते. श्रीयुत विनायक देशपांडे यांच्याबरोबरच श्रीयुत चारूदत्त गोखले यांचे अर्थसंवादसाठीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे हे येथे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते. अर्थसंवादच्या या वाटचालीचा हा वसा निरंतरपणे प्रगतीपथावर नेण्यासाठी यापुढील काळात मी प्रयत्नशील राहीन.

अर्थसंवादचा हा अंक साताऱ्यामधून प्रसिध्द होत आहे याचा मला आनंद वाटतो. या अंकासाठी विविध लेख पाठविणाऱ्या लेखकांचे अर्थसंवादच्यावतीने हार्दिक आभार. हा अंक प्रसिध्द करताना मला परिषदेचे कार्याध्यक्ष गुरूवर्य ज.फा. पाटील, माजी अध्यक्ष प्र.ब. कुलकर्णी, विनायक देशपांडे व चारूदत्त गोखले यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच परिषदेचे अध्यक्ष विनायक भिसे, कार्यवाह अनिल सूर्यवंशी, सहाय्यक संपादक संतोषकुमार यादव, अर्थसंवादचे सल्लागारमंडळ, जयश्री खांबेटे, अनिल वावरे, प्रभा कदम, विजयसिंह जाधव, संतोष दास्ताने, शि.ना. माने, लालासाहेब घाटगे, जयवंत जाधव यांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल मी या सर्वांचा अत्यंत आभारी आहे. अर्थसंवादच्या दर्जेदार लेखनासाठी लेखक मंडळींनी विविध आर्थिक प्रश्नाशी संबंधीत लेख पाठवून अर्थसंवादवरील लोभ वृध्दिंगत करावा ही विनंती. अंक अधिक संपन्न होण्याच्यादृष्टीने योग्य त्या सूचना सभासदांनी संपादकाच्या पत्त्यावर पाठवाव्यात. अर्थसंवादचा हा अंक छापणाऱ्या प्रतिमा ऑफसेट, इस्लामपूरचे श्रीयुत सुमंत कुलकर्णी व त्यांच्या सर्व सहकार्यांचे आभार मानून माझे हे संपादकीय विवेचन येथे संपवितो.

**जगन्नाथ शामराव पाटील**

प्रमुख संपादक – अर्थसंवाद

# आर्थिक पत्रकारिता - एक चिंतन

अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दि.२५ मे २००८ रोजी, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी (जि.सांगली) येथे दिलेल्या पत्रपंडित कै.पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यानाचा मसुदा


**प्रा.डॉ.जे.एफ. पाटील**

माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

भूतपूर्व अध्यक्ष व कार्याध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद


**अभिवादन !**

## प्रास्ताविक :

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या पत्रपंडित स्व.पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यानमालेत व्याख्यान देण्याची प्रतिष्ठेची संधी यावर्षी संयोजकांनी मला दिली याबद्दल मी स्थानिक संयोजक व परिषदेचे सर्व पदाधिकारी व सभासद यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

व्याख्यानाच्या मुख्य विवेचनाकडे वळण्यापूर्वी प्रथम मी स्व.पां.वा.गाडगीळ यांच्या पुण्यस्मृतीला अभिवादन करतो. मराठीतील आर्थिक पत्रकारितेचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख झालेला आहे.[१] पत्रपंडित म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. ''सोशॅलिझम अर्थात सुलभ समाजवाद'' (१९३८), ''फॅसिझम'' (१९३९), ''स्वातंत्र्योत्तर भारत'' (१९२५), ''शांतीदूत नेहरू'' (१९६६), ''आजचे आर्थिक संकट'' (१९७४), ''राजकीय कुरूक्षेत्र'' (१९८०) व मार्क्सचे कॅपिटल-सारग्रंथ (१ली आवृत्ती १९४१ व दुसरी आवृत्ती १९७३) ही व एकूण १७ पुस्तके त्यांच्या आर्थिक पत्रकारितेमधील कांही प्रमुख प्रकाशने आहेत. त्यांनी एक कादंबरीही लिहिली, अर्थात वृत्तपत्रातील इतर असंख्य लेख वेगळे. पां.वा.गाडगीळांच्या विचार सृष्टीचे अत्यंत समर्पक व व्यवच्छेदक विश्लेषण य.दि.फडके यांनी केले आहे.[२] पां.वा.गाडगीळांच्या एकूण लेखनाचा साक्षेपी विचार केल्यास त्यांच्यावर मार्क्स, केन्स व पं.नेहरू या तीन व्यक्तींचा दाट व खोल प्रभाव होता. मार्क्स व केन्स यांचे सर्वच अर्थशास्त्रीय विचार आहे त्या स्वरूपात त्यांना मान्य होते असे म्हणता येणार नाही. अर्थात त्यांच्या लेखनाचे सटीक परीक्षण करणे माझ्या व्याख्यानाचा

विषय नाही. पण त्यांच्या स्मृतिनिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या व्याख्यानात आर्थिक पत्रकारिता या विषयावर विस्ताराने मांडणी करणे निश्चितच समर्थनीय आहे. पां.वा. गाडगीळांचे मूल्यमापन करताना यशवंतराव चव्हाणांनी पुढील मत मांडले आहे.[१]

''समाजवादाची, राजकारणाची, अर्थशास्त्राची आणि तत्त्वज्ञानाची परिभाषा मराठीत आणण्याचे काम मोठे किचकट होते. परंतु कांही मंडळींनी हा प्रयत्न केला.

..........पां. वा. गाडगीळ हे त्यांपैकीच एक होते. मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ मोठा गुंतागुंतीचा आहे. इंग्रजीतून वाचतानासुद्धा तो लवकर समजत नाही, परंतु गाडगीळांनी तो मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. आज खेड्यातला कार्यकर्ता मार्क्सवादावर आणि समाजवादावर साध्या शेतकऱ्याला समजेल इतक्या सुरेख भाषेत व्याख्याने देत असतो. कुठून आले हे सर्व''

वृत्तपत्रीय लेखन अनेक स्वरूपे धारण करते. ताज्या चांगल्या वाईट घटनांची माहिती देणे हे वार्ताहाराचे काम. प्रचलित महत्त्वाच्या प्रश्नावर संपादकीय लिहिणे, तात्त्विक वा सैद्धांतिक भूमिका मांडणे हे संपादकाचे मुख्य कार्य व त्याचबरोबर संयोजन ही त्याची प्रशासकीय जबाबदारी. मानवी जीवनाच्या विविध अंगांची वार्ता हे वर्तमानपत्राचे मुख्य काम मानले तरी पत्रकारिता व वाङ्मय यांचा संबंध सर्वस्पर्शी आहे. विविध भाषातून महत्त्वाच्या वृत्तपत्रातून अग्रलेख, विशेष प्रासंगिक लेख, शोधनिबंध, लघू निबंध, कविता, कथा, धारावाहिक/मालिका स्वरूपातील कादंबरी, अशा प्रकारचे साहित्यिक लेखन प्रकाशित होत असते. उच्च प्रतीच्या अनेक साहित्यिकांचा साहित्य प्रवास वृत्तपत्रांच्या माध्यमातून सुरू झाल्याची उदाहरणे सर्वच भाषात मिळतात.

## पत्रकारितेची संकल्पना

वृत्तपत्रातील सर्वच लेखन पत्रकारिता म्हणता येणार नाही. अत्यंत प्राथमिक स्तरावर घटनांची सामान्याला रोचक वाटेल अशी माहिती देणे हा पत्रकारितेचा अर्थ होतो. समाजाच्या हिताच्या कमालीकरणासाठी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक अशा प्रश्नावर शास्त्रशुद्ध पण सोपे विवेचन नियमितपणे वृत्तपत्रे किंवा नियतकालिकातून व स्वतंत्र ग्रंथातून लेखी स्वरूपात करणे, हे पत्रकारितेचे परिष्कृत रूप होय. या बाबतीत माझ्या एका पूर्वीच्या लेखात पत्रकारितेची व्याख्या स्पष्ट केली आहे. संबंधित परिच्छेद याठिकाणी उद्धृत करीत आहे.

''आजच्या परिस्थितीत पत्रकारिता हा एक सन्माननीय, समाधानकारक वेतन देणारा (उत्पन्न, मानधन, इत्यादी) व कामाच्या परिस्थितीच्या बाबतीत सातत्याने आव्हाने निर्माण करणारा, गतिमानतेची अत्यंत आवश्यकता असणारा, समयसूचकता, धाडस आणि विविध विषयांचा किमान व्यासंग आवश्यक असणारा, समाजाशी, त्यातील भल्याबुऱ्या घटकांशी सतत संबंध प्रस्थापित करणारा, सातत्याने उत्तेजित ठेवणारा बौद्धिक व्यवसाय आहे. सर्वसाधारणपणे आजूबाजूला घडणाऱ्या घटना, व्यक्तिगत व सामाजिक आंतरक्रिया, कला, क्रीडा, करमणूक, राजकारण, अर्थकारण, गुन्हेगारी, अपघात, चमत्कारिक घटना, अपवादात्मक घटना,नैसर्गिक आपत्ती व त्यामुळे होणारे विध्वंस, वित्तहानी, जीवितहानी, लक्षणीय

सभासमारंभ अशा विविध क्षेत्रांतील ताज्या घटना लोकांना माहीत करून देणे हा पत्रकारितेचा सर्वप्रथम जबाबदारीचा भाग. अद्ययावत माहिती देणे हे पत्रकारितेचे प्राथमिक किंवा पायाभूत कार्य आहे. तथापि, दिलेल्या माहितीच्या पाठीमागे कारणमीमांसा, त्यातून व्यक्त होणारे अन्वयार्थ तसेच त्याच्या आधारे काही प्रमाणात भविष्याचा अंदाज वाचकाला उपलब्ध करून देणे हेदेखील पत्रकारितेचे उच्चतर स्तरावरचे अधिक महत्त्वपूर्ण कार्य मानावे लागेल. त्याच्याही पुढे जाऊन घडणाऱ्या घटना, बदलते राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि सांस्कृतिक जीवन यांवर विशिष्ट भूमिका, तत्त्वज्ञान किंवा विचारप्रणालीच्या बौद्धिक मर्यादेत, समीक्षा करणे, टीकाटिप्पणी करणे व जे घडत आहे त्यामध्ये समाजकल्याणाच्या वृद्धीसाठी आवश्यक व योग्य असे कोणते बदल करावे लागतील याचे दिग्दर्शन करणे हे पत्रकारितेचे उच्चतम पातळीवरचे कार्य मानावे लागेल. त्या दृष्टीने संपादकीय पानावर मांडला जाणारा अग्रलेख, विशेष लेख, आणि पत्रव्यवहार या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.''[४]

''स्वातंत्र्य पूर्व काळात परकीय सत्तेचा दबाव असतानाही, केसरी किंवा सुधारक ही वृत्तपत्रे टिळक व आगरकरांसारख्या ध्येयवादाने झपाटलेल्या बेडर व तेजस्वी माणसांनी चालवली. टिळक म्हणत त्याप्रमाणे गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे काढली नव्हती. कोणाचेही मिंधे न होता आणि कोणाचाही मुलाहिजा न ठेवता टिळक व आगरकर लिहीत''[५] तेजस्वीपणा निर्भीडता, मिंधेपणा टाळणे, मुलाहिजा न ठेवणे ही गुणवंत पत्रकारितेची लक्षणे मानली पाहिजेत.

### आर्थिक पत्रकारितेची पार्श्वभूमी

आर्थिक पत्रकारितेचा उद्‌गम मुख्यतः इंग्लंड मधील आर्थिक बदलाशी – शेती क्रांती, औद्योगिक क्रांती, व्यापारी क्रांती – संबंधित आहे. कालांतराने हाच प्रकार युरोप, अमेरिका व २० व्या शतकाच्या (१९व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात) प्रारंभापासून भारताच्या बाबतीतही घडत गेला. आर्थिक प्रगतीच्या विविध कारणाबरोबर तसेच घटकाबरोबर आर्थिक पत्रकारिता विकसित होत गेली. औद्योगिक/कारखानदारी वाढ, तंत्रविज्ञान, संघटन, वित्तव्यवस्था, यांच्या विकासाचे कारण व परिणाम अशा दोन्ही स्वरूपात आर्थिक पत्रकारिता लक्षात घेता येईल. दुसऱ्या महायुद्धाच्या आगीत जळीत, उध्वस्त झालेला युरोप आणि आशिया, आफ्रिका, द.अमेरिका या प्रदेशातील मागास, दरिद्री व कांही बाबतीत आतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या देशांच्या अनेक आयामी विकास प्रक्रियेबरोबर आर्थिक पत्रकारितेची गरज वाढत गेली. वाढता आंतरराष्ट्रीय व्यापारही आर्थिक पत्रकारितेच्या वाढीस कारणीभूत ठरत गेला. आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत आर्थिक गुन्हेगारीच्या वाढत्या गुंतागुंतीबरोबर आर्थिक शोधपत्रकारिता वाढू लागली. युनो, आय.एम.एफ., आय.बी.आर.डी. आय.एल.वो., जी.ए.टी.टी., अंकटॅड व तत्सम आंतरराष्ट्रीय संस्थांची प्रासंगिक प्रकाशने, नियतकालिके या मधून मोठ्या प्रमाणात आर्थिक पत्रकारिता विकसित होत गेली.

### आर्थिक पत्रकारिता – व्याख्या

आर्थिक पत्रकारिता म्हणजे आर्थिक वार्ता व त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे बदलत्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या आर्थिक प्रश्नावर लोकहिताच्या निकषावर शास्त्रशुद्ध पद्धतीने भूमिका मांडणे. मी अधिक नेमकेपणाने आर्थिक पत्रकारितेचा अर्थ

किंवा व्याख्या सुधारित स्वरूपात पुढीलप्रमाणे करेन.[६]

सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वरूपात स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सामाजिक कल्याणाच्या कमालीकरणाच्या हेतूने धोरण, निर्णय व कार्यक्रम निर्माण करण्यासाठी लोकमत तयार व्हावे यासाठी घडणाऱ्या विविध आर्थिक घटनांची अद्ययावत माहिती वाचकांना देणे, आर्थिक प्रश्नांची ओळख, गांभीर्य व व्याप्ती वाचकांना समजावून देणे, विविध आर्थिक कार्यक्रम व धोरणांच्या माहितीबरोबरच त्यावर समीक्षात्मक निर्वचनात्मक भाष्य करून आवश्यक त्या दुरूस्त्या लोक प्रतिक्रियेसाठी वृत्तपत्रे, नियतकालिके व स्वतंत्र ग्रंथाद्वारे व्यक्त करणे हा आर्थिक पत्रकारितेचा मूळ अर्थ होतो.

**व्याप्ती :**

आजची आर्थिक जीवनाची गुंतागुंत, वैविध्य व गतीमानता लक्षात घेता आर्थिक पत्रकारितेच्या व्याप्तीमध्ये पुढील घटकांचा समावेश करावा लागेल.

* अर्थशास्त्राची मूळ तत्त्वे – व्यष्टी व समष्टीच्या संदर्भात.
* शेती व संबंधित क्षेत्रे
* उद्योग व व्यापार
* आंतरराष्ट्रीय व्यापार, विनिमय दर, पैसा, पतपुरवठा व भांडवल विषयक विचार
* श्रमशक्ती व रोजगार
* सरकारचे (सर्व पातळीवरील) आर्थिक व्यवहार अर्थसंकल्प, सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज, अर्थ संकल्पीय धोरण, आर्थिक नियोजन, राष्ट्रीय उत्पन्न, खर्च,बचत,गुंतवणूक इ.
* आर्थिक प्रश्नांच्या मागील राजकारण, अर्थशास्त्रज्ञ व त्यांचे लेखन, संशोधन आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटना, आर्थिक कायदेकानून, आर्थिक तत्त्वज्ञान इ.

**प्रारंभ प्रक्रिया (Genesis)**

भारतातील आर्थिक प्रक्रियेचा ऐतिहासिक आढावा घेतल्यास कांही व्यक्ती व कांही संस्थांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. भारतात प्रसिद्ध झालेले पहिले वृत्तपत्रच अर्थविषयक होते.[७] १७८०मध्ये जेम्स हिकीने 'बंगाल गॅझेट ऑफ कलकत्ता जनरल अॅडव्हर्टायझर' हे वृत्तपत्र व्यापारी सूचना व जाहिरातीसाठी सुरू केले.मराठी माध्यमात आर्थिक पत्रकारिता तशी उशीरा सुरू झाली. पण इंग्रजीत मात्र आर्थिक पत्रकारिता कलकत्ता, मुंबई व मद्रास (चेन्नई) या औद्योगिक व्यापारी व भांडवलबाजारी शहरातून २०व्या शतकाच्या प्रारंभापासूनच जोमाने सुरू झाली. १८६८ मध्ये कलकत्त्याहून "कॅपिटल" साप्ताहिक, १९१० पासून तेथूनच 'कॉमर्स' सुरू झाले. १९२८पासून कलकत्त्याहूनच 'इंडियन फायनान्स' प्रसिद्ध होऊ लागला.१९४३पासून दिल्लीतून 'इस्टर्न इकॉनॉमिस्ट' सुरू झाला. १९६१ पासून टाईम्स गटाने मुंबईहून 'इकॉनॉमिक टाईम्स' सुरू केला. व एक्सप्रेस गटाने त्याच वर्षी तेथूनच 'फायनान्शियल एक्सप्रेस' सुरू केले. नंतरच्या काळात दैनिके व नियत कालिकांच्या माध्यमातून इंग्रजी भाषेतील, आर्थिक पत्रकारिता वाढत गेली. त्यात 'बिझीनेस टुडे', 'बिझीनेस वर्ल्ड', 'मनी', 'रूपी', 'प्रॉफिट', 'दलाल स्ट्रीट', 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली', 'कॅपिटल मार्केट', 'प्रिमियम', 'बिझीनेस स्टॅण्डर्ड', अशी नियतकालिके सुरू झाली. टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्रंट लाईन यातूनही उत्तम

आर्थिक पत्रकारिता प्रकाशित होत असते. 'पीपल्स डेमॉक्रॅसी' सारख्या नियतकालिकातून उच्च दर्जाचे संशोधन व आर्थिक लेखन केले जाते. अशाच दर्जेदार आर्थिक लेखनासाठी इपीडब्ल्यू ख्यातनाम आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवर 'इकॉनॉमिस्ट' जग - प्रसिद्ध आहे. फॉरेन अ‍ॅफेअर्स या नियतकालिकातही उत्तम आर्थिक लेखन येते. जागतिक बँकेमार्फत प्रकाशित होणाऱ्या 'फायनान्स अँड डेव्हलपमेंट' या नियतकालिकातही ताज्या आर्थिक प्रश्नावर अद्यावत सांख्यिकीच्या आधारे उत्तम आर्थिक लेखन प्रकाशित होते. मराठीत आर्थिक विषयाला पूर्णतः वाहिलेले दैनिक नाही.[६] तथापि, मराठीतून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकामध्ये मुख्यतः अर्थवेध (औरंगाबाद/त्रैमासिक), व्यापार उद्योग डेव्हलपर्स (मुंबई/त्रैमासिक), उद्योजक (औरंगाबाद/मासिक), संपदा (पुणे/मासिक), योजना (मुंबई/मासिक), सहकारी महाराष्ट्र (पुणे/मासिक), व्यापारी मित्र (पुणे/मासिक), वाणिज्य विश्व (पुणे/मासिक), व्यापार उद्योग एक्स्प्रेस (मुंबई/मासिक), ग्राहक हित (पुणे/मासिक), सहकारी जगत (पुणे/मासिक), सहकारी जीवन (मुंबई/मासिक), सहकारी विदर्भ (अमरावती/मासिक), अर्थमंथन (पुणे/पाक्षिक), बिझिनेस एक्स्प्रेस (सांगली/साप्ताहिक) देशविदेश व्यापार (पुणे/साप्ताहिक), मार्केट-अपडाऊन (पुणे/साप्ताहिक), प्रबोधन प्रकाशन ज्योती (इचलकरंजी/मासिक).

नियमित स्वरूपात (मुख्यतः त्रैमासिक) प्रकाशित होणाऱ्या संशोधनात्मक शैक्षणिक अंकामध्येही उत्तम प्रकारची आर्थिक पत्रकारिता प्रकाशित होत असते. इंडियन इकॉनॉमिक जर्नल, इंडियन लेबर जर्नल, इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यू, जर्नल ऑफ अ‍ॅग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स, दी वॉलस्ट्रीट जर्नल, फोर्बेस, अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यू, इकॉनॉमिक जर्नल, कार्टरली जर्नल ऑफ इकॉनॉमिक रिसर्च, अर्थविज्ञान, अर्थसंवाद आणि शिवार्थ ही त्यातील कांही महत्त्वाची उदाहरणे. विविध पातळीवरच्या सरकारी निमसरकारी संस्थांच्या वतीनेही कांही नियतकालिके - उदा.रिझर्व बँक ऑफ इंडिया बुलेटिन, बँकर, इकॉनॉमिक सर्व्हे, (केंद्रीय व राज्यांची) राष्ट्रीय नमूना पाहणी संस्थेचे प्रासंगिक अहवाल तसेच संयुक्त समित्यांचे अहवाल, सार्वजनिक लेखा समितीचे अहवाल - यांचाही आर्थिक पत्रकारितेला उपयोग होतो. अर्थ दैनिक जरी मराठीत नसले तरी बहुतेक प्रमुख मराठी दैनिकातून चर्चात्मक, सैद्धांतिक, धोरणात्मक स्वरूपात तसेच तपशीलवार आर्थिक माहिती देणारे लेखन प्रसिद्ध होतच राहते. मी स्वतः दै.सकाळमध्ये पावशतक केंद्रीय अर्थसंकल्पावर नियमितपणे लिहिले (अर्थसंकल्प) दै.तरूण भारतमध्ये २ $^1/_2$ वर्षे 'अर्थतरंग' हे सदर चालविले तसेच दै.लोकमतमध्ये २००२ ते २००७ अखेर "अर्थदर्शन" हे सदर चालविले. सध्या ते पाक्षिक सदराच्या स्वरूपात चालू आहे. दै.सकाळमध्ये मी "अर्थनीती" हे सदरही एक वर्ष चालविले. दै.सकाळ 'अर्थविश्व', दै.लोकसत्ता 'अर्थवृत्तांत' अशा पुरवण्या काढतात. बहुतेक सर्वच दैनिकांमध्ये किमान एक तरी पृष्ठ आर्थिक माहितीसाठी नियमितपणे देण्याची पद्धत आता रूढ झाली आहे.

## प्रकार (Forms)

आर्थिक किंवा वाणिज्यविषयक प्रकाशित होणारे लेखन कोणत्या स्वरूपाचे किती विविधतेचे असते याची जंत्री डॉ.बियाणी[७] यांनी केली आहे.

(०१) दैनंदिन बाजारभाव, (०२) बाजारभावांचे साप्ताहिक विश्लेषण, (०३) बाजारातील आवक-जावक, (०४) नव्या उत्पादनांची माहिती, (०५) लेख, (०६) बातम्या, (०७) स्तंभ/स्फूट/सदर, (०८) अहवाल, (०९) अग्रलेख, (१०) मुलाखती, (११) अर्थविषयक पुस्तकांचा टीकात्मक परिचय, (१२) करविषयक सल्ला, (१३) वाचकांच्या आर्थिक प्रश्नांना उत्तरे, (१४) प्रकल्प-प्रारूपे, (१५) चरित्रे, (१६) निवेदने, (१७) सांख्यिकी मराठी वृत्तपत्रांपैकी दै.सकाळ व दै.लोकसत्ता यांनी आर्थिक कथा हा अभिनव प्रकार सुरू केला, एक मात्र निश्चित की, मराठीमध्ये संपूर्ण, स्वतंत्र स्वरूपात अर्थ दैनिक सुरू होण्याची गरज आहे. आर्थिक माहिती, भांडवल बाजाराची माहिती, आर्थिक कायदे, सरकारच्या आर्थिक योजना / सवलती, करविषयक माहिती, पर्यटन, खाद्य उद्योग, शेती माहिती, रोजगार विषयक माहिती, परिसेवांची माहिती या सर्वच बाबींमध्ये रूची व गरज असणारा सुशिक्षित, मध्यम वर्ग, शिक्षित शेतकरी वर्ग व शिक्षित महिला यांच्या संख्येत होणारी वाढ, माध्यम प्रकारच्या सोई व वेगाने होणारे नागरीकरण या सारख्या कारणांनी स्वतंत्र, संपूर्ण मराठी अर्थ दैनिकाची गरज (इंग्रजी दैनिकांप्रमाणे) आहे हे आता मान्यच करावे लागेल.

## आर्थिक पत्रकारितेतील योगदान

स्वातंत्र्यपूर्व काळात केसरी, मराठा व सुधारक या वृत्तपत्रांनी विविध राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्नावर मोठे योगदान केले आहे. अमेरिकेतील वॉल्टर लिपमन इंग्लंडमधील रिकार्डो, केन्स, व इतर अनेक, नोबेल पारितोषिक विजेते सम्युअल्सन, फ्रीडमन, अमर्त्यसेन, व अलिकडच्या काळात नोबेल पुरस्कार प्राप्त प्रा. जोसेफ स्टिगलीटझ् यांचे आर्थिक पत्रकारितेत मोठे योगदान आहे. भारतात गिरीलाल जैन, ग.गो.जाधव, शं.दा.जावडेकर, फ्रँक मोरेस, अरूण शौरी व सध्या स्वामीनाथन अंकलेसरिया, प्रभात पटनाईक, उत्सा पटनाईक, शांताराम बापू गरूड, गोविंद तळवलकर, कुमार केतकर, माधव गडकरी, अनंतराव दीक्षित, पी.बी.पाटील यांनी विशेष लेखातून, अग्रलेखातून आर्थिक प्रश्नावर साक्षेपी लेखन केले आहे. जुन्याकाळात लोकहितवादी, लोकमान्य टिळक, गो.ग.आगरकर, प्र.के.अत्रे, महादेव गोविंद रानडे, प्रा.वि.म.दांडेकर, प्रा.धनंजयराव गाडगीळ, वि.स.पागे, यांनीही आर्थिक पत्रकारितेला भरपूर योगदान केले आहे. धरण कोठे बांधावे या प्रश्नावर स्व.राजाराम बापू पाटील, स्व.वसंतदादा पाटील या सारख्या प्रतिष्ठित राजकारण्यांनीही वृत्तपत्रात लेखन केल्याचे स्मरते. प्रारंभीच आपण पत्रपंडित पां.वा. गाडगीळांचा उल्लेख केला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात डॉ. पी.बी.कुलकर्णी, डॉ.संतोष दास्ताने, डॉ.भालचंद्र पुणेकर, डॉ.सुहास सहस्त्रबुद्धे, प्राचार्य ताम्हणकर, डॉ.दि.व्यं.जहागिरदार, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, कॉ.गोविंद पानसरे, डॉ. एन्.डी.पाटील, डॉ.विजय ककडे, इत्यादी आजही सातत्याने दर्जेदार आर्थिक पत्रकारिता करीत आहेत.

पत्रकारिता व्यवसायातील वाढती स्पर्धा, स्थानिकीकरण, या गोष्टी महत्त्वाच्या ठरत आहेत. सर्वच भाषात उत्तम आर्थिक लेखन करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. वाढत्या दरडोई उत्पन्नाबरोबर वृत्तपत्र वाचकांची संख्याही वाढत आहे. वाढते शिक्षण, वाढते शहरीकरण व राजकारणातील प्रसिद्धीची वाढती स्पर्धा यामुळेही वृत्तपत्रांची मागणी वाढत आहे. वृत्तपत्रे प्रमुख राजकीय वा औद्योगिक घराण्यांच्या मालकीची होत आहेत. वृत्तपत्रांची -

मालकी व संपादकीय लेखन, वृत्तपत्राचे धोरण या बाबतीत आता निगम व्यवस्थापन प्रगत झाले आहे. त्यात फारकत होत आहे. मुद्रित माध्यमाला दूरदर्शन माध्यमाची स्पर्धा वाढत आहे. आर्थिक प्रश्न, उत्पन्न, रोजगार, किंमती, अर्थसंकल्प इ.प्रश्नांमध्ये रस घेणारे वाचक वाढत आहेत. विद्यापीठे व महाविद्यालयातून पूर्वीच्या तुलनेने वृत्तपत्रासाठी लिहिणाऱ्या लेखकांची संख्या वाढत आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बहुतेक सर्व अध्यक्षांनी व इतर पदाधिकाऱ्यांनी मराठी आर्थिक पत्रकारितेला सातत्यपूर्ण योगदान केले आहे.

## आर्थिक पत्रकारितेची सामाजिक आवश्यकता

आर्थिक पत्रकारिता अवघड जबाबदारी आहे. आर्थिक पत्रकाराला कांही महत्त्वाच्या मर्यादा पाळून लेखन करावे लागते. माझ्या मते समाजाला हितकारक, शास्त्राच्यादृष्टीने विश्वसनीय अशी पत्रकारिता आर्थिक क्षेत्रात करण्यासाठी कांही गोष्टी काळजीपूर्वक संपादित कराव्या लागतील. सर्व प्रथम अर्थशास्त्रीय विश्लेषणाची मूलभूत पद्धत समजून घेणे, अर्थशास्त्राच्या सर्व पायाभूत संकल्पना पूर्णार्थाने समजलेल्या असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अर्थशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण झालेल्या व्यक्तीमध्येच आर्थिक पत्रकार शोधणे व विकसित करणे आवश्यक आहे. प्रभावी आर्थिक पत्रकारितेसाठी सांख्यिकीची तक्त्यात मांडणी, सोपे गणिती विश्लेषण, सुटसुटित परंतु आकर्षक चित्रांचा, आलेखांचा व आकृत्यांचा वापर करणेही आवश्यक आहे. आर्थिक पत्रकारितेसाठी मूलभूत/अंगभूत स्वरूपात सामान्य व्यवहारज्ञान असणे आवश्यक आहे. आर्थिक पत्रकाराला विशिष्ट सिद्धांत, त्याचे आग्रही व शोधक यांची चरित्रात्मक माहिती असणे रंजकता वाढविण्यास लाभदायक ठरते. त्याच बरोबर आर्थिक पत्रकाराला राजकारण, सत्तास्पर्धा, वैचारिक संप्रदाय, राजकीय पक्ष, प्रभावी नेते यांचीही माहिती आवश्यक आदान म्हणून आवश्यक असते. अद्यावत सांख्यिकी, त्याचे सर्व सरकारी व खाजगी स्रोत माहिती असणे हाही आर्थिक पत्रकारितेचा मूळ आधार आहे. आजची परिस्थिती लक्षात घेता आर्थिक पत्रकारिता आपले विशेष क्षेत्र ठरविणाऱ्या पत्रकारास संगणक, माहितीतंत्र विज्ञानाची सर्व साधने सहज वापरता यायला पाहिजेत.

## वर्तमान स्थिती

सध्याच्या झपाट्याने बदलणाऱ्या सर्वस्पर्शी परिस्थितीमध्ये, लोकशाहीचे वाढते महत्त्व लक्षात घेता, जागतिकीकरणाचा अन्वयार्थ लक्षात घेता, धोरणनिश्चिती, कार्यक्रम रचना व प्रत्यक्ष कार्यवाही यावर विविध माध्यमांचा पडणारा प्रभाव या गोष्टी लक्षात घेता आर्थिक पत्रकारितेच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

आर्थिक पत्रकाराला अमूर्त विश्लेषण, अनुभव व आकडेवारीचा वापर, त्यावर अंकगणित, बीजगणित (विशेषतः कॅल्क्यूलस/ट्रिग्नॉमेट्री) मक्झिमा/मिनिमा, संख्याशास्त्र, अर्थमीती या साधनांचा वापर करणे, तो करता येणे, आवश्यक आहे. अर्थात यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती तंत्र विज्ञानाचा प्रगत परिचय अर्थपत्रकाराला असलाच पाहिजे.

आर्थिक धोरणांचे भविष्यकालीन परिणाम काय होतील यांचा अंदाज करणं आर्थिक पत्रकारांचे

सामाजिक उत्तरदायित्व मानावे लागेल. त्या संदर्भात माझी भूमिका मी पुढीलप्रमाणे मांडली आहे.

''आर्थिक धोरणांचे भविष्यकालीन परिणाम काय होऊ शकतील, त्यामुळे होणारे आर्थिक आणि सामाजिक बदल काय असतील व त्या बदलांचा सर्वसामान्य मतदाराच्या राजकीय निर्णयप्रक्रियेवर काय परिणाम होऊ शकतो याचा शास्त्रशुद्ध अंदाज करण्याची कुवत संबंधित आर्थिक पत्रकाराकडे असणे गरजेचे आहे. अर्थात असे असण्यासाठी एका बाजूला संबंधित आर्थिक पत्रकाराला कोणत्या ना कोणत्या विचारप्रणालीची बैठक असणे जसे आवश्यक आहे, तसेच मानवी व्यवहाराच्या प्राथमिक आर्थिक प्रेरणा कोणत्या याचाही योग्य परिचय असणे गरजेचे आहे.''[१०]

आर्थिक पत्रकारावर एक मोठे सामाजिक उत्तरदायित्व असते. लोकमत घडविण्यामध्ये शास्त्रीय व विधायक आणि पारदर्शी भूमिका घेणाऱ्या आर्थिक पत्रकाराला सामाजिक मान्यता व प्रतिष्ठा मिळते. त्यादृष्टीने पुढील उद्धृत लक्षात घेणे आवश्यक आहे.

''आर्थिक पत्रकारिता करणारा एका अर्थाने लोकशाही व्यवस्थेत ज्या सार्वजनिक मताला प्रचंड मोठे महत्त्व असते, त्याची जडणघडण करण्यामध्ये भूमिका पार पाडतो. लोकमत घडविण्याची ही प्रक्रिया लोकशाही समाजव्यवस्थेत विविध माध्यमांतून प्रभावी पद्धतीने होत असते. परंतु घडलेल्या आर्थिक घटनेबद्दल, राबविलेल्या आर्थिक कार्यक्रमांबद्दल तसेच प्रस्तावित केलेल्या आर्थिक धोरण किंवा निर्णयाबद्दल सर्वसामान्य नागरिकाच्या मनात नेमकी काय प्रतिक्रिया असेल, ते समजून घेणे आर्थिक पत्रकाराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. सर्वसामान्य नागरिक, की जो आर्थिक स्वरूपात उपभोक्ता, ग्राहक, विक्रेता, मध्यस्थ, कामगार अशा विविध रूपांत त्याच्या त्याच्या आंतरिक पातळीवर निर्णय घेत असतो, अशा निर्णयाची सामाजिक व शक्य तेवढ्या प्रमाणात एकत्रित अभिव्यक्ती करण्याचे काम आर्थिक पत्रकाराला करावे लागते. म्हणूनच आर्थिक पत्रकाराची जबाबदारी महत्त्वाची ठरते.

उपरोक्त पद्धतीने लोकांचे आर्थिक मानस अभिव्यक्त करणे किंवा लोकमानस समाजहिताच्या दृष्टीने संवर्धित करणे, ही आर्थिक पत्रकाराची एक महत्त्वाची जबाबदारी असते. आर्थिक पत्रकाराने आपल्या लेखनातून, टीकाटिपणीतून जितक्या चांगल्या पद्धतीने लोकमानस व्यक्त केलेले असते, तितक्या प्रमाणात सरकारी धोरणप्रक्रियेवर वाजवी मर्यादा येतात. कार्यक्रमांची अंमलबजावणी अधिक चांगली होते आणि एकूण राज्यव्यवस्था अधिक संयत पद्धतीने कामकाज करू शकते.''[११]

## नवे आर्थिक पर्यावरण

साधारणतः १९८० नंतर आर्थिक पर्यावरणात मूलगामी बदल होण्यास प्रारंभ झाला. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणे निधी व १९९४ नंतर जागतिक व्यापार संघटना यांच्या धोरण, कार्यक्रम व वित्तीय मदत या साधनांच्या माध्यमातून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या संकल्पनांच्याद्वारे नव्या झगमगत्या स्वरूपात मुक्त,खुल्या, स्पर्धात्मक बाजार यंत्रणेवर आधारित व शासनाचा किमान हस्तक्षेप असणारी शुद्ध भांडवलशाही पुनर्प्रस्थापित होत गेली. या प्रक्रियेत आर्थिक पत्रकारितेचे महत्त्व, गरज, प्रभाव प्रचंड प्रमाणात वाढले. होत गेलेल्या

चर्चा, वाटाघाटी, मतभेद, संघर्ष यांची माहिती मुद्रित व दृष्य स्वरूपात (TV) माध्यमांनी अत्यंत झपाट्याने भराभर पसरवली. जगाच्या प्रमुख भांडवल बाजारातील (लंडन, न्यूयार्क, टोकीयो, पॅरिस, झुरीच इत्यादी) चढउतार आज सेकंदात जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याचे सामर्थ्य आर्थिक पत्रकारितेला माहिती तंत्रविज्ञान क्षेत्रातील अचंबित करणाऱ्या क्रांतीने दिले आहे. स्पर्धात्मक बाजारासाठी, सर्वत्र एकच किंमत प्रस्थापित होण्यासाठी, प्रादेशिक निकषावर गुंतवणूक कार्यक्षमतेने वाटली जाण्यासाठी अद्यावत माहिती उत्पादक-विक्रेता-ग्राहक यांना सतत उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर अलिकडच्या काळात आर्थिक पत्रकारितेला मोठे महत्त्व दिले जात आहे. मेडिटेरिअन डेव्हलपमेंट फोरमने घेतलेल्या एक कार्यशाळेत जी विषय-पत्रिका वितरित करण्यात आली त्यात आधुनिक अर्थव्यवस्थेची वाढत चाललेली गुंतागुंत, परकीय गुंतवणुकीचे प्रश्न, शासनाचे बदलते आर्थिक धोरण आणि आर्थिक वृद्धी व पर्यावरण यातील विरोध या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. म्हणजेच आर्थिक बदलांचा वेग, रचना गुंतागुंत जशी वाढत जाईल त्याचप्रमाणे आर्थिक पत्रकारिता वाढत जाते, समृद्ध होते असे मत मांडले जाते.[१२]

या बाबतीत नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ.अमर्त्य सेन यांचे मतही लक्षात घेण्यासारखे आहे.

"Dissemination of information was the key to make the planning process functional and to decentralise the economy. Several East European coun tries had also realised the need for the power flow of information from the grass roots to the apex level".[13]

आर्थिक विकासाची प्रक्रिया प्रभावी व सार्वत्रिक होण्यासाठी वाढत्या व अधिक जाणत्या लोकसहभागाची गरज असते. असा लोकसहभाग निर्माण करण्यात आर्थिक पत्रकारिता सर्वात अधिक प्रभावी कार्य करू शकते. आर्थिक पत्रकारांना यापुढे वाढत्या प्रमाणात इंग्रजी भाषेचा आधार घेवून स्थानिक भाषेत प्रचार करावा लागणार आहे. १९४५ ते १९६० हा कालखंड अमेरिकेच्या वाढत्या समृद्धीचा प्रमुख भाग मानला जातो. याच काळात अमेरिकेतील आर्थिक पत्रकारिता भरभराटीला आली.[१४] वॉल स्ट्रीट जर्नल, फोर्बेस, फॉर्च्यून, न्यूयॉर्क टाईम्समधून येणारे आर्थिक लेखन मध्यमवर्गीयांच्या नाष्ट्याचा एक भाग झाला. अशा नियतकालिकातून गालब्रेथ, सम्यूल्सनसारखे ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ स्तंभ लेखन करू लागले. याच काळात फॉर्च्यून या नियतकालिकाने 'दि परमनंट रिव्हेल्यूशन' (१९५१), 'दि चेंजिंग अमेरिकन मार्केट' (१९५४), 'दि फॅब्युलस फ्यूचर' (१९५६), आणि 'मार्केटस ऑफ दि सिक्स्टीज' (१९६०) हे चार ग्रंथ प्रकाशित केले. आर्थिक पत्रकारांसाठी मागणी वाढत गेली, त्यांची मानधने वाढली व त्यांची सामाजिक प्रतिष्ठा देखील.

भारतात देखील स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारिता प्रामुख्याने राजकीय प्रश्नांशी, पक्षांशी, स्वातंत्र्याच्या चळवळीशी एकजीव झालेली होती. काही प्रमाणात सामाजिक प्रश्नावरही पत्रकारिता प्रकाश टाकत होती. पण स्वातंत्र्यानंतर मात्र प्रामुख्याने इंग्रजी भाषेत व क्रमाक्रमाने प्रादेशिक भाषातून एकूणच पत्रकारिता वाढली पण त्याचबरोबर आर्थिक पत्रकारिता संख्यात्मक, गुणात्मक,

वारंवारिता व भाषात्मक स्वरूपात वाढत गेली. यशस्वी व कर्तबगार आर्थिक पत्रकारितेसाठी प्रतिष्ठेचे पुरस्कार स्थापित करण्यात आले. आर्थिक नियोजन, राजस्व, अर्थसंकल्प, आर्थिक धोरण, चलन व्यवस्था, विनिमय दर व परदेशी व्यापार, परकीय भांडवल, लोकसंख्येचे गतिशास्त्र, शहरीकरण, कारखानदारी, कामगार चळवळ, सहकारी चळवळ, बेरोजगारी, विषमता, दारिद्रय, इत्यादी विषय अनेक आर्थिक पत्रकार अत्यंत प्रभावीपणे हाताळू लागले. अनेक वृत्तपत्रे आर्थिक पुरवण्या नियमितपणे काढणे आवश्यक मानताहेत. त्यांना भरपूर उत्पन्न देणाऱ्या व्यावसायिक जाहिरातीही मिळतात.

## आर्थिक पत्रकारितेची नैतिक जबाबदारी

राज्य, बाजारपेठ व आरिष्ट यांच्यातील परस्पर संबंधाविषयी अनेक महत्त्वाचे प्रश्न स्वीडीश तज्ञ बो मार्टेन्सन व हकान लिडिऑफ यांनी जुलै १९९८ मध्ये एका महत्त्वपूर्ण लेखात उपस्थित केले. (State, Market and Crisis-Swedish News Journalism on the Economy)[१५] १९९० नंतर स्वीडीश अर्थव्यवस्थेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले. प्रचलित कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर त्यामुळे परिणाम होणे अपरिहार्य होते. सामाजिक कार्यासाठी स्पर्धात्मक बाजार यंत्रणा साधन म्हणून वापरता येईल का याबद्दल गांभीर्याने परीक्षण सुरू झाले. या वैचारिक, तत्त्वज्ञानात्मक बदलाचे विविध सामाजिक घटकांवर कोणते बरे वाईट आर्थिक परिणाम होतील यासंबंधी ताजी माहिती समाजाला देत राहणे ही आर्थिक पत्रकारितेची नैतिक जबाबदारी आहे, ते आर्थिक पत्रकारितेचे सामाजिक उत्तरदायित्व आहे. उपरोक्त लेखक स्टॉकहोम विद्यापीठाच्या पत्रकारिता, माध्यमे व संपर्क अधिविभागाशी संबंधित आहेत. या लेखकांच्या मते पत्रकारिता व राज्यव्यवस्था किंवा राजकारण यांच्या संबंधातील मोठा अभ्यास झाला आहे. त्या प्रमाणात पत्रकारिता व अर्थव्यवस्था, आर्थिक धोरण, आर्थिक जीवन यांच्यातील संबंधाबद्दल अभ्यास झालेला नाही. आर्थिक पत्रकारितेची समीक्षा करताना आर्थिक पत्रकारिता व प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती यांच्यातील एकात्मता, त्यांचा नेमका संदर्भ, नेमके सैद्धांतिक आधार यांचा विचार करण्याची आवश्यकता त्यांनी आग्रहपूर्वक मांडली. कारण अलीकडच्या समाजव्यवस्थेचे पूर्वी कधीही नव्हते इतक्या प्रमाणात व वेगाने आर्थिकीकरण (Economization) वाढत चालले आहे. आर्थिक व्यवस्था अनेक उपव्यवस्थांची एकात्मिक, एकसंघ रचना असते.

अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी फक्त राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनाची व्यवस्था पुरेशी ठरत नाही. त्यासाठी अनेक क्रिया, प्रतिक्रिया व काही वेळेस क्रियाशून्यताही लक्षात घ्याव्या लागतात. आर्थिक पत्रकारिता नैतिक व समृद्ध होण्यासाठी बदलती आर्थिक संस्कृतीही लक्षात घ्यावी लागते. गेल्या कांही वर्षांमध्ये (१९५० नंतर) आर्थिक व्यवस्थांचे वाढत्या प्रमाणात प्रतिकीकरण/समाजीकरण होत चालले आहे. त्यासाठी वित्तीय बाजारपेठांचे वाढत्या प्रमाणात जागतिकीकरण होत आहे. या पार्श्वभूमीवर विशुद्ध, शास्त्रीय निकषावर आर्थिक पत्रकारिता करण्याची, वाढत्या क्षमतेसाठी अर्थशास्त्राचे वाढते ज्ञान, आर्थिक विश्लेषणाची प्रगत पद्धती आत्मसात करणे आवश्यक आहे. निखळ व्यवहार ज्ञान व प्रगत अर्थशास्त्रीय विवेचन पद्धत यांचे एकात्मीकरण उत्तम आर्थिक पत्रकाराचे

व्यवच्छेदक लक्षण ठरावे. डॉ.विनायक गोविलकर[१६] यांनी आर्थिक पत्रकारिता नैतिक असण्यासाठी समाजहिताचा निकष पायाभूत मानला व आर्थिक पत्रकारिता प्रभावी, आकर्षक व दिशादर्शक असण्यासाठी वास्तव व शैली यांच्या पर्याप्त संयुगाची गरज आहे असे प्रतिपादन केले आहे. त्या संदर्भात त्यांनी उद्धृत केलेले संस्कृत सुभाषित लक्षात घेण्यासारखे आहे.

" वृन्तस्थितस्य परस्य मित्रे वरूण भास्करौ ।।
वृन्ताच्युतस्य तस्येव क्लेश दाह करावुभौ ।।"

देठाशी जोडले आहे तोपर्यंत पर्जन्य व सूर्य कमळाचे मित्र असतात, देठापासून तुटल्यास मात्र तेच सूर्य व पर्जन्य कमळाला क्लेश, दाह देतात. या ठिकाणी पत्रकारिता कमळ असल्यास समाजहित हा देठ मानावा लागतो व समाज व शासन हे मित्र मानावे लागतील. वास्तव म्हणजे सत्य व शैली याचा अर्थ, अर्थगम्य भाषा व मांडणी असा मानावा लागेल. डॉ.गोविलकरांनी आर्थिक पत्रकारिता करणाऱ्यांसाठी एक उत्तम संदर्भ दिला आहे. दुर्योधनासारखे वागू नका असे सांगतांना त्यांनी श्रीकृष्णाने जेंव्हा दुर्योधनाला सांगीतले "दुर्योधना कसे वागावे याचे शिक्षण तुला थोर गुरूकडून मिळाले आहे, तेंव्हा तू योग्य मार्गावरून क्रमण कर" तेंव्हा त्याला दुर्योधनाने दिलेले उत्तर आर्थिक पत्रकारांनी लक्षात ठेवावे व त्याचा मार्ग स्वीकारू नये.

"जानामि धर्मम् नच मे प्रवृत्ती ।
जानामि अधर्मम् नच मे निवृत्ती ।।"

सामाजिक हित (धर्म), शास्त्रशुद्ध विश्लेषण (वास्तव) व आकर्षकता (शैली) या निकषांवर आर्थिक पत्रकारिता केली जावी. माझ्या मते जबाबदार आर्थिक पत्रकारितेचे सामाजिक उत्तरदायित्व पुढील शब्दात मांडता येईल.[१७]

"अर्थव्यवस्था आणि आर्थिक धोरण व त्यांना जोडणारा आर्थिक व्यवहार याबद्दल लिहीत असताना संबंधितांनी शास्त्रीय बैठक, अद्ययावत माहिती, विश्वसनीय आकडेवारी, जबाबदार प्रतिक्रिया आणि अत्यंत काळजीपूर्वक विश्लेषण आणि समीक्षा याच मार्गाने आर्थिक पत्रकारिता केली पाहिजे. विचारप्रणाली, तत्त्वज्ञान आणि राजकीय कल यांचा प्रभाव आर्थिक पत्रकारितेत असणार, तो टाळता येणार नाही. पण या घटकांचा प्रभाव पत्रकाराने मांडलेल्या वृत्तनिवेदनातून, सामाजिक कल्याणाच्या कमालीकरणास मदत होईल, अशा प्रकारची प्रक्रिया विकसित केली जावी, तरच ती पत्रकारिता विधायक व समाजधारणेला पूरक ठरेल."

संदर्भ :

(०१) डॉ.प्रमोद बियाणी – मराठी वाणिज्य पत्रकारिता – 'मराठी पत्रकारिता : विविध पैलू – सं.रमेश नारायण वरखेडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००४.

(०२) य.दि.फडके – व्यक्ती आणि विचार, श्री.विद्या प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती– १९८५.

(०३) यशवंतराव चव्हाण, युगांतर, पृष्ठ, १७५– १७६.

(०४) प्रा.डॉ.जे.एफ्.पाटील – आर्थिक पत्रकारिता, मराठी पत्रकारिता : विविध पैलू, संपादक, रमेश नारायण वरखेडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त

विद्यापीठ, नाशिक, २००४, पृष्ठ-२०७, २०८.
(०५) य.दि.फडके-व्यक्ती व विचार - तत्रैव, पृष्ठ-४.
(०६) कित्ता - पृष्ठ, २२०.
(०७) डॉ.प्रमोद बियाणी-तत्रएव, पृष्ठ-२२२.
(०८) कित्ता - पृष्ठ २२५.
(०९) कित्ता - पृष्ठ २२४.
(१०) प्रा.डॉ.जे.एफ्.पाटील - तत्रैव - पृष्ठ-२१२.
(११) कित्ता - पृष्ठ-२१३
(१२) कित्ता - पृष्ठ-२१५
(१३) एम.एम.गोयल-एम्पॉवरमेंट ऑफ इकॉनॉमिक जर्नालिझम अजेंडा, २०००, मेडिया न्यूसेस, ३ जुलै, १९९९.
(१४) दि ग्रोथ अँड इन्फ्लूयेन्स ऑफ इकॉनॉमिक जर्नालिझम इन दि युनायटेड स्टेटस, १९४५-१९६०.
(१५) डॉ.जे.एफ्.पाटील - तत्रैव - पृष्ठ-२१७.
(१६) डॉ.विनायक गोविलकर-तत्रैव- पृष्ठ-२०३,२०४,२०६.
(१७) डॉ.जे.एफ्.पाटील-तत्रैव पृष्ठ-२१९.

## डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक

"वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या उत्कृष्ट शोध-निबंधाला प्रतिवर्षी रू.१००१/- चे डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक दिले जाते. शिवाजी कॉलेज बार्शी येथे २,३,४ नोव्हेंबर २००७ दरम्यान झालेल्या ३१ व्या वार्षिक अधिवेशनात सदर पारितोषिक श्री.एस.जी.गावडे, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या, "कायदा,बहिस्थता आणि विकास" या निबंधाला व श्री.अनिल दत्तू कोळपे यांच्या "महाराष्ट्रातील नागरीकरण कारणे स्वरूप आणि परिणाम" या निबंधाना विभागून देण्यात आले.

# रोजगार (भाग - ३)
# कायम राखता येणारा रोजगार

**शरद शंकर जोशी**

भूतपूर्व प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग

सर परशुरामभाऊ महाविद्यालय,पुणे.

कायम राखता येणाऱ्या रोजगाराबद्दल बोलावयाचे तर तशा स्वरूपाचे पूर्ण आणि सुयोग्य रोजगार विषयक प्रतिमान उपलब्ध होणे कठीण आहे. राष्ट्रीय संसाधनांच्या योग्य व न्याय्य वापराच्या दृष्टिकोनातून कोणत्याही प्रकारे व्यत्यय न येता किंवा खंड न पडता प्रदीर्घ काळपर्यंत आर्थिक वृध्दी प्रक्रिया सुरू राहाणे ज्यात अभिप्रेत आहे अशा प्रकारचे (आर्थिक वृध्दी) प्रतिमान तयार करण्याचा प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय. आर्थिक वृध्दीच्या विविध पर्यायी प्रतिमानांचे विश्लेषण करून त्यात अभिप्रेत असलेली आर्थिक वृध्दी, रोजगार निर्मिती कितपत कायम राखता येण्यासारखी किंवा टिकाऊ स्वरूपाची आहे या विषयी उहापोह येथे केलेला नाही. आदर्शाचा विचार करता, गरिबांच्या हितसंबंधांची सतत जपणूक होईल याची ग्वाही देणारा आणि कायम राखता येणारा रोजगार प्राप्त करण्याचे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न अर्थव्यवस्थेने केला पाहिजे. कदाचित महात्मा गांधींनी सूचित केलेले प्रतिमान प्रस्तुत कसोटीला उतरेल. तथापि आपण सारेजण वर्तमान काळात जगतो, व्यवहार करतो या देशात सध्या खाउजा धोरण कार्यवाहीत आहे. धीमेपणाने अणि मोठ्या कष्टाने थोडी थोडी प्रगती करणाऱ्या या देशात आर्थिक सुधारणांमुळे परिवर्तन घडून येत असून आता ही उभरती अर्थव्यवस्था नेत्रदीपक प्रगती करू लागली आहे. जलद आर्थिक विकासाबरोबर या देशात रोजगारनिर्मिती वाढली पाहिजे आणि हा रोजगार अधिक चांगल्या प्रकारचा असावयास हवा. अन्यथा, आर्थिक व सामाजिक विषमता आणखी वाढून त्यातून येणाऱ्या अनिष्ट सामाजिक

व राजकीय प्रतिक्रियांमुळे नव्या धोरणाच्या लाभांचे केवळ प्रतितोलन होईल एवढेच नव्हे तर अर्थव्यवस्थेला अनेक प्रकारे हानी पोहोचणे शक्य आहे.

भारतात सहयोगी लोकशाहीचा उत्साह सर्व पातळ्यांवर प्रत्ययास येतो. हे वास्तव लक्षात घेता कायम राखता येणारा – टिकाऊ स्वरूपाचा – रोजगार निर्माण करण्या विषयीची धोरणे आखणाऱ्यानी आर्थिक वृध्दी दर हा त्या धोरणांचा परिणाम मानला पाहिजे. म्हणजे येथे कार्यकारणसबंधांची दिशा रोजगाराभिमुख धोरणाकडून उत्पादनाकडे अशी असावयास हवी. ही दिशा नेमकी उलट (म्हणजे उत्पादनविषयक धोरणाकडून रोजगाराकडे अशी) असल्यास आणि स्थूल देशांतर्गत उत्पादन हेच ध्येय मानले गेल्यास परिणामस्वरूप रोजगार 'पूर्ण रोजगार' असेलच असे नाही. प्राप्त रोजगार पातळी पूर्ण रोजगारापासून दूर गेलेली (अवास्तव/अतिरिक्त रोजगार किंवा न्यून रोजगार दर्शविणारी) असू शकते. तसे पाहता पूर्ण रोजगाराची स्थिती कायम राखता येण्यासारखी टिकाऊ रोजगाराची –स्थिती असेलच असे नाही.

उपलब्ध रोजगराचा परिणाम म्हणून निर्माण होणारी मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेशा वस्तू आणि सेवांचे उत्पादन 'अंगीकृत प्रकल्पा – कडून केले जात असेल तर तो रोजगार कायम राखता येणारा – टिकाऊ स्वरूपाचा – होऊ शकतो.

पुनरूद्‌भवी स्थानिक गरजा रोजगार निर्मितीच्या विकेंद्रीकृत स्वरूपाच्या योजनांव्दारे भागविता येतात, त्यातून कायम राखता येणारा टिकाऊ स्वरूपाचा –रोजगार निर्माण होत राहील. स्थानिक भागात योग्य ती सार्वजनिक कामे – प्रकल्प–उपलब्ध नसतील तर ज्यात खाजगी मालकीच्या जमिनीचा वापर अभिप्रेत आहे अशा प्रकारच्या कामांसाठी – प्रकल्पांसाठी – संबंधित लाभार्थी काही प्रमाणात हातभार लावण्यास राजी असतील तर संबंधित प्रस्तावित रोजगार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री स्थानिक भागातून उभी करता येणे शक्य असते.

गेल्या सुमारे पंधरा वर्षांच्या काळात आणि विशेषत: गेल्या तीन वर्षात भारताचा स्थूल देशान्तर्गत उत्पादन वृध्दीदर वेधक होता, आणि आता तर देशान्तर्गत उत्पादनाची टक्केवारी ९.४ टक्यांवर पोहोचली. तथापि मागे म्हटल्याप्रमाणे बेरोजगार दर १९९३–९४ ते २००५ या काळात वाढल्याचे दिसते. अशा रीतीने देशातील उत्पादन वाढ 'रोजगाररहित वृध्दी' (आणि म्हणूनच 'निरुत्साही वृध्दी') ठरली. उत्पादन वाढले पण त्यामुळे बेरोजगार मात्र कमी झाला नाही. याचा एक संभाव्य खुलासा असा देता येईल की सन १९९१ पूर्वी (म्हणजे खाउजापूर्व काळात) कामगार दलात जी बेसुमार वाढ झाली होती त्याचे प्रतितोलन सन १९९१ पासून केले जाऊ लागले; ग्रामीण भागात रोजगार संधी वाढविण्यासाठी काही योजना हाती घेण्यात आल्या. उदाहणार्थ, सप्टेंबर २००१ मध्ये सुरू करण्यात आलेली संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना. ग्रामीण भागात जादा (वेतनी) रोजगार उपलब्ध करून देणे हे त्या योजनेचे उद्दिष्ट होय. अशा रीतीने ग्रामीण भागात जादा पूरक रोजगार निर्माण केला गेला, जात आहे. याचा

अर्थ ग्रामीण भागात उघडपणे दिसून येणारे वैशिष्ट्य म्हणजे 'वृध्दिरहित रोजगार'. सप्टेंबर २००५ मध्ये जाहीर झालेली आणि सप्टेंबर २००६ मध्ये कार्यवाही सुरू झालेली राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हे देखील त्याचेच एक उदाहरण होय.

शहरी भागातील 'रोजगार रहित वृध्दी' कायम राखता येणारी टिकाऊ स्वरूपाची ठरत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दुर्मिळ असलेल्या भांडवलाच्या अतिरिक्त वापरावर ही वृध्दी आधारित आहे. वाढीव (सीमान्त) भांडवल उत्पादन गुणोत्तर अतिरिक्त असून ते कायम राखले जाणे कठीण आहे. माहिती-तंत्रज्ञान आणि व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्त्रोत (बी.पी.ओ.) या क्षेत्रांचे देशान्तर्गत उत्पादनात फार मोठे योगदान आहे. हा उद्योग (सेवायोजनयोग्य) सुशिक्षितांना रोजगार पुरवितो. व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्त्रोत उद्योगात लक्षावधी पदे भरली जात असून ही रोजगार निर्मिती वाढत आहे. तथापि, देशातील एकूण रोजगारात ह्या उद्योगातील रोजगाराचे प्रमाण १ टक्के पेक्षाही कमी आहे. दुसरे असे की, रोजगार निर्मितीचा हा स्त्रोत विश्वसनीय नाही. तो या अर्थाने की ज्या अन्य देशात श्रम सापेक्षतेने अधिक स्वस्त आहेत आणि तंत्रशास्त्रीय शिक्षण, सेवा-सुविधा वाढत आहेत, अशा स्पर्धक देशांकडे अशा प्रकारच्या रोजगाराचा बराचसा भाग-या उद्योगातील बऱ्याचशा नोकऱ्या सहज जाऊ शकतात. फिलिपाइन्स, व्हिएतनाम इत्यादी देशांशी अमेरिकेने विशेष संबंध प्रस्थापित केले आहेत. या देशांकडून कडवी स्पर्धा संभवते.

भारतातील व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्त्रोत उद्योगाला हे आव्हान आहे. तसेच बांग्लादेश, श्रीलंका यासारख्या नवोदित देशात इंग्रजीवर भर दिला जात आहे, शिवाय तेथे अधिक स्वस्त श्रम उपलब्ध आहेत.

भारतात श्रम हा उत्पादन घटक विपुल संख्येने आणि स्वस्त दरात उपलब्ध असल्याने माहिती-तंत्रज्ञान वगैरे उद्योगांच्या बाबतीत भारत देश म्हणजे जगाचे मागील दारचे कार्यालय झाले आहे. श्रम मूल्यान्तर पणनाचे हे तर्कशास्त्र कारखानदारी उद्योगालादेखील लागू पडते. श्रमखर्चाच्या ओझ्याखाली दबलेल्या विकसित देशातील कारखानदारी कंपन्यांना आपला व्यवसाय भारताकडे स्थलान्तरित करणे आवडेल. त्या परिस्थितीत भारतातील सुशिक्षित बेकारीची तीव्रता कमी होऊ शकते. तथापि ही उकल कितपत टिकाऊ स्वरूपाची राहील, याविषयी शंकाच आहे. याचे कारण असे की, व्हिएतनामसारखे अल्पश्रमखर्च देश भारताशी परिणामकारकरितीने स्पर्धा करणे शक्य आहे. प्रगत देशातील कारखानदारी व्यवसाय भारताचे स्पर्धक देश आपल्याकडे आकृष्ट करून घेऊन उपलब्ध संधीचा पुरेपूर लाभ उठवू शकतात.

रोजगार हमी योजनेद्वारे उपलब्ध होणारा रोजगार कितपत 'कायम राखता येणारा' रोजगार ठरतो?

राष्ट्रीय ग्रामीण रो.ह.यो.च्या बाबतीत एक महत्त्वाचा मुद्दा असा की ही योजना रोजगारनिर्मितीवर भर देते, ज्या प्रकल्पांची परिणती रोजगार निर्मितीत होऊ शकते अशा प्रकल्पांवर नव्हे. प्रस्तुत योजनेत बेरोजगारीविरूध्द

झगडा किंवा बेरोजगाराचे उच्चाटन करण्याची चळवळ केंद्रस्थानी राहते. येथे रोजगाराची उत्पन्न बाजू आणि स्वत: विषयीचे चांगले मत(स्वाभिमान) या गोष्टी अधोरेखित होतात. बांधकाम, रस्ते , सिंचन प्रकल्प, लोहमार्ग, लघुउद्योग इत्यादी प्रकल्पही सुरू करण्यामुळे घडून येणारा एक परिणाम म्हणून रोजगारनिर्मिती होते. तथापि, ग्रारोहयोद्वारे निर्माण केला जाणारा रोजगार, उपलब्ध करून दिला जाणारा कामधंदा वेगळ्या प्रकारचा ठरतो तो या अर्थाने की त्यातून वेतनी रोजगारनिर्मितीद्वारे चरितार्थ उपलब्ध होतो, चरितार्थाची सुरक्षितता लाभते. एका अर्थाने अशा योजना केन्सप्रणीत योजनेसारख्या आहेत. 'खड्डा खणून तो भरा' हा दृष्टिकोन तात्पुरत्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी उपयुक्त ठरणारा, वेळ मारून नेणारा उपाय ठरतो. ग्रारोहयो म्हणजे दीर्घकालीन टिकाऊ विकासाचा-कायम राखता येणाऱ्या विकासाचा प्रयत्न खचितच म्हणता येणार नाही. प्रामुख्याने उत्पन्न दृष्टिकोनावर लक्ष केंद्रित करणाऱ्या या योजना म्हणजे कायम राखता येणाऱ्या रोजगाराचे प्रतिमान नव्हे.

ऊर्जेचे पर्यावरण-हितकारी आणि नवीकरण सुलभ स्रोत वापरून लोकांच्या अग्रक्रमाच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक त्या सेवा उपलब्ध करून देणाऱ्या मत्ता निर्माण करणे हा कायम राखता येण्यासारख्या रोजगाराचा हेतू असतो. कायम राखता येणाऱ्या रोजगाराच्या निर्मितीची सुसाध्यता स्पष्ट करणारी अनेक उदाहरणे येथे देता येतील. लक्षावधी खेड्यांची किंवा लहान गावांची सौर ऊर्जेची गरज भागविण्यासाठी वीजनिर्मितीकरिता किंवा सौरऊर्जा निर्मितीसाठी प्रदीर्घ काळपर्यंत कायम राखता येणाऱ्या रोजगाराचे प्रतिमान येथे वानगीदाखल विचारात घेता येईल. अशा ऊर्जेचा स्थानिक वापर अपुरा असेल तर जवळपासच्या ठिकाणांकडे त्या ऊर्जेचे पारेषण करता येते. लहान गावांच्या गटासाठी सार्वजनिक वाहतूक गरजेची असते. अशी सेवा पुरविण्याचे काम स्थानिक भागातील कुटुंबे करू शकतात. अशा उपक्रमाला करविषयक सवलती देऊन शासन हातभार लावू शकते.

रोजगाररहित वृध्दी जितकी अडचणीची तितकाच वृध्दिरहित रोजगार अवघड(प्रश्नात्मक) परिस्थितीला कारणीभूत ठरतो. रोजगाररहित वृध्दीत नोकरकपात, भांडवलसघन आधुनिक तंत्र, श्रमसघन वस्तूंचे दूरीकरण इत्यादी वैशिष्ट्ये दिसतात.वृध्दिरहित रोजगार म्हणजे ग्रा.रो.ह.यो. सारख्या उत्पन्न--केंद्रित रोजगारनिर्मितीची योजना. देशाला सध्या जी गरज आहे ती रोजगार निर्मितीबरोबर वृध्दीची, वृध्दी आणि रोजगार या दोहोंची. ती गरज पूर्ण होण्याने रोजगाररहित वृध्दी आणि वृध्दिरहित रोजगार या दोहोंच्या संदर्भातील अडचणी दूर होतील. कायम राखता येणारी रोजगारनिर्मिती शक्य झाली तर ते योग्य दिशेने उचललेले पाऊल ठरेल अशा प्रकल्पाच्या रोजगाराचा प्रकल्प मत्तानिर्मिती आणि त्यावर अवलंबून असणारे लोक या दोहोंना आकार देतो.

सजग राहून वाटचाल करावयाची तर वास्तव नीट लक्षात घेऊन अनेकविध जादा रोजगारसंधीची निर्मिती आणि श्रमिकांना शिक्षण,

प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या अंगी असणारी कौशल्ये वाढीस लावणे गरजेचे आहे. भारताच्या लोकसंख्येतील वाढ आणि कामगार दलातील संभाव्य वाढ लक्षात घेता प्रतिवर्षी १५ दशलक्ष नव्या रोजगार संधी (नव्या नोकऱ्या) निर्माण कराव्या लागतील.[११] शासनाचा १० दशलक्ष नव्या रोजगारनिर्मितीच्या अंदाज प्रत्यक्षातील परिस्थितीच्या दृष्टीने न्यून ठरतो. भारतातील युवा शक्ती साऱ्या जगात मोठी असून सन २०२० मध्ये या देशातील कामगार दल ७१६ दशलक्ष असेल. अशा परिस्थितीत जादा रोजगार संधी निर्माण केल्या नाहीत तर ३० टक्के लोक विनारोजगार असतील. भारतातील तरूण श्रमदलाला कामधंदा उपलब्ध करून देण्याचे महत्त्व लक्षात घेता या देशाला दीर्घकालीन रोजगारविषयक धोरणाची तातडीची गरज असल्याचे ताज्या अहवालांवरून स्पष्ट होते.

## ८. रोजगारासहित वृध्दी

मागे म्हटल्याप्रमाणे नजीकच्या काळात रोजगाराविना लोकांपैकी ८५ टक्के ते ९० टक्के लोक १५ वर्षे ते २९ वर्षेया गटातील असतील आणि त्यामुळे सामाजिक सुरक्षा प्रश्न उठण्याचे भय संभवते. ते टाळण्यासाठी रोजगार निर्मितीला अग्रक्रम देणे गरजेचे ठरते. देशान्तर्गत उत्पादनवृध्दीचा दर उंचावण्याबरोबरच रोजगारनिर्मितीचा दरदेखील अधिक वेगाने वाढला पाहिजे. आर्थिक वृध्दिदरातील वाढ आवश्यक असली तरी पुरेशी ठरत नाही. आर्थिक वृध्दीचा रोजगारआशय महत्त्वाचा असल्याने त्यावर धोरणकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे.

व्यापक बेरोजगाराचा प्रश्न विचारात घेता त्यावर तोडगा म्हणून संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीनी पाहता दोन आघाड्या सांभाळावयास हव्यात. एक तर रोजगार मोठ्या संख्येने निर्माण व्हावयास पाहिजे आणि दुसरे म्हणजे रोजगार योग्य स्वरूपाचा राहील, याकडे लक्ष द्यावयास हवे. वाढता श्रमपुरवठा सामावून घेतला जाण्यासाठी, रोजगार संधी अधिक संख्येने उपलब्ध होण्यासाठी आर्थिक वृध्दीचा रोजगार आशय वाढला पाहिजे एवढेच नव्हे तर तो रोजगार लोकांना सर्वसाधारणपणे मानवेल(नोकऱ्या सुखाच्या राहतील) हेही पाहिले पाहिजे.

माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्रोत, अध:संरचना हे उद्योग वेधक वेगाने विस्तारत आहेत. या क्षेत्रातील गुंतवणूक वाढली पाहिजे, यात शंकाच नाही. तथापि,त्याचबरोबर शेती, कृषि उद्योग, अनौपचारिक व्यवसाय क्षेत्र, असंघटित किरकोळ व्यवसाय इत्यादी उद्योग बहुतांश श्रमदलाला रोजगार पुरवितात. म्हणून या उद्योगांकडे विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. या उद्योग व्यवसायांचे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न अग्रक्रमाने करावयास हवा.

व्यक्तीला कामाचा अनुभव असेल तर नव्या रोजगारसंधी मिळण्याचा संभव निश्चितच वाढतो. प्रत्यक्षात अशा अनुभवी लोकांना उत्तम प्रतीचा रोजगार लाभतो. निरनिराळ्या क्षेत्रातील असा थरारून सोडणारा अनुभव शिकाऊ उमेदवारांच्या दृष्टीने मोठा प्रेरक असतो. म्हणूनच कामाचा अनुभव मिळविण्यासाठी काही कंपन्यांमध्ये केवळ उमेदवारी करण्याची देखील

लोकांची तयारी असते. युवा पिढीच्या दृष्टीने स्वयंरोजगार हेही क्षेत्र असे आहे की ज्यामुळे त्यांचे सामर्थ्य वाढेल. स्वयंरोजगाराला उत्तेजन मिळण्यासाठी व्यष्टीय वित्तपुरवठा वाढविला जावा. अशा वित्तपुरवठ्यामुळे तरूणांना लहान व्यवसाय सुरू करण्यास मदत होईल.

बेकार व्यक्तींना आपल्या उद्योग व्यवसायात सामावून घेण्याची संघटित क्षेत्राची क्षमता अत्यंत मर्यादित आहे. भारतातील एकूण सुमारे ४०२ दशलक्ष कामगार दलात संघटित क्षेत्राचा हिस्सा सुमारे ७ टक्के असून त्यांच्या बाबतीत कामगार कायद्यातील तरतुदींची ताठरता हे वैशिष्ट्य आढळते. असंघटित क्षेत्रातील कामगार बहुतेक कामगार कायद्यांच्या कक्षेबाहेर राहतात. हे असंघटित क्षेत्रच बहुसंख्य श्रमिकांना रोजगार पुरविते. हे क्षेत्र सापेक्षतेने अधिक लवचिक स्वरूपाचे राहते. अर्थात, या क्षेत्रातील कित्येक कामगारांना फार कमी सामाजिक सुरक्षा मिळते, किंवा काहींना तर कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा मिळत नाही, असाही त्या लवचिकतेचा अर्थ केला जातो. अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देण्यासाठी असंघटित क्षेत्रविषयक राष्ट्रीय आयोगाने सुचविलेले उपाय प्रत्यक्षात योजिले गेले तर त्या रोजगाराचे स्वरूप कामगारांना मानवणारे होऊ शकेल. रोजगार वाढविण्याबरोबरच रोजगाराची ही बाजू देखील उंचावणे महत्त्वाचे ठरते.

बेरोजगारांचा प्रश्न सोडविला जाण्यासाठी देशान्तर्गत उत्पादनाचा पाया रूंदावला गेला पाहिजे आणि त्यात बहुजन उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एकूण रोजगार वाढविताना रोजगारातील ही वाढ केवळ उत्पन्न दृष्टिकोनावर केंद्रित होता कामा नये वाढत्या रोजगारातून येणारे वाढते उत्पन्न प्रामुख्याने ज्यावर खर्च होऊ शकते त्या बहुजन उपभोगाच्या वस्तूंचे उत्पादन केले गेले पाहिजे. ग्रामीण भागातील लोकांना पुरेशी खरेदी शक्ती उपलब्ध होऊ शकेल असा रोजगार निर्माण केला तर ग्रामीण बाजारांचे सामर्थ्य वाढेल. त्याचबरोबर बहुजन उपभोगाच्या वस्तूंचे उत्पादन ज्यायोगे वाढू शकेल अशा योजना तयार असल्या पाहिजेत, राबविल्या गेल्या पाहिजेत. अशा रितीने वृध्दिरहित रोजगाराला म्हणजेच केवळ उत्पन्नलक्षी रोजगाराबरोबर उत्पादनलक्ष्यी रोजगारदेखील वाढविल्यासारखे होईल.

रोजगार निर्मितीला खुद्द शेती क्षेत्रात फारसा वाव नाही. उलट, कृषि उद्योग, जैव ऊर्जा यासारख्या ग्रामीण रोजगाराच्या अन्य क्षेत्रांकडे शेतमजूर वळविले गेले पाहिजेत. पाणलोट क्षेत्र विकास, विहीरी खणणे, ठिबक सिंचन प्रकल्प उभारणी इत्यादी अध:संरचना विकसित करण्यामुळे शेती व्यवसायाला निश्चयाने उभारी येईल. शेतमालाची नासाडी कमी करण्यासाठी कोठार-बांधणी(गोदाम व्यवस्था), ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे पसरणे आणि वाहतुकीच्या अन्य साधनांचा विकास इत्यादी कामे हाती घेतल्यास रोजगार निर्मितीला गती प्राप्त होईल. वस्तुत: गृहनिर्माण आणि वाहतूक विकास इत्यादींचे रोजगार निर्मिती सामर्थ्य मोठे आहे. या क्षेत्रात केवळ सुशिक्षित, कसबी व्यक्तींनाच रोजगार मिळतो, असे नव्हे तर

अशिक्षित,लोकांनादेखील काम मिळू शकते. अशा विकास प्रकल्पांकरिता वित्तपुरवठा केला जाण्यासाठी अध:संरचना रोखे विक्रीला काढता येतील किंवा अर्थव्यवस्थेतील काळा पैसा अशा विकास प्रकल्पांकडे वळविला जाण्यासाठी विशेष उपाय योजता येतील.

### अवेतनी रोजगार

निरनिराळ्या क्षेत्रातील वेतनी रोजगार वाढविण्यासाठी कोणते धोरणात्मक उपाय योजता येतील हे उपरोक्त प्रस्ताव दर्शवितात. त्याचप्रमाणे सहकारी संस्थांच्या क्षेत्रात रोजगार वाढविता येणे शक्य आहे;पण हा रोजगार अवेतनी स्वरूपाचा असा अवेतनी रोजगार कसा लाभदायक ठरतो हे यापूर्वीच, स्पष्ट केले आहे. बेरोजगाराचा अनुशेष आणि बेरोजगारातील सध्याची वाढ लक्षात घेता, रोजगार निर्मितीच्या उपरोक्त उपायांखेरीज पूरक उपाय म्हणून अवेतनी रोजगार निर्मितीकडे पाहता येईल. जे प्रकल्प साधारणत: वेतनी रोजगार निर्माण करतात त्यांच्या बाबतीत भ्रष्टाचारासारख्या अनिष्ट प्रवृत्ती आढळतात. अवेतनी रोजगाराच्या बाबतीत तसे नाही;किंवा तशा प्रवृत्तींचा प्रभाव नगण्य राहील. सरकारी खात्यातील नोकर कपातीच्या परिस्थितीला तोंड देऊन त्यावर मात करण्याची कुवत सहकारी क्षेत्राचे ठायी निश्चयाचे आहे.

## ९. कामगार कायदे

या देशातील श्रमबाजारांच्या बाबतीत अनेक स्थित्यंतरे अनुभवण्यात आलेली आहेत. वसाहतींच्या काळात निर्हस्तक्षेपाचे धोरण अवलंबिले जात होते. त्या काळात औद्योगिक संबंधांच्या बाबतीत निवडक (गुणात्मक) हस्तक्षेप केला जात असे. गेल्या शतकाच्या मध्याला या देशात नियोजन पर्व सुरू झाले. त्या काळात कल्याणकारी राज्याच्या चौकटीत कामगार संघ वादाची जोमदार वाढ होऊन कामगार चळवळ चांगलीच फोफावली. त्याशिवाय नियोजनातून पुढे आलेले परवाना राज आणि तत्सम अन्य बदल तसेच काही अपप्रवृत्ती इत्यादींच्या संकलित अनिष्ट परिणामामुळे अर्थव्यवस्थेवर अरिष्ट ओढवले. त्यावर उपाय म्हणून सन १९९१ पासून खाउजा धोरणाचा अनुनय सुरू झाला.

गेल्या सुमारे पंधरा वर्षांच्या काळात विनियमन, खासगीकरण यावर भर देत आर्थिक सुधारणा केंद्रस्थानी ठेवण्यात आल्या आहेत. या सुधारणा जुन्या कामगार कायद्यात बदल करण्यास अद्याप धजल्या नाहीत. याचे कारण स्पष्टच आहे. कामगार सुधारणा हा विषय म्हणजे राजकीयदृष्ट्या एक नाजुक बाब होय. एकूण (४० कोटी) कामगार सहभागाचा विचार करता संघटित क्षेत्रातील रोजगार सुमारे ७ टक्के (३ कोटी) असून ही अल्पसंख्या असली तरी वर्चस्वी, प्रभावी आणि आवाजी असल्याने, बदलत्या परिस्थितीनुसार कामगार कायद्यात बदल करण्याच्या प्रयत्नांना विद्यमान कामगार संघटना कसून विरोध करीत आहेत. अशा विरोधामुळे असंघटित कामगार वर्गाचे हितसंबंध कसे धोक्यात येत आहेत, याचा क्वचितच कधी विचार केला जातो.

विद्यमान कामगार कायद्यातील वैशिष्ट्यपूर्ण तरतुदींमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील स्पर्धा सामर्थ्य अपेक्षेइतके

वाढू शकले नाही. विशेषत: असंघटित कामगारांबाबबत बोलायचे तर सामाजिक सुरक्षा जाळे या देशात अभावानेच आढळते. स्थूल देशान्तर्गत उत्पादन वाढीच्या बाबतीत या देशाने समाधानकारक प्रगती दाखविली असली तरी वाढत्या बेरोजगाराचा प्रश्न म्हणजे सज्जड आव्हानच आहे. त्याचा एक परिणाम म्हणजे प्रचलीत आर्थिक सुधारणांना सामाजिक, राजकीय पाठींबा पुरेशा प्रमाणात मिळालेला नाही.

वस्तुत: सन १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांशी जुळणाऱ्या कामगार सुधारणा नितान्त गरजेच्या आहेत. जानेवारी १९९९ मध्ये स्थापन करण्यात आलेली 'मॉंटेक सिंग अहलुवालिया समिती', 'रोजगारसंधी विषयक नियुक्त कार्यदल', ऑक्टोबर १९९९ मध्ये रवींद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेला 'द्वितीय राष्ट्रीय कामगार आयोग' आणि सप्टेंबर २००१ ची एस.पी. गुप्ता समिती 'दहाव्या योजना काळात प्रतिवर्षी दहा दशलक्ष रोजगार संधीचे लक्ष्य गाठण्याच्यादृष्टीने नेमलेला विशेष अभ्यास गट'– या सर्वांनी मांडलेल्या युक्तीवादात आढळणारा महत्त्वाचा धागा असा की भारतातील कामगार कायदे कालबाह्य झाले असून आर्थिक सुधारणांशी सुसंगत ठरतील अशा रितीने ते विनाविलंब बदलले पाहिजेत. तथापि उपरोक्त समितीच्या, आयोगाच्या अभ्यासगटाच्या अहवालातील सूचनांकडे शासनाने लक्ष दिलेले नाही, लक्ष देता येणे शासनाला शक्य झालेले नाही.

आर्थिक वृध्दी साधताना रोजगार निर्मितीदेखील वाढविण्याचे आव्हान भारतीय अर्थ व्यवस्थेपुढे आहे. अहलुवालिया समितीच्या मते, ''मुख्य संदेश असा की देशातील एकूण रोजगारविषयक प्रश्न केवळ आर्थिक वृध्दी प्रक्रियेची गती वाढवूनच सोडविता येईल. वृध्दिप्रक्रिया अधिक गतिमान केल्यास श्रमांकरिता जादा मागणी निर्माण होऊ शकेल. रोजगाराच्या गुणवत्तेत आवश्यक ती सुधारणा साध्य केली जाण्यासाठी श्रमाच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणता येणे देखील त्यामुळे शक्य होईल.'' या समितीने असे सुचविले आहे की कामगार सुधारणा प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या अंगांनी केल्या जाव्यात. एक तर कामगारांना कमी करण्याचे आणि खर्चात कपात करण्याचे स्वातंत्र्य कंपन्यांना दिले गेले पाहिजे. दुसरे असे की कामगारांना हंगामी रोजगार करारानुसार (कंत्राटानुसार) कामावर घेण्याची परवानगी कंपन्यांना दिली जावी.

द्वितीय राष्ट्रीय कामगार–आयोगाने असा निष्कर्ष काढला की प्रचलीत कामगार कायदे पध्दती अत्यंत निर्बंधात्मक असून सन १९९१ नंतर उद्योग व्यवसाय क्षेत्रात उद्‌भवलेल्या परिस्थितीच्या संदर्भात ही पध्दती शिथील केली गेली पाहिजे. त्या आयोगाने काही पायाभूत बदलांची शिफारस केली. उदाहरणार्थ सर्व कामगार सामाजिक सुरक्षा कक्षेत आणले जावेत. पाणी पुरवठा, वैद्यकीय सेवा इत्यादी सामाजिक दृष्टचा अत्यावश्यक (जीवनावश्यक) सेवा व्यवसाय क्षेत्रात संपांवर बंदी घातली जावी. कंपनी (उत्पादन संस्था) बंद करण्याचे किंवा संबंधित कामगारांना भरपाई देऊन त्या कामगारांना काढून टाकण्याचे स्वातंत्र्य मालकाला मिळालेच पाहिजे. कामगारांना पूर्वसूचना

आणि नुकसानभरपाई मिळत असल्यास अपरिहार्य कामबंदी आणि नोकरकपातीसाठी शासनाची पूर्वपरवानगी मिळविण्याची आवश्यकता जरूरीची नसावी. कामगार वाद मिटविले जावेत ते लवादामार्फत, अभिनिर्णयाद्वारे किंवा शासकीय हस्तक्षेपाच्या मार्गाने नव्हे, तात्पुरत्या आणि हंगामी कामांसाठी कंत्राटी कामगार पध्दतीला परवानगी दिली जावी, केंद्रस्थानी असणाऱ्या (मुख्य भाग मानल्या जाणाऱ्या) उत्पादनासाठी किंवा सेवांसाठी आणि प्रक्रियांकरिता नव्हे. जातीत जास्त दोन वर्षेमुदतीच्या कंत्राटांसाठी कंत्राटी-कामगार पध्दतीला परवानगी दिली जावी.

असंघटित क्षेत्रातील रोजगार वृध्दीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या गुप्ता समितीने असे सुचविले आहे की, सर्वसाधारणपणे श्रमसधन आणि भांडवल बचतीच्या तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि विशेषत: असंघटित क्षेत्राच्या वृध्दीचा कायाकल्प घडवून आणणे, जेणेकरून ते क्षेत्र टवटवीत होईल असे प्रयत्न करणे- ही भविष्यासाठी रोजगार पटनीती रहावी. असंघटित क्षेत्राची उत्पादकता वाढविली जाणे गरजेचे आहे. जागतिक व्यापार संघटनेचे नियम आणि भारतातील आर्थिक सुधारणा यांच्याशी जुळणाऱ्या कार्यक्रमांची आणि धोरणांची योग्य निवड करून त्यायोगे देशान्तर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील स्पर्धेत असंघटित क्षेत्राचा टिकाव लागण्यासाठी हे क्षेत्र अधिक उत्पादक होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले पाहिजेत. सामाजिक वनीकरण, पशुपालन (पशुसंवर्धन) मच्छिमारी, उद्यानविद्या व संबंधित व्यवसाय, तसेच लघुउद्योग, मध्यम उद्योग, बांधकाम आणि पर्यटन अशा असंघटित क्षेत्रांचा विकास घडवून आणण्याच्या गरजेकडे समितीने लक्ष वेधून घेतले आहे.

देशात शेकडो नव्हे हजारो कायदेशीर संविधी प्रचलित आहेत, त्यात केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारांचे कायदे आहेतच. अशा विद्यमान कायदेशीर विनियामक संरचनेने देशातील कामगारदलाला क्वचितच कधी मदत केलेली आहे. कामगार आणि रोजगार याविषयी तज्ज्ञ समित्यांनी शासनाकडे अहवाल सादर केलेले असूनही कामगार आघाडीवरील नैराश्यमय वातावरण बदलण्यासाठी आणि या आघाडीला यथायोग्य मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने कोणतेही महत्त्वाचे प्रयत्न आस्थापूर्वक केलेले नाहीत. म्हणूनच कामगारविषयक कायद्यांच्या क्षेत्रात उपरोक्त दिशानिदेशनानुसार मूलगामी कृतीची गरज आहे.

निर्वाह निधी, फार पूर्वीपासून चालत आलेली निवृत्तीवेतन योजना इत्यादींमुळे तिजोरीवर पडणारा सतत वाढता बोजा लक्षात घेऊन त्या योजनांचा फेरविचार करणे अत्यावश्यक आहे. अशा योजनांविषयीच्या कायदेशीर तरतुदी किंवा तत्सम कामगाराविषयक धोरणांचा बारकाईने अभ्यास करून प्राप्त परिस्थितीत त्यात कोणते बदल करता येतील हे पाहिले पाहिजे. निवृत्ती वेतन योजने सारख्या योजनांची रीतसर अंमल बजावणी करणे शासनाच्या देखील कुवती बाहेर असल्याने अशा प्रकारच्या कायद्यांचा फेरविचार करणे आवश्यक ठरेल. वादग्रस्त निर्गमन धोरण विषयक मुद्दा कामगार-सुधारणा कार्यसूचीत समाविष्ट न करणे सोईचे ठरेल, तो मुद्दा खुबीने वगळला जावा.

ज्या उत्पादन संस्थांमध्ये १०० पेक्षा

अधिक कामगार कामावर असतील अशा उत्पादन संस्थांनी कामबंदी जाहीर करण्यापूर्वी शासनाची परवानगी घेतली पाहिजे. अशा प्रकारच्या तरतुदीमुळे श्रमबाजार अधिक ताठर (अलवचिक) स्वरूपाचे झाले आहेत. तशा तरतुदींमुळे मालक भांडवल सघन तंत्रे अवलंबिण्यास उद्युक्त होतात. अशा बाबींच्या संदर्भात सुधारणा घडवून आणण्यास खूप वाव आहे.

प्रचलीत कामगार कायद्यांमुळे एकूण व्यवस्थेत बरीच ताठरता आलेली आहे हे खरे असले तरी तो साचेबंदपणा किंवा ताठरता कमी करण्याच्या उत्साहात फाजील लवचिकता आणली जाणे अनिष्ट ठरेल. म्हणूनच कामगार लवचिकतेबाबत सावधगिरीचा दृष्टिकोन अवलंबिला गेला पाहिजे. खरे तर, 'कामावर घेणे आणि कामावरून काढून टाकणे' या बाबतीत मालकांना पूर्ण स्वातंत्र्य बहाल करणे राजकीय व अन्य दृष्ट्याही सुसाध्य व व्यवहार्य ठरणार नाही. अशा अती व कठोर उपाय योजनांमुळे यंत्रणेचा (व्यवस्थेचा) टिकाऊपणा धोक्यात येईल – प्रणाली कायम राखता येणे कठीण होईल. म्हणून याबाबत कोणतीही घाई न करता धीर धरणे गरजेचे ठरते.

**१. सुधारणांच्या मार्गातील सध्याची कोंडी**

गटबाजीचे राजकारण हाच कामगार सुधारणांच्या मार्गातील मुख्य अडथळा दिसतो. श्रमबाजाराच्या बाबतीत अधिक लवचिकता आणली गेली तर मोठ्या प्रमाणावरील इष्ट तो विचार घडवून आणला जाणे शक्य आहे. तसेच अशा लवचिकतेमुळे बिनकसबी श्रमसघन उद्योगांची वाढ शक्य होईल, संघटित क्षेत्राला अधिक बळकटी येऊ शकेल.

देशाच्या निरनिराळ्या भागात आणि प्रत्येक प्रदेशातील निरनिराळ्या क्षेत्रात व उत्पादन संस्थांमध्ये श्रम या उत्पादन घटकाचे फेरस्थान निश्चयन-बदलणाऱ्या परिस्थितीनुसार श्रम या घटकाचे फेर वाटप-जरूरीचे असते. श्रम बाजार लवचिक असल्याशिवाय असे फेरवाटप शक्य होणार नाही. म्हणूनच कामगार संबंध क्षेत्रात लवचिकतेची गरज आणि याचबरोबर मजुरी दराबाबत देखील लवचिकता असणे गरजेचे आहे. श्रमबाजार, कामगार संबंध याबाबत लवचिकतेला वाव हवाच, पण त्यासाठी कामगारांच्या हक्कांची पायमल्ली करून चालणार नाही. अर्थव्यवस्थेतील जोमदार घटकांना, सुस्थिर अभिकर्त्यांना औचित्यपूर्ण कायदे आणि आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतील रास्तपणा या गोष्टी गरजेच्या त्याच न्यायाने समाजातील दुर्बल घटकांची, पददलितांची आर्थिक व सामाजिक सुरक्षितता महत्वाची ठरते. कामगार सुधारणा घडवून आणताना औचित्य आणि सुरक्षितता या दोहोंचा सुंदर मिलाफ अपेक्षित आहे.

अधिकांश लवचिकतेमुळे संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ शक्य आहे. संघटित क्षेत्रात मजुरी दर सापेक्षतेने उच्चतर पातळीवर असतात. अशा रितीने उपरोक्त सुधारणांमुळे दारिद्र्य व विषमता कमी होणे शक्य आहे. सुधारणा मागे ठेवल्या तर संघटित क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम घडून येऊन परिणामत: सबंध अर्थव्यवस्थेचे, समाज व्यवस्थेचे हितसंबंध धोक्यात येतील.

रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी देशाची औद्योगिक अर्थव्यवस्था विकसित करावयाची

असेल तसेच श्रमशक्ती सामावून घेण्याचा कारखानदारी वृध्दीचा आपण गंभीर विचार करीत असू तर श्रमिकांचे सेवायोजन करण्याच्या बाबतीत लवचिकतेचे उद्दिष्ट गाठणाऱ्या कामगार सुधारणा तातडीने केल्या पाहिजेत. रोजगार निर्मिती हे केवळ औद्योगिक धोरणाचे मुख्य केंद्र हवे एवढेच नव्हे तर अर्थसंकल्पाच्या सादरीकरणात प्रतिबिंबीत होणाऱ्या राजकोषीय धोरणाचेदेखील केंद्र असले पाहिजे. अतीव यांत्रिकीकृत आणि संगणकीकृत कामांच्या (नोकऱ्यांच्या) बाबतीत उच्च भांडवल-गुंतवणूक अंतर्भूत असते. म्हणून त्याऐवजी सेवाभिमुख कामांवर(नोकऱ्यांवर) भर दिला जावा. नोकऱ्या (रोजगार) निर्माण होण्यासाठी आर्थिक वृध्दिदरावर अवलंबून राहण्यापेक्षा रोजगार निर्मितीतून वृध्दी घडून येऊ द्यावी. आर्थिक वृध्दीतून पूर्ण रोजगार प्रस्थापित होईल अशी अपेक्षा केल्यास अपेक्षित रोजगार निर्मिती प्रत्यक्षात प्राप्त होण्यासाठी प्रदीर्घ काळ रेंगाळणारी वाट पाहात बसावे लागेल.

या देशात आपण प्रत्यक्षात आर्थिक वृध्दीचा प्रथम विचार केला आणि पूर्ण रोजगाराचा विचार नंतर होऊ लागला आहे. आदर्श रितीने मांडणी करावयाची तर आर्थिक सुधारणांतून पूर्ण रोजगार प्राप्त झाला पाहिजे आणि तो पूर्ण रोजगार आर्थिक वृध्दी सुनिश्चित करणारा असला पाहिजे.

भारतात श्रमशक्ती सर्व घटकराज्यात विपुलतेने उपलब्ध आहे. स्थूल देशान्तर्गत उत्पादनवाढीचा विचार करताना श्रम या उत्पादनाच्या हक्काच्या वापरावर सापेक्षतेने अधिक भर देणे प्रस्तुत व फलदायी ठरेल. सध्याच्या परिस्थितीत देखील रोजगाराचा वृध्दी दर उंचावता येईल. श्रम या उत्पादन घटकाची उत्पादकता स्थिर आहे असे गृहीत धरता, बेरोजगाराच्या दरात घट घडून आल्यास देशान्तर्गत उत्पादनाचा वृध्दी दर पूर्ण रोजगाराची पातळी वाढली जाईपर्यंत वाढत राहील.

सापेक्षतेने अधिक श्रमशक्तीला सामावून घेत ८ टक्के पेक्षा अधिक आर्थिक वृध्दी दर कायम राखण्यासासठी अधिकांश आर्थिक सुधारणा गरजेच्या आहेत. अपुऱ्या, अर्धवट आणि अडखळत, मध्येच थांबत थांबत सुधारणा केल्या जाण्याऐवजी साकल्याने आणि पुरेशा सुधारणा सातत्याने केल्या गेल्यास त्या अधिक फलदायी ठरतील. आर्थिक सुधारणांच्या पुढचा टप्पा म्हणून वित्तीय क्षेत्रातील सुधारणांबरोबरच कामगार-सुधारणा हाती घेतल्या जाव्यात. अधिकाधिक सुधारणा स्वागतार्ह आणि स्वीकारार्ह ठरण्यासाठी रोजगार वृध्दी दर श्रमशक्तीतील वाढीपेक्षाही अधिक असला पाहिजे. रोजगारवृध्दीचा दर श्रमशक्तीतील वाढीपेक्षा अधिक राहतो, हे दाखवून दिले गेले तर कामगार सुधारणांना होणारा विरोध हा निष्प्रभ होऊन शेवटी संपुष्टात येईल.

**२.रोजगार योग्यतेचा (सेवा योजनयोग्यतेचा) प्रश्न :**

व्यक्ती रोजगारयोग्य होण्यासाठी त्या व्यक्तीला शिक्षण, प्रशिक्षण द्यावयास हवे. व्यक्तीला एखादा तयार अन्नपदार्थ (मासा) देण्या ऐवजी तो पदार्थ कसा सिध्द करावयाचा याचे (मासेमारीचे) शिक्षण देणे अधिक महत्वाचे ठरते. कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीकरिता टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेने हाती घेतलेल्या एका पाहणीत असे निदर्शनाला आले आहे की महाराष्ट्रातील रोजगार संधी आणि ज्यांच्या अंगी पायाभूत कौशल्य बाणलेले आहे अशा व्यक्तींची उपलब्ध रोजगार संधी घेण्याची

कुवत (त्या व्यक्तीची रोजगार योग्यता) या दोहोंमध्ये सुसंवादाचा अभाव आहे. विशिष्ट रोजगारसंधी आणि त्या संधीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीची योग्यता (पात्रता) या दोन गोष्टी जुळणाऱ्या नाहीत. संघटीत क्षेत्रातील पायाभूत कारखानदारी उद्योगातील उत्पादनवाढीच्या दराच्या मानाने त्या उद्योगातील कामगार भरतीचा दर बराच कमी असल्याचे आढळून आले आहे. बदलत्या औद्योगिक चौकटीच्या (रचनेच्या) पुष्टीसाठी विविध कौशल्ये आत्मसात केलेल्या उमेदवारांची गरज आहे. पण उपलब्ध मनुष्यबळ किंवा औद्योगिक क्षेत्राकडे रोजगाराची मागणी करणाऱ्या व्यक्ती पाहता त्या कोणत्या ना कोणत्या एखाद्याच व्यवसायात निष्णात असतात, वाकबगार असतात.

हल्लीच्या शालेय (औपचारिक) शिक्षणाचा प्रत्यक्षातील धंद्याशी किंवा व्यवसायाशी संबंध नाही आणि म्हणूनच तथाकथित सुशिक्षित लोक म्हणजे रोजगार योग्य नसलेल्या व्यक्तींचा केवळ समूह एवढेच. उद्योग व्यवसायाच्या मालकांना हवे असतात ते कामावर घेण्यास लायक असलेले उमेदवार, तांत्रिक कौशल्ये अंगी असलेले, पात्र (रोजगार योग्य) उमेदवार. तथापि अर्जदार व्यक्ती आणि प्रशिक्षणार्थी व्यक्ती कच्च्या असतात. साधे पदवीधर देखील बुध्दिमान, योग्य उमेदवार म्हणून विचारात घेण्यासारखे, संभाषणचतुर आणि दिलेल्या सूचना नीट समजून घेऊन त्याप्रमाणे योग्य कृती करणारे असावेत, अशी अपेक्षा असते. तथापि पुष्कळदा त्यांच्यामध्ये संज्ञापन कौशल्य अभावाने आढळते, लोक संपर्क कौशल्ये ( मृदु कौशल्ये) त्यांनी आत्मसात केलेली नसतात.

उमेदवाराला कोणत्याही गोष्टीचे त्वरित आकलन झाले पाहिजे. अर्थ सोप्या भाषेत आणि स्पष्टपणे व्यक्त करण्याची कुवत त्याचे ठायी असली पाहिजे. तसेच आवश्यक त्यावेळी त्याला आपले विचार प्रभावीपणे मांडता आले पाहिजेत. शैक्षणिक संस्थांनी आणि प्रशिक्षण केंद्रांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्व ओळखले पाहिजे. उमेदवारांनी उदासीनता, उध्दटपणा, अज्ञान यापासून दूर राहिले पाहिजे. त्यांनी ग्राहकांच्या आणि सहकाऱ्यांच्या बाबतीत उत्स्फूर्त सहकार्याचा दृष्टिकोन बाळगला पाहिजे. तसेच अन्य व्यक्तींच्या गरजा व भावना जाणून त्यांची चिंता वाहिली पाहिजे.

बेरोजगाराच्या प्रश्नांवर तोडगा म्हणून श्रमबाजारात स्पर्धातत्त्वाचा अवलंब केला जावा असे सुचविणे अविचारीपणाचे ठरेल. खुल्या बाजारातील मागणी पुरवठ्याच्या अनियंत्रित शक्ती मुक्तपणे कार्यरत असतील तर त्यायोगे बेरोजगार नाहीसा होऊन श्रम बाजारात आपोआपच समतोल प्रस्थापित होईल, हा युक्तीवाद रोजगारासारख्या सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत मांडणे चुकीचे ठरते. बेरोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी सामाजिक वास्तवाची जाण ठेवून सामंजस्याने कामगार-सुधारणा राबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उमेदवारांना रोजगार योग्य कसे करता येईल हे पाहिले पाहिजे. या संदर्भात मनुष्यबळ विभाग आणि कामगार मंत्रालयांनी उपक्रमशीलता दाखविली पाहिजे.

नोकरी नाही किंवा कामधंदा नाही म्हणून

बेकार युवक चुकीच्या मार्गाने जाणार नाहीत हे सरकारी नोकरशहांनी पहावे, अशी राजकारणी लोक अपेक्षा करतात, नेते मंडळी ही गोष्ट आवर्जून सांगत असतात. त्यांचा हा उपदेश फलदायी ठरण्यासाठी त्यांनी ती उद्दिष्टे प्राप्त करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती परिस्थिती निर्माण केली पाहिजे. नेमकेपणाने सांगावयाचे तर उद्योग व्यवसाय क्षेत्रात आवश्यक असलेली विविध प्रकारची कौशल्ये शिकाऊ उमेदवारांनी अवगत करून घेण्यासाठी सोई, उच्च ध्येयांनी प्रेरित झालेला शिक्षकवर्ग, अभ्यासक्रमांची फेररचना, उद्योग व्यवसाय संघटनांशी सातत्याने संपर्क, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळण्याच्या दृष्टीने संयुक्त योजनांची कार्यवाही इत्यादी अनेकविध सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. त्यासाठी राज्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना तो अभ्यासक्रम आकर्षक आणि आश्वासक वाटावा, या दृष्टीने प्रयत्न करता येणे शक्य आहे.

कामगार दलाची रोजगार क्षमता वाढविण्याखेरीज आणखी एक उपाय म्हणून हंगामी कर्मचारी भरतीचा विचार करता येईल. निदान संघर्षजन्य बेरोजगाराचा प्रश्न हाताळण्यासाठी हा उपाय योजता येणे शक्य आहे. श्रमबाजाराचा एक महत्त्वाचा घटक यादृष्टीने त्याकडे पाहता येईल. अतिकल्पकतेने समन्वेषण करून पूर्ण अभ्यासाअंती सिध्द करण्यात आलेल्या या 'हंगामी कर्मचारी भरती' उपाय योजनेला आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेनेदेखील रुकार दिलेला आहे. टीमलीज् ने तयार केलेल्या ताज्या अहवालात ही उपाययोजना सुचविण्यात आली आहे. अधिक चांगल्या प्रकारचा रोजगार मिळण्यासाठी सुरूवातीचा आधार म्हणून प्रस्तुत उपाय उपरोक्त पूर्ण रोजगाराचे आणि अधिक योग्य स्वरूपाच्या रोजगाराचे उद्दिष्ट मानले जाण्याच्या कामी महत्त्वपूर्ण हातभार लावू शकतो. भावी नियोक्त्याला (मालकाला) आपले कौशल्य आपली काम करण्याची हातोटी दाखविण्याची संधी, हंगामी कर्मचारी भरतीमुळे, उमेदवारांना मिळू शकते. अशा रितीने प्रस्तुत उपाययोजनेचे महत्त्व अधोरेखित होते.

## १०. समानता आणि न्याय

अन्य अनेक बाबतीतील समानतेप्रमाणे रोजगार संधीचीदेखील समानता महत्त्वाची ठरते. शतकानुशतके दरिद्री राहिलेल्या आणि समाजातील दुर्बल घटकात समाविष्ट होणाऱ्या लोकांना रोजगार पुरविण्याच्या बाबतीत आपण कितपत यशस्वी ठरलो आहोत? वस्तुत: अशा लोकांना न्याय देण्याच्या बाबतीत प्रचलीत आर्थिक सुधारणांना यश आलेले नाही. न्यायाच्या संकल्पनेचे पूर्णपणे आकलन होणे कठीण असले आणि काही दृष्टींनी ही संकल्पना फसवी असली तरी मानवी जीवनाच्या आणि समाजाच्या गतिकीत या संकल्पनेला खूपच महत्त्व प्राप्त होते. गोरगरीब सहन करीत असलेल्या अन्यायाने आपल्याला जाग आली पाहिजे आणि त्यांच्या हितसंबंधांची जपणूक करण्याच्यादृष्टीने त्यांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत हितावह धोरणांचा आपण पाठपुरावा केला पाहिजे.

राजकीय लोकशाही आणि आर्थिक समता या दोन गोष्टी एकत्र नांदल्या पाहिजेत हा आदर्श

ठरतो. भारतातील लोकांना राजकीय अधिकार, हक्क बहाल करण्यात आले आहेत. तथापि, योग्य स्वरूपाची निर्वाह साधने मिळण्याचा आर्थिक अधिकार हक्क अद्याप लोकांच्या आटोक्यात आलेला नाही.

ऐतिहासिकदृष्ट्या दारिद्र निर्मूलन ही गोष्ट आर्थिक वृध्दी कितपत साध्य होते यावर बव्हंशी अवलंबून राहिली. एकोणीसशे ऐंशीच्या दशकात हीच पटनीती अवलंबिण्यात आली. त्या काळात आर्थिक वृध्दी दराने ५.४ टक्केची पातळी गाठली. सन १९९२ ते २००५ या काळात म्हणजे उदारीकरणाच्या काळात आर्थिक वृध्दीदर ६.३ टक्के पर्यंत उंचावला. गेल्या तीन वर्षाच्या काळात तर स्थूल देशान्तर्गत उत्पादनवाढीच्या दराने ८.० टक्केची पातळी ओलांडली. तथापि, उत्पादनवाढीच्या दरावर अधिष्ठित असलेल्या या पटनीतीने गरीबांना डावलले ही वस्तुस्थिती आहे. सध्याच्या रोजगाररहित वृध्दीवरून ही गोष्ट अधिकच स्पष्ट होते. नव्या आर्थिक धोरणाने यंत्रवत संपत्ती केंद्रित वृध्दीचे तंत्र उचलून धरले. पण या प्रचलनासाठी जबर किंमत मोजावी लागत आहे. उत्पादनवाढीचा लाभ देशात विस्तृत भागात पसरला नाही. आर्थिक प्रगतीचा असा बेसुमार खर्च व्यापक समाजाला सहन करावा लागत आहे.

गेल्या सुमारे पंधरा वर्षाच्या काळात विषमता कमी झाली की वाढली? याचे एक उत्तर असे की विषमता कमी झाली – अधिक बरोबर म्हणजे उपभोग विषमता कमी झाली. गेल्या दोन दशकांच्या काळात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण घटले. सन १९७७–७८ मध्ये हे प्रमाण (राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण संघटनेच्या ५५ व्या फेरीच्या अंदाजानुसार) ५१.३ टक्के होते. ते सन १९९९–२००० या वर्षी २६.१ टक्के राहिले. सन १९९३–९४ मध्ये (ग्रामीण व शहरी भाग यांचा एकत्रित विचार करता) दारिद्र्याचे प्रमाण ३६ टक्के होते. सन १९९९–२००० मध्ये ते २६.१ टक्के पर्यंत घटले आणि सन २००७ सालीच्या प्रकल्पनानुसार ते १९.३ टक्के कमी झाले. [२०] अर्थात सन २००७ मध्ये प्रत्यक्षात हे प्रमाण नेमके किती कमी राहील हा विवाद्य मुद्दा होऊ शकतो.

राष्ट्रीय (दाट) नमूना सर्वेक्षण सन २००४–०५ मध्ये करण्यात आले. त्याचे प्राथमिक अंदाज सन १९९३–९४ सालीच्या अंदाजाशी तुलना करण्याजोगे आहेत. त्यानुसार असे म्हणता येईल की सन २००४–०५ मध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण सुमारे २८ टक्के होते. या संदर्भात सन १९९९–२००० चे अधिकृत प्रमाण २६ टक्के होते. याचा अर्थ त्यावेळच्या अधिकृत आकड्यापेक्षा सन २००४–०५ चे प्रमाण अधिक आहे.

उपरोक्त आकडेवारी असे दर्शविते की, दारिद्र्याचे प्रमाण एकंदरीत काहीसे घटले. पण ही घट तशी माफकच आहे. ही घट फार वेगाने घडून आली नाही. शिवाय, दारिद्र्यातील घटीचे आकडे फुगवून सांगितले जातात, याबद्दलही चिंता व्यक्त केली जात आहे.

आर्थिक सुधारणांमुळे व्यापक सामाजिक हित, जनसामान्यांचे कल्याण साध्य होईल, अशी आशा होते. ती स्वप्ने साकारली नाहीत. प्रत्यक्षात उत्पन्नाचे आणि विकासाच्या संधीचे अत्यंत विषम वाटप घडून आले. शासनाने घोषित केलेल्या दारिद्र्य रेषा आणि दारिद्र्यासंबंधीची सरकारी

आकडेवारी विश्वसनीय नसल्याने लांच्छन ठरते. पोषक आहाराच्या किंमतीच्या बाबतीत खरी भाववाढ किती आहे हे ज्यात प्रतिबिंबित होते त्या दारिद्र्यरेषेची तुलना करता शासनाने जाहीर केलेल्या अधिकृत दारिद्र्य रेषा किती व कशा न जुळणाऱ्या आणि म्हणून प्रत्यक्षात गैरलागू ठरतात, हे संशोधकांनी दाखवून दिले आहे. [२१] उपलब्ध आकडेवारी आणि आधारसामग्री, दारिद्र्याच्या घटत्या प्रमाणाचा जो दावा केला जातो, त्याला पुष्टी देणारी खचितच नाही. शासनाकडून जाहीर केल्या जाणाऱ्या अहवालात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जे प्रमाण दर्शविले जाते त्यापेक्षा प्रत्यक्षातील दारिद्र्याचे प्रमाण बरेच अधिक असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून समजते. शासनाने दारिद्र्याची जी व्याख्या केली त्यात उणीवा आहेत. अशी अधिकृत दारिद्र्य रेषा सदोष असल्याने दारिद्र्यविषयक स्तरच्छेद आणि आंतरकालिक तुलनात्मक अभ्यासातून निघणारे निष्कर्ष दिशाभूल करणारे ठरतात. आणखी असे की उपभोगाच्यादृष्टीने (उष्मांकांवर आधारित व्याख्येच्या दृष्टीने) दारिद्र्याचे मापन करणे हा एक आयाम होय. या बाजूखेरीज अन्य अनेक बाजूंनी दारिद्र्याचा विचार करावयास हवा. उदाहरणार्थ, आरोग्य आणि शिक्षण यासारख्या पायाभूत सार्वजनिक सेवा गोरगरीबांना मिळत नाहीत. हाही मुद्दा तितकाच महत्त्वाचा ठरतो. अशा दृष्टिकोनातून पाहता वंचितत्वाची (नागवणुकीची) व्याप्ती कितीतरी अधिक असल्याचे लक्षात येते.

स्थूल देशान्तर्गत उत्पादनातील वाढीबरोबर त्या वाढत्या उत्पन्नाचे न्याय्य वाटप घडवून आणले गेले पाहिजे. तसे झाले तर देशातील गरीबांचे भवितव्य उजळेल. त्यासाठी राज्य संस्थेने काही बाबतीत हस्तक्षेप करणे गरजेचे ठरते. मुक्त बाजारव्यवस्था राजकीय लोकशाहीशी मिळतीजुळती राहील, अशी व्यवस्था प्रस्थापित केली जाण्यासाठी राज्यसंस्थेने पुढाकार घ्यावयास हवा. खासगी क्षेत्राला सर्वत्र अधिक वाव देण्यासाठी राज्य संस्थेने आपले क्षेत्र अधिकाधिक संकुचित करण्याऐवजी बाजारयंत्रणा आणि राज्ययंत्रणा यांच्या परस्परपूरक सहकार्यातून उपरोक्त प्रश्नांची उकल शक्य होईल.

केवळ आर्थिक वृध्दीचा विचार करता या देशाची स्थिती एकंदरीत सुधारली हे खरे. तथापि, केवळ तेवढ्याने गरीबांची, वंचितांची स्थिती पालटली काय याचे उत्तर नकारात्मक आहे. चिंतेची ही बाब जागतिक बँकेने विकास धोरणाविषयी प्रकाशित केलेल्या ताज्या समालोचनात स्पष्ट करण्यात आली आहे. अशी परिस्थिती उद्‌भवण्यास अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक वृध्दीचा वेग सर्व राज्यात सारखा नाही. आंध्रप्रदेश, गुजराथ, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तरांचल आणि पश्चिम बंगाल यांनी गेल्या दशकात केलेली वाटचाल समाधानकारक आहे; पण मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश या राज्यांच्या बाबतीत तसे म्हणता येत नाही. विशेष म्हणजे ज्या राज्यांची प्रगती ठीक आहे त्या राज्यातील काही प्रदेशांची, जिल्ह्यांची स्थिती मात्र चिंताजनक आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांच्या बाबतीत असे चित्र दिसते. ही स्थिती आव्हान देणारी आहे.

देशातील सर्व राज्यांचा, प्रदेशांचा विकास

राष्ट्रीय सरासरी दराच्या जास्तीत जास्त जवळपास राहील यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

### ११. उपसंहार

रोजगाराविषयीच्या प्रस्तुत विश्लेषणात गेल्या सुमारे पंधरा वर्षांच्या काळातील रोजगारविषयक स्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला असून सैध्दान्तिक व पध्दतीमीमांसात्मक पार्श्वभूमीवर त्या रोजगारातील प्रवृत्तींचे संक्षिप्त समालोचन करण्यात आले आहे. बेरोजगाराच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने कोणते उपाय योजता येतील, हे सूत्ररूपाने सूचित करणारा हा समारोप.

रोजगाराकडे निरनिराळ्या दृष्टिकोनातून पाहता येते. देशातील एकूण रोजगाराविषयीच्या अंदाजांच्या बाबतीत एकवाक्यता दिसत नाही. याचे स्पष्टीकरण उत्पन्न दृष्टिकोन, उत्पादन दृष्टीकोन/ आणि मान्यता दृष्टिकोन देऊ शकतात. या दोन दृष्टिकोनातून केलेले प्रच्छन्न बेरोजगाराचे विश्लेषण अनेक दृष्टींनी महत्त्वाचे ठरते. बेरोजगार समस्येविषयीच्या विश्लेषणात भांडवल सघनता, यांत्रिकीकरण यासारख्या संकल्पना अनुस्यूत असतात.

पाश्चात्य देशात अवलंबिला जाणारा सैध्दान्तिक व पध्दतीमीमांसात्मक दृष्टिकोन भारतातील बेरोजगाराच्या अभ्यासाच्यादृष्टीने प्रस्तुत ठरत नाही. याची कारणे अनेक आहेत. त्यापैकी एक प्रमुख कारण म्हणजे भारतातील श्रमबाजारांच्या बाबतीत आढळणारा द्वैतवाद.

एकंदरीत भारतापुढील आर्थिक प्रश्नांची उकल करण्याच्यादृष्टीने उपयुक्त ठरणारा दृष्टिकोन पारंपारिक अर्थशास्त्रीय सिध्दान्तातून मिळत नाही. योग्य पर्यायी दृष्टिकोन अवलंबिताना संस्थात्मक संरचनेवर भर देणे या देशाच्या दृष्टीने गरजेचे ठरते. देशापुढील बेरोजगार समस्येचे किंवा एकूणच आर्थिक प्रश्नांचे विश्लेषण वास्तववादी होण्यासाठी आर्थिकेतर घटकांचाही विचार व्हावयास हवा. रोजगारविषयक धोरणे ठरविताना प्रशासकीय आणि संघटनात्मक बाजूदेखील विचारात घ्याव्या लागतात.

### भारतातील रोजगारविषयक स्थिती

सन १९८०-९० या काळात ग्रामीण भागातील रोजगार वृध्दी दर २.८८ टक्के होता. तो सन १९९०-९८ या काळात २.५१ टक्के पर्यंत घटला. शहरी भागातील दर त्याच काळात २.८१ टक्के वरून १.३१ पर्यंत कमी झाला. मुळातच निम्नतर रोजगार पातळीच्या पार्श्वभूमीवर सन १९९८-२००५ या (पाचव्या आर्थिक प्रगणनेच्या) काळात एकूण रोजगारात २.५ टक्के नी वाढ झाली. सन १९९०-९८ या काळात स्थूल देशान्तर्गत वृध्दीदर ५.६ टक्के होता. तो सन १९९८-२००५ या काळात ६ टक्केपर्यंत वाढला असताना रोजगार वृध्दी दर मात्र मागे पडला, ही चिंतेची बाब होय.

आर्थिक सुधारणा हाती घेण्यात आल्यानंतरच्या काळात आढळून आलेली बेरोजगारातील वाढीची भयकारी प्रवृत्ती म्हणजे गेल्या पंधरा वर्षातील वाटचालीचे एक वैशिष्ट्यच होय. हे वैशिष्ट्य म्हणजे देशातील दारिद्र्य, लिंगभेदावर आधारित विषमता आणि आर्थिक सुधारणांचे सामाजिक दुष्परिणाम किंवा सामाजिक समावेशकतेचा अभाव इत्यादींवर भाष्य म्हणता येईल.

गेल्या दशकाच्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेचे पुनरूज्जीवन घडून आले. अर्थव्यवस्थेने उल्लेखनीय वृध्दीदर गाठला. तथापि, रोजगारनिर्मितीचा दर मात्र बराच कमी राहिला. जागतिकीकरणाची आव्हाने पेलण्यासाठी उत्पादन संस्था प्रयत्नशील आहेत. मजुरी खर्चाचा भार कमी करण्यासाठी अनेक पध्दतींचा अवलंब करून कार्यक्षमतेची पातळी उंचावली जात आहे. या देशात श्रमशक्ती विपुल उपलब्ध असूनही श्रम या घटकाचा शक्य तितका कमी वापर करणारी उत्पादन पध्दती अवलंबिली जात आहे !

रोजगार निर्मितीचा दर अपेक्षेपेक्षा कमी राहिला, परिणामत: बेरोजगाराचा दर वाढला. हा झाला रोजगारचा संख्यात्मक विचार. रोजगाराची गुणात्मक बाजूदेखील तितकीच महत्त्वाची. सन २००० आणि सन २००१ मध्ये नियोजन आयोगाने स्थापन केलेल्या दोन समित्यांनी यासंबंधी विश्लेषण केलेले आहे. अनौपचारिक क्षेत्रात, असंघटीत क्षेत्रात कामाच्या ठिकाणची परिस्थिती कित्येकदा चिंताजनक असते. तेथील रोजगाराचे स्वरूप, बालकामगारांची स्थिती इत्यादी बाबतीत म्हणजे गुणात्मकदृष्टया सुधारणा निकडीच्या आहेत. तसेच संघटीत क्षेत्रातील आणि विशेषत: कॉल सेंटरमधील कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीविषयीचा एक सर्वंकष अहवाल व्ही.व्ही. गिरी राष्ट्रीय कामगार संस्थेने प्रसिध्द केला आहे. एकंदरीत असंघटीत क्षेत्र आणि संघटीत क्षेत्र – सर्वच क्षेत्रातील रोजगाराचे स्वरूप (गुणात्मक बाजू) सुधारणे अत्यंत निकडीचे आहे.

भारतातील (बे) रोजगारविषयक प्रश्नांची जी चिकित्सा मागील भागांमध्ये करण्यात आली आणि त्या निदानावरून उपाय स्पष्ट होतात. धोरणात्मक आणि अन्य उपाययोजना येथे सूत्ररूपाने देता येतील.

१. वाढत्या बेरोजगारावर मात करण्यासाठी गरज आहे ते कृषिप्रधान कार्यक्रमाची. त्यामध्ये राष्ट्रीय व राज्य पातळ्यांवरील धोरणकर्ते, प्रादेशिक संस्था आणि उद्योग व्यवसाय क्षेत्राचे प्रतिनिधी या सर्वांचाच सहभाग आवश्यक ठरतो.

रोजगाररहित आर्थिकवृध्दी देशातील बेरोजगारात भर घालणारी ठरेल. तशा वाढत्या बेरोजगारामुळे (सामाजिक व अन्य) सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर स्वरूप धारण करील. हे लक्षात घेता आर्थिक वृध्दीबरोबर रोजगारवाढीचे प्रयत्न हवेत. लघुउद्योग आणि मध्यम उद्योगांची रोजगार निर्मिती क्षमता सापेक्षतेने जास्त आहे. म्हणून रोजगार संधी वाढण्यासाठी त्या उद्योग व्यवसायांचे परिपोषण गरजेचे ठरते.

आर्थिक वृध्दीच्या रोजगाराभिमुख पटनीतीसाठी राज्यसंस्थेचे प्रयत्न गरजेचे आहेत. त्यादृष्टीने शिक्षण, प्रशिक्षण व्यावसायिक मार्गदर्शन याकडे लक्ष द्यावयास हवे. स्वयंरोजगार वाढविला जाण्यासाठी राष्ट्रीय वित्तीय पुरवठ्याविषयीच्या धोरणांचा अवलंब करता येईल.

ग्रामीण भागात क्षेत्रबाह्य (शेती बाह्य) रोजगाराची संधी निर्माण करणे आवश्यक ठरते. तसेच शहरी भागातील बेरोजगार कमी करण्यासाठी अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार संधीचा लाभ घेता येईल.अनौपचारिक क्षेत्राला निश्चित स्वरूप देण्याचा प्रयत्न केल्यास त्या क्षेत्रातील कामगार औपचारिक क्षेत्रातील कामगारांप्रमाणे सामाजिक सुरक्षा आणि तदनुषंगिक लाभ मिळण्यास पात्र

ठरतील.

२. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना स्वागतार्ह ठरते. समावेशक स्वरूपाच्या या योजनेमुळे गरीबातल्या गरीब लोकांना खात्रीशीर उत्पन्न मिळण्याचे साधन उपलब्ध झाले आहे. तथापि, ग्रामीण विकासासाठी आणि गरजूंना रोजगार मिळवून देण्यासाठी वापरावयाच्या साधनसामग्री पैकी काही भाग गैरमार्गाने सुखवस्तू लोकांकडे वळतो आहे. हा भ्रष्टाचार थांबविण्यासाठी केंद्र, राज्य आणि पंचायत पातळ्यांवर पारदर्शकता व जबाबदारी (स्पष्टीकरण योग्यता) ही तत्त्वे काटेकोरपणे लागू केली गेली पाहिजेत. प्रस्तुत योजनांन्तर्गत रोजगार प्रकल्पांच्या विविध बाजूंविषयीची माहिती लोकांना निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिली जावी. प्रस्तुत योजनान्तर्गत भावी प्रकल्पांसाठी वित्तीय साधनसामग्री उपलब्ध करून दिली जाण्यासाठी पूर्वावश्यक अट म्हणून याची पूर्तता करणे बंधनकारक ठरवावे.

३. भारतातील श्रमबाजाराची द्विभागी रचना नव्या आर्थिक धोरणाच्या या काळात अद्याप तशीच आहे. या श्रमबाजारात विशेष बदल घडून आलेला नाही. देशातील श्रमबाजारांच्या बाबतीत स्पर्धाक्षमता अभावानेच आढळते. या बाजारात मुक्त प्रवेश सर्वांना आहे. पण मुक्त निर्गमन केवळ कामगारांच्याच बाबतीत. मालकाला मात्र ते स्वातंत्र्य मिळालेले नाही. याचा अर्थ श्रमबाजाराच्या बाबतीत एक प्रकारची असममिती जाणवते. खासगी क्षेत्रातील नोकरभरतीच्या बाबतीत अधिक निर्बंध लादण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे अनिष्ट परिणाम संभवतात.

४. कामगार कायद्यांमध्ये परिस्थितीनुरूप बदल अग्रक्रमाने केले गेले पाहिजेत. ताठर स्वरूपाचे कामगार कायदे काहीसे शिथील करून लवचिक मजुरी दर पध्दतीला वाव दिला तर कामगारांची गतिक्षमता वाढविली जाण्यास मदत होईल. जागतिक स्पर्धा आणि तंत्र वैज्ञानिक अनिश्चितता ही वैशिष्ट्ये असलेल्या सध्याच्या परिस्थितीत निगम संस्था (कंपन्या) नी बदलत्या परिस्थितीशी सहज आणि चटकन समायोजन घडवून आणण्याचे कौशल्य बाणले पाहिजे. कामगार कायद्यांमध्ये आवश्यक ते बदल केले जावेत, ही कंपन्यांची मागणी पूर्ण केली गेली तर जागतिक क्षेत्रातील अनेकविध संधीचा लाभ उठवता येणे त्यांना शक्य होईल.

श्रमदलात जेवढी वाढ होते त्यापेक्षा अधिकांशाने रोजगारनिर्मितीत वाढ होत राहील, असे प्रत्यक्षात घडलेले दिसले तर कामगार सुधारणांना होणारा विरोध मावळेल. (कार्यकारी) आयुष्यभर टिकणारी नोकरी लाभलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कामगार कायद्यात कामगारांना अनुकूल असणाऱ्या ज्या तरतुदी समाविष्ट आहेत त्यामुळे रोजगार पातळी निदान राखली जाणेदेखील शक्य झाले नाही; संघटित क्षेत्रात कामगारांना अनुकूल अशी जी ताठरता आढळते त्यामुळे गेल्या दशकात रोजगार वृध्दीच्या दरात वाढ झाली नाही. अशा परिस्थितीत व्यापक कामगार संबंधाच्या बाबतीत लवचिकतेला वाव देणे हाच धोरण पर्याय संयुक्तिक ठरतो.

एकसंध होण्याचा प्रयत्न करणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेपुढे (कामगार संबंधांच्या बाबतीत) लवचिकता आणि सामाजिक सुरक्षितता यांचा समतोल साधण्याचा प्रश्न उभा आहे.

सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा आराखडा तयार करणे निकडीचे असून ती व्यवस्था संस्थात्मक स्वरूपाची केली जावी.

५. केवळ कामगारांच्या फायद्याचे निर्बंधात्मक स्वरूपाचे कायदे आणि विनियम याचाच सतत विचार करणारे मन आणि मनाची बैठक बदलणे अत्यंत निकडीचे आहे. बदलती परिस्थिती लक्षात घेऊन कामगार कायद्यात काही बदल केले तर त्यातून कामगारांना मिळू शकणारे लाभ, त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या संभाव्य तोट्यांपेक्षाही अधिक राहतील, अशी कामगारांची खात्री पटली पाहिजे.

निर्वाह निधी निवृत्तीवेतन यासारख्या योजनाविषयीच्या तरतुदींमुळे खर्च वाढत असून तिजोरीवर असह्य ताण पडत आहे. सध्याच्या बदलत्या परिस्थितीत अशा तरतुदींचा फेरविचार करणे क्रमप्राप्त ठरते. अशा योजनांचा खर्च शासनालाही परवडत नसल्याने त्यासंबंधीच्या तरतुदी असलेले कायदे रद्द केले जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

६. तंत्र वैज्ञानिक क्रांतीने शिक्षणक्षेत्रातील गुंतवणुकीचे आणि कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित होत आहे. युवापिढीला व्यवहारोपयोगी व पुरेसे शिक्षण देऊन, विशेषत: व्यावसायिक प्रशिक्षण देऊन युवा पिढी अधिक रोजगार योग्य करता येणे शक्य आहे. ग्रामीण भागातील उमेदवारांच्या अंगी असणारी तांत्रिक कौशल्ये वाढविणे स्वाभाविकच अधिक महत्त्वाचे ठरते. लोकांची सर्जनशीलता आणि त्यांच्या अंगी असलेली कल्पकता म्हणजे विकासाचे उगमस्थान होय. म्हणून मनुष्यबळासाठी गुंतवणूक वाढविण्याची योजना आखून ती कार्यवाहीत आणली पाहिजे.

बाजारातील मागणी लक्षात घेऊन त्यानुसार लोकांना शिक्षण व प्रशिक्षण दिल्यास ते उमेदवार रोजगार योग्य होऊ शकतात. व्यक्तीला एखादा तयार पदार्थ (मासा) देण्याऐवजी तो पदार्थ कसा सिध्द करण्याचा याचे (म्हणजे मासेमारीचे) शिक्षण देणे अधिक महत्त्वाचे ठरते. औद्योगिक क्षेत्राचे बदलते चित्र लक्षात घेता त्यांना बहुविध कौशल्ये अंगी बाणलेले उमेदवार हवे असतात, हे लक्षात येते. शैक्षणिक संस्थांनी आणि प्रशिक्षण केंद्रांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. कामगार-सुधारणा आणि उमेदवारांची रोजगार योग्यता (सेवा योजन योग्यता) वाढविण्यासाठी मनुष्यबळ विकास आणि कामगार मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न केले जाणे शक्य आहे.

७. (निदान संघर्षजन्य बेरोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी) तात्पुरत्या नोकरभरतीवर लक्ष केंद्रित केले जावे. आपल्या अंगी असलेली कौशल्ये भावी मालकांना दाखविण्याची संधी उमेदवारांना मिळण्यासाठी तात्पुरती नोकरभरती उपयुक्त ठरते.

८. गेल्या पंधरा वर्षांच्या काळात घडून आलेली आर्थिक वृध्दी एकंदरीत रोजगाररहित राहिली. ग्रामीण भागात रोजगार संधी वाढविण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या योजनांचा उल्लेख मागे आला आहे. ग्रामीण भागातील ही रोजगारनिर्मिती वृध्दिरहित स्वरूपाची आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हे 'आर्थिक वृध्दिरहित रोजगारनिर्मिती' चे एक उदाहरण होय. आर्थिक वृध्दिरहित रोजगार जितका त्रासदायक तितकीच

रोजगाररहित आर्थिक वृध्दी तापदायक ठरते. कायम राखता येणारा रोजगार निर्माण करणे हा एक योग्य उपाय ठरू शकतो.

काही उद्योग व्यवसाय सातत्यपूर्ण विकासाला पुष्टी देतात. त्याचे एक उदाहरण म्हणून पर्यटन उद्योगाच्या उल्लेख करता येईल. शुगरकेन एथनॉलचा उद्योगदेखील कायम राखता येणाऱ्या विकासाच्यादृष्टीने उपुयक्त ठरतो. अशा शेतकी उद्योगामध्ये रोजगारनिर्मितीचे भरपूर अंत:सामर्थ्य असते. ऊर्जेच्या अनवीकरणक्षम स्त्रोतांच्या वाढत्या टंचाईमुळे अनेक प्रश्न उपस्थित होतात. म्हणून एक पर्यायी स्त्रोत या दृष्टीने नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत विकसित करण्याचे प्रयत्न करता येतील. त्याचेच एक उदाहरण म्हणजे एथनॉल उद्योग.

९. आर्थिक वृध्दीदर हा एक समग्रलक्षी (समष्टि) आर्थिक निर्देशक होय. उदारीकरण आणि खासगीकरण यामुळे आर्थिक वृध्दीदरात घसघशीत वाढ घडून आली. तथापि वाढता बेरोजगार हा एक गंभीर प्रश्न ठाकला आहे. यावर इलाज म्हणून राज्यसंस्थेचा पदन्यास जरूरीचा ठरतो. देशातील रोजगाररहित वृध्दी सार्वजनिक खर्चाचे महत्त्व अधोरेखित करते. राजकोषीय अवकाशातील (क्षेत्रातील) सार्वजनिक खर्चाद्वारे रोजगारनिर्मितीला व दारिद्र्य निर्मूलनाला मदत केली जावी आणि त्यायोगे सर्वार्थाने विधायक वृध्दी प्रक्रियेला हातभार लावला जावा. केंद्र सरकारचा खजिना (कोषागार) आणि रिझर्व्ह बँक यांनी रोजगार संधीचे अभिवर्धन करणाऱ्या राजकोषीय (राज्यवित्तीय) धोरणाचा आणि पूरक स्वरूपाच्या पैसाविषयक धोरणाचा पाठपुरावा केला पाहिजे.

१०. नव्या आर्थिक धोरणामुळे विकेंद्रित संपत्ती ऐवजी यंत्रवत स्वरूपाची केंद्रित संपत्ती वृध्दी घडून आली. संपत्तीचे संकेंद्रण करणाऱ्या वृध्दीमुळे जनसामान्यांचे हितसंबंध धोक्यात आले आहेत. देशाच्या सर्व भागात आणि समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना सामावून घेणारी आर्थिक वृध्दी घडवून आणून सर्व प्रदेशांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

* * *

## संदर्भसूची

19 TemLease Services (2006) : The India Labour Report, 2006 Business Standard, Aug. 17, 2006

20 Govt.of india (2005): Economic Survey 2004-2005 page 227.

21. Ray R. & Lancaster G. (2005): " On Setting the Poverty Line Based on Estimated Nutrient Prices", EPW, January 1, 2005,

# केंद्र सरकारचा कर महसूल

* भ. सो. म्हस्के
निवृत्त प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारतीय अर्थव्यवस्थेची अस्थिर आणि विस्कळीत झालेली घडी सुधारून जलदगतीने आर्थिक विकास साध्य करण्याच्या हेतूने भारत सरकारने १९९१ या वर्षी नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब केला. दरम्यानच्या काळात डबघाईला आलेली कर व्यवस्था अस्थिरतेला कारणीभूत असल्याचे लक्षात आल्याबरोबर सरकारने त्याच वर्षी डॉ. राजा जे. चेलिया यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणा समितीचे गठन करून तिच्यावर कर पध्दतीतील दोष कमी करून त्यात सुधारणा करण्यासंबंधी शिफारसी सुचविण्याचे काम सोपविले. या समितीने सुचविलेल्या बऱ्याचशा शिफारसी सरकारने स्वीकारून तेव्हापासूनच हळूहळू त्यांची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. १९९१-९२ ते २००५-०६ च्या काळात या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे कर पध्दतीत नेमका कोणता अमूलाग्र बदल झाला आणि कर महसूलावर झालेल्या परिणामांची चर्चा प्रस्तुत निबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ)डॉ. चेलिया समितीच्या शिफारशी :**

कोणत्याही देशाच्या दूरदृष्टी असणाऱ्या राजकोषीय व्यवस्थापनासाठी संतुलित (म्हणजे माफक दर, कमी कर सवलती आणि विस्तीर्ण कर आधार असणारी) कर रचनेची गरज असते. व्यापक अर्थाने असे म्हणता येईल की कर रचना ही समन्यायी तसेच कार्यक्षम असली पाहिजे. समन्यायी म्हणजे कोणत्याही कर दात्यावर अन्याय न करणारी किंबहुना ज्याच्या त्याच्या करदेय क्षमतेनुसार कर आकारणारी असली पाहिजे; तर कार्यक्षम म्हणजे करदात्यांच्या

उपभोग, बचत, आवडनिवड, उत्पादनासाठी लागणाऱ्या आदानांच्या निवडी आणि विशेष म्हणजे सरकारच्या महसूली मिळकतीवर कुठलाही अनिष्ट परिणाम न करणारी असली पाहिजे. स्वातंत्र्यानंतर विविध तज्ज्ञांच्या अध्यक्षतेखाली अनेक समित्या स्थापन करून त्यांच्या शिफारशीनुसार कररचनेत वरील प्रमाणे सुधारणा करण्यासाठी भारत सरकारने सतत प्रयत्न केले. १९९१ या वर्षी पण चेलिया समितीला कर रचना समन्यायी आणि कार्यक्षम करण्यासाठी शिफारशी करण्यास सुचविले. या समितीने सुचविलेल्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

१. अस्तित्वात असलेले कराचे अनेक दर रद्द करून करदात्यांना पेलवेल एवढे किंवा माफक असे कर दर आकारण्यात यावेत.

२. कर दात्यांची संख्या आणि कर योग्य उत्पन्न वाढवून कराचा आधार वाढविण्यात यावा.

३. कर कायद्यात सतत बदल केल्यामुळे निर्माण होणारी क्लिष्टता टाळून कर पध्दती सोपी करावी, शिवाय कर दर स्थिर राहतील असा प्रयत्न करावा.

४. अनेक प्रत्यक्ष कराऐवजी सर्वसमावेशक असा एकच केंद्रीय वर्धित मूल्य कर असावा. टप्प्याटप्प्याने तो राज्य वर्धित मूल्य कर करण्यात यावा.

५. सेवा कर, कर्मचारी सवलत कर, अनुमानावर आधारित कर आकारण्यात यावेत.

६. कर प्रशासनात सुधारणा करून पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करावा.

७. कर लवचिकता वाढवावी.

८. कर हे समन्यायी आणि कार्यक्षम होतील अशा बेताने प्रयत्न करावा.

**ब) शिफारशींची अंमलबजावणी :**

वरील सुचविलेल्या शिफारशींची भारत सरकारने अंमलबजावणी करून भारतीय कर पध्दती संतुलित करण्याचा १९९१ पासूनच सतत प्रयत्न केला. त्यानुषंगाने खालील उपाय केले गेले.

**१. कर दर संख्येत घट :**

प्राप्तीकर, निगम कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क इत्यादी करावर आकारण्यात आलेले असंख्य कर दर कमी करून कर दरांची संख्या बऱ्याच प्रमाणात घटविली गेली. कर दरातही बरेच बदल करून निगमकर, प्राप्तीकराच्या कमाल सीमान्त दर ३० टक्के, सीमाशुल्काचा १०%, सेवा कराचा १२%, इतक्या कमी पातळीवर निश्चित केले. एवढे कर दर कमी करून कर महसूलात वाढ होईल अशी अपेक्षा केली गेली.

**२. व्याज कर (Interest Tax) :**

१९९१ पासूनच व्याजकर आकारण्याला सुरूवात केली. हा कर मुदती ठेवी आणि म्युचल फंडापासून मिळणाऱ्या व्याजावर आकारण्यात येऊ लागला.

**३) अनुमानाधारित कर(Presumption Tax):**

१९९२-९३ पासून अनुमानावर आधारलेल्या कराचा (झीशीीाििैप ढर) समावेश भारतीय कर रचनेत नव्याने करण्यात आला. कर योग्य उत्पन्नाएवढे किंबहुना त्यापेक्षाही अधिक उत्पन्न कमविणाऱ्या किरकोळ व्यापारी, छोटे दुकानदारावर कर आकारणे कठीण असल्यामुळे त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर कर बुडविला जात असे. याला आळा घालण्यासाठी ज्यांची वर्षाकाठी व्यवहारी उलाढाल रू.३५,००० ते रू . ५ लाख पर्यंतची आहे अशांनी नोंदणी करावी. तसेच

व्यवसाय आणि उत्पादनासंबंधीचे विवरण सादर करून किमान रू. १४०० एकरकमी भरावेत. नंतरच्या काळात उलाढालीची कमाल मर्यादा रू. ३५,००० वरून रू. ३७,००० करून देशातील ३५ शहरासाठी हा कर लागू करण्यात आला.

**४. सेवाकर** (Service Tax) :

सेवाकराचे राष्ट्रीय उत्पन्नामधील योगदान सतत वाढत असल्याने त्या क्षेत्रावर कर आकारणे संयुक्तिक असल्याचे मान्य केले. शिवाय आर्थिक आणि सामाजिक सेवाची (उदा. रस्ते, पाणी पुरवठा शिक्षण, आरोग्य इ.) पूर्तता करण्यासाठी वाढीव कर महसूलाची गरज या क्षेत्राकडून भागविणे शक्य होईल म्हणून चेलिया समितीच्या शिफारशीनुसार ९४-९५ पासून सेवा कर आकारण्याला सुरूवात झाली. सुरूवातील हा कर सेवा पुरविणाऱ्याच्या रू. ४ लाखाच्या वरच्या उलाढालीवर ५% लावला गेला. आता ही मर्यादा रू. १० लाखाच्यावर करून २००६-०७ यावर्षी या कराचा दर १२% करण्यात आला आहे. प्रारंभी केवळ तीन वस्तूवर ५% कर आकारण्यात आला. कालांतराने सेवा करपात्र वस्तूंची संख्या वाढवून ती २००८-०९ च्या अर्थसंकल्पात १११ पर्यंत पोहचविली.

**५. किमान पर्यायीकर** (Minimum Alternate Tax) :

नफा कमविणाऱ्या कंपन्या कर सवलती, कर सूट आणि इतर कर वजावटी इ. चा फायदा घेऊन कर टाळीत होत्या अशा कंपन्यावर "शून्य कर कंपन्या म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. अशा कंपन्यांच्या वार्षिक ३०% बुक प्रॉफिटवर १०% किमान पर्यायीकर आकारणे १९९७-९८ पासून सुरू केले. आता या कराचा दर १२% पर्यंत वाढवून त्यांच्या दीर्घ मुदतीच्या ठेवीवरील मिळकतीचा बुक प्रॉफिटमध्ये समावेश केला आहे. परंतु आजारी कंपन्या तसेच वीज आणि आधारभूत सेवा देणाऱ्या कंपन्यांना या करातून वगळण्यात आले आहे."

**६. रोखे खरेदी विक्री व्यवहार कर** (Security Transaction Tax) :

शेअर बाजारातील रोख्यांच्या खरेदी विक्रीच्या उलाढालीवर .०१ ते .०१५ टक्क्यादरम्यान कर २००४-०५ या वर्षी आकारण्यात आला. त्यानंतरच्या काळात काही जुजबी बदल करण्यात आले.

**७. कर्मचारी सवलत कर** (Fringe Benefit Tax):

बऱ्याच कंपन्यांकडे मालक त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतनाशिवाय अनेक प्रकारच्या सवलती (उदा. देणग्या, घर, विमान प्रवास, पंचतारांकीत हॉटेलमध्ये राहण्याची सोय, मोटार, पेट्रोल इ.) देतात. या सवलतीचे बाजारातील मूल्य जास्त असून ही त्यावर कर आकारला जात नसे. एप्रिल २००६ पासून कंपनी मालकाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिल्या गेलेल्या सवलतीच्या बाजारातील मुल्याच्या ३०% कर कंपनी मालकालाच द्यावा लागणार. यालाच कर्मचारी सवलत कर म्हणतात. नंतर त्यात थोडे बदल करण्यात आले.

**८. बँकेतून रोख रक्कम काढण्याच्या व्यवहारातील कर**(Banking Transaction Tax): हा कर २००५-०६ पासून लागू करण्यात आला.

या कराचे उद्दिष्ट कर महसूल मिळविण्याचे नसून रोख रक्कम व्यवहारावर नजर ठेवून काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी या कराचे प्रयोजन करण्यात आले आहे. एका व्यक्तीने एका दिवशी रू.२५,००० पर्यंत तर अविभक्त कुटुंबातील व्यक्तीने रू. १ लाख रोख रक्कम बँकेतून काढल्यास त्यावर ०.१ टक्का कर आकारण्यात आला. जून २००७ मध्ये व्यक्ती किंवा अविभक्त कुटुंबाकडून केवळ रू. ५०,००० रोख रक्कम काढल्यास कर भरला जावा असा बदल केला. २००८-०९ च्या अर्थसंकल्पात तर तो रद्दच करण्यात आला.

**९. केंद्रीय वर्धितमूल्यकर** (CENVAT):

राज्य सरकारांना त्यांच्या विक्रीकराऐवजी राज्य वर्धितमूल्य कर लागू करणे शक्य होण्यासाठी केंद्र सरकारने केंद्रीय वर्धितमूल्य कर २००१ पासून आकारण्यात आला. अबकारी कर योग्य असलेल्या बऱ्याच वस्तूंवर १६% समान कर दर असणारा केंद्रीय वर्धितमूल्य कर आकारण्यात आला. २००८-०९ अर्थसंकल्पात हा दर १६ टक्क्यावरून १४ टक्के करण्यात आला.

याशिवाय सरल, करविवाद समाधान योजना, one-by-six योजना (नंतर रद्द करण्यात आली.) PAN इ. उपाय करून कर प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न केला. विनिर्दिष्ट कराऐवजी मुल्यानुसार कर बऱ्याचं वस्तूंवर लावण्यात आला. बचतीवर अनिष्ट परिणाम न होईल यासाठी भागभांडवल, बँक ठेवी, दीर्घ मुदतीवरील कर्ज, रोखे, ऋण पत्र इ. वरील ९३-९४ पासून संपत्ती कर रद्द केला. आर्थिक आणि सामाजिक सेवा (उदा.रस्ते, विमान तळ, मागास भागात वीज) निर्मितीसाठी केलेल्या गुंतवणुकीवर किमान पाच वर्षांपर्यंत करसुट्टी इ. उपाय करण्यात आले.

**क) कर महसूलावरील परिणाम :**

भारत सरकारने चेलिया समितीच्या शिफारशी आधारे कराचा आधार वाढविणे, कर दर कमी पण माफक करणे, कर कायद्यातील क्लिष्टता टाळणे, कर प्रशासन पारदर्शक करणे, नवीन करांची आकारणी करणे इ. उपाय करून भारतीय कररचना संतुलित किंबहुना समन्यायी आणि कार्यक्षम करण्याचा गेल्या पंधरा वर्षापासून सतत प्रयत्न केला आहे. या सर्व उपायांमुळे कर महसूलावर झालेल्या प्रभावाचा थोडक्यात तपशील पाहू.

**१. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर महसूल :**

केंद्र सरकारच्या महसूली मिळकतीचे कर महसूल हे प्रमुख साधन आहे. हा कर महसूल प्रामुख्याने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करापासून मिळतो. प्रत्यक्ष कर (उदा. प्राप्ती कर, निगम कर, संपत्ती कर, देणगी कर, व्यय कर, भांडवली नफ्यावरील कर, कर्मचारी सवलती कर इ.) उत्पन्नावर आकारल्यामुळे श्रीमंतावर या कराचा बोजा पडतो, तर अप्रत्यक्ष कर (उदा. उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, सेवा कर, वर्धितमूल्य कर इ.) वस्तू किंवा वस्तूंच्या उपभोगावर आकारला जात असल्यामुळे श्रीमंतापेक्षा सर्व सामान्यांना किंवा गरीबांना या कराचा जास्तीचा भार सोसावा लागतो. तक्ता १ मधील आकडेवारीवरून गरीब आणि श्रीमंत यांच्यावरील कर भाराचे चित्र स्पष्ट होते.

### तक्ता १ : प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष करभार

| वर्ष | प्रत्यक्ष कर | अप्रत्यक्ष कर | वर्ष | प्रत्यक्ष कर | अप्रत्यक्ष कर |
|---|---|---|---|---|---|
| ९१-९२ | २२.६ | ७५.५ | ९९.०० | ३३.७ | ६५.५ |
| ९२-९३ | २४.६ | ७३.७ | ००.०१ | ३६.२ | ६२.९ |
| ९३-९४ | २३.४ | ७६.६ | ०१.०२ | ३७.० | ६२.१ |
| ९४-९५ | २७.४ | ७२.७ | ०२.०३ | ३८.४ | ६०.७ |
| ९५-९६ | २७.२ | ७२.८ | ०३.०४ | ४१.३ | ५७.९ |
| ९६-९७ | २१.१ | ७२.९ | ०४.०५ | ४३.३ | ५६.१ |
| ९७-९८ | २८.४ | ७१.६ | ०५.०६ | ४५.१ | ५४.४ |
| ९८-९९ | ३२.२ | ६७.८ | ०६.०७ | ४८.८ | ५१.२ |

टीप : आकडे एकूण कर महसूलाशी टक्केवारी दर्शवितात.

संदर्भ : १. भारत सरकार, आर्थिक पाहणी(९१-९२ ते २००७-०८ )

२. भारत सरकार, प्राप्ती बजट (पिवळी पुस्तके) ९६-९७ ते २००८-०९

१९९१-९२ यावर्षी एकूण कर महासूलाच्या २२.६ टक्के कर महसूल केंद्र सरकारला अप्रत्यक्ष करापासून मिळत होता. त्यात २००६-०७ यावर्षी ४८.८ टक्क्यापर्यंत वाढ झाली. अप्रत्यक्ष कराच्या बाबतीत मात्र १९९१-९२ यावर्षी मिळणाऱ्या ७५.५ टक्क्यावरून २००६-०७ या वर्षी ५१.२ टक्क्यापर्यंत घट झाली. म्हणजे ९१-९२ ते २००६-०७ या काळात प्रत्यक्ष कर महसूलात २६.२ टक्क्याने वाढ झाली, तर अप्रत्यक्ष कर महसूलात १४.३ टक्क्याने घट झाली. यावरून सहज स्पष्ट होते, की नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यापासून केंद्र सरकारला श्रीमंतांवरील करांचा भार वाढवून गरीबांवरील कराचा बोजा कमी करण्यात यश मिळाले. ही बाब स्वागतार्ह असली तरी याच काळात केंद्र सरकारने श्रीमंतांपेक्षा गरीबांकडून सतत अधिक कर वसूल केला, याकडे डोळेझाक कशी करता येईल? म्हणजे एवढे उपाय करूनही आजही श्रीमंतापेक्षा गरीब कराच्या अधिक ओझ्याखाली आहे, ही बाब नाकारता येणार नाही.

**२. एकूण कर महसूल :**

केंद्र सरकारच्या कर महसूलाच्या आकडेवारीकडे (तक्ता : २) पाहिल्यास असे स्पष्ट होते, की सरकारला अपेक्षेप्रमाणे कर महसूलात वाढ करता आली नाही. १९९१-९२ या वर्षी केंद्र सरकारला चालू आणि भांडवली खात्यावरील मिळणाऱ्या एकूण महसूलाच्या ६४.४ टक्के एवढा कर महसूल मिळत होता. २००१-०२ यावर्षी तर त्यात १३ टक्क्याने घट होऊन केवळ ५१.४ टक्केच कर महसूल मिळाला. नंतरच्या काही वर्षी कर महसूलात जुजबी वाढ होऊन ते २००४-०५ यावर्षी पण ६०.२ टक्के मिळाला. १९९६-९७ च्या तुलनेत २००४-०५ मध्ये देखील कर महसूलात वाढ होण्याऐवजी ८.३ टक्क्याने घट झाली.

**तक्ता २ : केंद्र सरकारचा कर महसूल** टक्केवारी

| वर्ष | एकुण महसूल | निव्वळ महसल | वर्ष | एकुण महसूल | निव्वळ महसूल |
|---|---|---|---|---|---|
| ९१-९२ | ६४.४(१०.६) | ४७.९ | ९८.९९ | ५३.३(८.३) | ३९.३ |
| ९२-९३ | ६७.७(१०.९) | ४७.० | ९९.०० | ५८.०(८.९) | ४३.२ |
| ९३-९४ | ५७.९(९.८) | ४०.८ | ००.०१ | ५७.१(९.०) | ४१.८ |
| ९४-९५ | ५७.८ (९.६) | ४२.२ | ०१.०२ | ५१.४(८.२) | ३६.७ |
| ९५-९६ | ६६.० (९.४) | ४८.६ | ०२.०३ | ५४.२(८.८) | ४०.१ |
| ९६-९७ | ६८.५ (९.४) | ४९.९ | ०३.०४ | ५३.५(९.२) | ३९.३ |
| ९७-९८ | ६०.०(९.१) | ४१.२ | ०४.०५ | ६०.२(९.७) | ४४.४ |

टीप : आकडे एकूण महसूलाशी (चालू ओण भांडवली) टक्केवारी दर्शवितात, तर कंसातील आकडे एकुण राष्ट-ीय उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

संदर्भ : तक्ता क्रमांक १ प्रमाणे

राष्ट्रीय उत्पन्नातील या कर महसूलाचे प्रमाण ९१-९२ यावर्षी १०.६ टक्के होते, ते २००४-०५ यावर्षी ९.८ टक्केपर्यंत खाली आहे. भारताच्या या कर महसूलाच्या तुलनेत १९९८ यावर्षीच पाकिस्तान, श्रीलंका, आणि मलेशिया या देशांचा कर महसूल त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अनुक्रमे १३.५ टक्के, १४.५ टक्के आणि १५.४ टक्के (Mid Term Apprisal of 9 th F.Y. Plan P24) म्हणजे कितीतरी जास्त होता. याचा अर्थ भारताचा कर महसूल अलवचिक असल्याचे स्पष्ट होते.

**कर महसूल घटण्याची कारणे :**

केंद्र सरकारच्या कर महसूलात घट होण्याला किंबहुना कर महसूल अलवचिक होण्याला प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष कर, प्रामुख्याने सीमा शुल्क आणि उत्पादन शुल्क जबाबदार असल्याचे तक्ता ३ मधील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

**तक्ता : ३ करनिहाय महसूल** टक्केवारी

| वर्ष | निगम कर | प्राप्ती कर | सीमा शुल्क | उत्पादन शुल्क | सेवा कर |
|---|---|---|---|---|---|
| ९१-९२ | ११.७ | १०.० | ३३.०० | ४१.७ | - |
| ९२-९३ | ११.९ | १०.६ | ३१.९ | ४१.३ | - |
| ९३-९४ | १३.३ | १२.० | २९.३ | ४१.८ | - |
| ९४-९५ | १५.० | १३.० | २९.० | ४०.५ | ०.४ |
| ९५-९६ | १४.८ | १४.० | ३२.१ | ३६.१ | ०.७ |
| ९६-९७ | १४.४ | १४.१ | ३३.३ | ३४.९ | ०.८ |
| ९७-९८ | १४.३ | १२.१ | २८.७ | ३४.५ | १.१ |
| ९८-९९ | १८.१ | १४.४ | २८.७ | ३५.८ | १.३ |
| ९९-०० | १७.१ | १४.९ | २८.२ | ३६.० | १.२ |
| ००-०१ | १८.९ | १६.८ | २५.२ | ३६.३ | १.३ |
| ०१-०२ | १९.६ | १७.१ | २१.५ | ३८.८ | १.७ |
| ०२-०३ | २१.३ | १७.० | २०.७ | ३८.१ | १.१ |
| ०३-०४ | २४.९ | १६.२ | ११.१ | ३५.७ | ३.१ |
| ०४-०५ | २७.१ | १६.१ | १८.८ | ३२.५ | ४.६ |
| ०५-०६ | २७.९ | १७.९ | १७.३ | ३०.२ | ६.२ |

(टीप : आकडे एकूण कर महसूलाशी टक्केवारी दर्शवितात. संदर्भ : तक्ता १ प्रमाणे

भारताने जागतिक व्यापार संघटनेबरोबर करार केल्यामुळे आयात कर वाढ करण्यावर बंधने तर आलीच उलट भारतीय उद्योगांची जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्पर्धात्मक कुवत वाढविण्यासाठी त्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात घट करावी लागली. ९२-९३ या वर्षी ११० टक्के असलेला आयात कर दर २००५-०६ यावर्षी केवळ १५ टक्के केला (२००७-०८ या वर्षी तर १० टक्के केला) परिणामी ९२.९३ या वर्षी एकूण कर महसूलाच्या ३१.९ टक्के महसूलाच्या ३१.९ टक्के महसूल सीमा शुल्कापासून मिळत होता. तो २००५-०६ यावर्षी तर केवळ १७.३ टक्के एवढाच मिळाला. म्हणजे गेल्या पंधरा वर्षात सीमा शुल्काच्या महसूलात १५.७ टक्क्याने घट झाली. सीमा शुल्क दराच्या घटीबरोबर कर सवलतीत घट न केल्यामुळे सीमा शुल्क महसूलात एवढी मोठी घसरण झाली. कर सवलती काही मर्यादेपर्यंत कमी केल्या असत्या तर या महसूलात निश्चितच वाढ झाली असती.

उत्पादन शुल्काचे पण दर कमी केले. शिवाय सुधारित वर्धित मूल्यकर आणि केंद्रीय वर्धित मूल्यकर आकारून विभागवार कर सूट, लघु प्रमाणावरील उद्योगांना तसेच काही निवडक वस्तूंना कर वजावटी, सूट आणि इतर कर सवलतीतील बेसुमार वाढ केली.या कर सवलतीतील वाढीबरोबर कर दरात वाढ होऊ शकली नाही. भरीस भर म्हणून कारखानदारी वस्तूंचे उत्पादन बऱ्याच प्रमाणात घटल्यामुळे कराचा आधारच कमी झाला. परिणामी करदात्यांना कर टाळणे(Tax Avoidance) सहज शक्य झाले. त्याचबरोबर कर कायद्यातील क्लिष्टतेचा फायदा घेऊन खरे उत्पन्न लपवून कर बुडविण्याची (Tax Evasion) प्रवृत्तीपण बळावली. शिवाय उत्पादन कक्षेत येणाऱ्या वस्तूंवर मूल्यानुसार कर आकारण्याऐवजी विनिर्दिष्ट (Specific Tax) आकारल्यामुळे महसूल तर कमी वसूल झालाच, परंतु ज्या वस्तूवर मूल्यानुसार कर आकारला गेला त्या वस्तूचे मूल्य निर्धारण करण्यावरून तंटे आणि कोर्ट प्रकरणे वाढली. ही प्रकरणे मिटविणारी यंत्रणा अकार्यक्षम बनल्यामुळे सरकारला करोडो रूपयाच्या महसूलावर पाणी सोडावे लागले. १९९१-९२ या वर्षी उत्पादन शुल्कापासून मिळणारा ४१.७ टक्के महसूल २००५-०६ या वर्षी तर केवळ ३०.२ टक्केच मिळाला म्हणजे त्यात १७.५ टक्क्यांनी घट झाली.

सेवा क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान वाढत असूनह हे क्षेत्र कर कक्षेच्या बाहेर होते. १९९४ पासून सेवा कर लागू करून त्यांच्या कक्षेत आज घडीला सेवा क्षेत्रातील जवळजवळ १११ वस्तूंचा समावेश करून कराचा आधार वाढविण्याचा सतत प्रयत्न केला. एवढे करूनही म्हणावा तितका महसूल या करापासून मिळाला नाही. ९४-९५ या वर्षी एकूण महसूलाच्या केवळ ०.४ टक्के महसूल मिळाला, त्यात २००५-०६ या वर्षी ६.२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. महसूली वाढीचा दर जरी वाढत असला तरी सेवा कर महसूलाचे एकूण कर महसूलीतील योगदान अपेक्षेपेक्षा कमी आहे.

निगम कर आणि प्राप्ती कर यांच्या दरात बरीच घट करूनही त्यापासून मिळणाऱ्या महसूलात अनुक्रमे १६.२ टक्के आणि ७.९ टक्क्यानेच वाढ झाली. हे जरी खरं असलं तरी अप्रत्यक्ष करापासून

मिळणाऱ्या महसूलाची नुकसान भरपाई प्रत्यक्ष कराच्या महसूली वाढीमुळेहोऊ शकली नाही; हे निश्चित. या शिवाय कर पात्र करदात्यांना शाधिण्यासाठी (One-by-Six) योजना, कराविषयक तंटे मिटवण्यासाठी (PAN) कार्ड, सरल कर विवाद, समाधान योजना सुरू केल्या असल्या तरी अकार्यक्षम प्रशासन ओण त्यात भ्रष्टाचार कर महसूल कमी मिळण्याला कारणीभूत ठरले आहे. तसेच अंदाजित केलेल्या कर महसूलापेक्षा वास्तविक वसूली कमी, कर महसूलाची वाढलेली थकबाकी, आणि कर सवलती, कर सूट आणि कर वजावटी दिल्यामुळे कर महसूलाचा करावा लागलेला त्याग या बाबी देखील कर अलवचिकतेला तितक्याच जबाबदार आहेत.

१. तक्ता ४ मधील आकडेवारी अंदाजित केलेला कर महसूल सरकारला वसूल करता न आल्याचे दर्शविते. १९९७-९८ या वर्षी रू.१३९२६ कोटी तर २००१-०२ या वर्षी त्या ही पेक्षा जास्त रू.३५५८९ कोटी आणि २००४-०५ मध्ये रू.१२७७५ कोटीची वसूली करता न आल्यामुळे अंदाजित कर महसूलीचे लक्ष्य सरकार गाठू शकले नाही. कर प्रशासनातील अकार्यक्षमतेमुळेच हे घडू शकते.

**तक्ता ४ : कर महसूलाची वास्तविक (Actual) वसूली**

(रू.कोटीत)

| वर्ष | अंदाजित महसूल | वास्तविक वसूली | वसूल न झालेला महसूल |
|---|---|---|---|
| ९६-९७ | १२१४५३ | १२८७६२ | -६९१ |
| ९७-९८ | १५३३४७ | १३९२२१ | -१३९२६ |
| ९८-९९ | १४८५०६ | १४३७९७ | -४८०९ |
| ९९-०० | १६७५२६ | १७१७५२ | +४२३९ |
| ००-०१ | १९३३८४ | १८८६०३ | -४७८१ |
| ०१-०२ | २२६६४९ | १८७०६० | -३६५८९ |
| ०२-०३ | २३५८०० | २१६२६६ | -१९५३४ |
| ०३-०४ | २५१५२७ | २५४३४८ | +२८२१ |
| ०४-०५ | ३१७७३३ | ३०४९५८ | -१२७७५ |
| ०५-०६ | ३७००२५ | ३६६१५२ | -३८७३ |

टीप : +अंदाजापेक्षा वास्तविक वसूली जास्त दर्शविते.

**संदर्भ :** भारत सरकार, प्राप्ती बजट (पिवळी पुस्तके) १९९६-९७ ते २००७-०८

२. वेगवेगळ्या कर सवलती सूट, वजावटी दिल्यामुळे देखील सरकारला बऱ्याच महसूलाला मुकावे लागले हे तक्ता ५ मधील आकडेवारीवरून स्पष्ट दिसते. २००४-०५ या वर्षी रू. १५८६६१ कोटी, २००५-०६ या वर्षी रू. २०६७०० कोटी आणि २००७-०८ मध्ये रू. २७८६४४ कोटी एवढा मोठा महसूल सवलतीत भरगच्च वाढ केल्यामुळे सहज टाळता आला. २००७-०८ यावर्षी करदात्यांनी सीमा शुल्क आणि उत्पादन शुल्कासाठी दिलेल्या सवलतींचा फायदा घेऊन अनुक्रमे रू. १४८२५२ कोटी आणि रू. ८७९९२ कोटी सहजपणे भरण्याचे टाळले. म्हणजे एकूण करमहसूलाच्या जवळजवळ ५०% करमहसूल भरण्याचे टाळले गेले. एकवेळ, करदात्यांना बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि उपभोगावर अनिष्ट परिणाम न होईल या बेताने सवलती देणे समजू शकते. परंतु या भरमसाठ दिलेल्या सवलतींना आवर न घातल्यामुळे करोडो रूपयांच्या महसूलाचा सरकारी तिजोरीत भरणा झाला नाही. याला दूरदृष्टी असलेले राजकोषीय व्यवस्थापन कसे म्हणता येईल?

या सवलतींची मर्यादा मात्र सरकारला निश्चित करता आली नाही. या राजकोषीय व्यवस्थापनेतील सरकारच्या दूरदृष्टीपणाच्या अभावामुळेच एवढ्या मोठ्या कर महसूलाचा फटका बसला. परंतु जमेची बाब अशी की हा त्याग २००४-०५ च्या तुलनेत २००७-०८ यावर्षी कर महसूलाच्या ४७.९ टक्क्यापर्यंत कमी झाला.

**तक्ता ५ : भारत सरकारचा महसूली त्याग (कर खर्च)**

(रू.कोटीत)

| कर प्रकार | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ |
|---|---|---|---|---|
| निगम कर | ५७८५२ | ३४६१८ | ४५०३४ | ५८६५५ |
| प्राप्ती कर | ११६९५ | १३३५० | ३२१४३ | ४२१६१ |
| उत्पादन शुल्क | ३२४४९ | ६६७६० | ७५४७५ | ८७९९२ |
| सीमा शुल्क | ९२५६१ | १२७७३० | १३७१०५ | १४८२५२ |
| सहकार क्षेत्र | १५३४ | १६३२ | -- | -- |
| एकूण * | १५८६६१ | २०६७०० | २३९७१२ | २७८६४४ |
| | (५२.०) | (५६.४) | (५०.८) | (४७.९) |

* निर्यात उत्पादनासाठीच्या आदानावर भरलेल्या कर वजावटी वगळून.

टीप : कंसातील आकडे एकूण करमहसूलाशी टक्केवारी दर्शवितात.

**संदर्भ :** १. भारत सरकार प्राप्ती बजट २००६-०७ आणि २००८-०९

२. GoI, Statement of Revenue Foregone, Ministry of Finance, Department of Revenue, Feb-2008, P-34

३. विवादात आणि विवादात नसलेला एकूण कर महसूल सरकारला वसूल न करता आल्यामुळे झालेली कर महसूलाची थकबाकी तक्ता ६ मधील आकडेवारी दर्शविते.

तक्ता ६ : कर महसूलाची थकबाकी (रू.कोटीत)

| कर | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|
| निगम कर | ४३१३४ | ३८००४ | ३८९५५ |
| प्राप्ती कर | ५३४८० | ३७४७० | ४०१२५ |
| सीमा शुल्क | ३२२८.१६ | ३२५२.९६ | ४१०२.७८ |
| उत्पादन शुल्क | ८८६१.१४ | ११०१४.३० | १५११९.४३ |
| सेवा कर | ४०४.४८ | ५१४.६२ | ९१४.८३ |
| एकूण | १११२०७.७८ | ९०२५५.८८ | ९९२९३.०४ |

**संदर्भ : भारत सरकार, प्राप्ती बजेट (पिवळी पुस्तके) २००६-०७, २००७-०८ आणि २००८-०९**

कर कायद्याच्या क्लिष्टतेमुळे कोर्ट प्रकरणे निर्माण होऊन कर महसूल विवादात अडकल्यामुळे तो वसूल करणे सरकारला शक्य नसते. पण ज्या महसूलाविषयी विवाद नाही असा महसूल वसूल करण्यातही सरकार डोळेझाक करते. परिणामी कर महसूलाची थकबाकी वाढण्याला मदत होते. २००६-०७ या वर्षी ही थकबाकी रू. ९९२९३ कोटींची होती पण या अगोदरच्या वर्षी म्हणजे २००४-०५ यावर्षी जास्तीची रू. १११२०७ कोटींची होती. यात निगमकर, प्राप्तीकर, आणि उत्पादन शुल्क या करांचे थकबाकीचे प्रमाण अधिकच होते. २००६-०७ मधील थकबाकी वसूल केली असती तर याच वर्षी झालेली रू. ८०२२२ कोटींची महसूली तूट करावी लागली नसती, किंवा अति आवश्यक असलेल्या सेवा उदा. शिक्षण, आरोग्य आणि पिण्याचे पाणी इ. वर भरीव खर्च करणे शक्य झाले असते; आणि शिक्षणातील गळती, पाण्यासाठी जनतेची होणारी भटकंती तरी कमी झाली असती. कर प्रशासनातील अकार्यक्षमता आणि राजकारण्यांच्या दुर्बल इच्छाशक्तीमुळेच ही थकबाकी वसूल होऊ शकली नाही, हे सत्य नाकारता येणार नाही.

**३. केंद्र सरकारचा निव्वळ कर महसूल :**

केंद्र सरकारला मुळातच कमी मिळणाऱ्या एकूण करमहसूलातूनही कमीच महसूल हातात पडतो. भारतीय राज्यघटनेच्या २८० कलमानुसार दर पाच वर्षाला वित्त आयोग नेमला जातो. त्यांच्यामार्फत केंद्र सरकारच्या एकूण करमहसूलातील काही हिस्सा राज्यांना वाटप केला जाते. तो अधिक मिळावा यासाठी राज्य सरकारे सतत पाठपुरावा करीत असतात. पहिल्या ते दहाव्या वित्त आयोगांनी प्रामुख्याने प्राप्ती कर आणि उत्पादन शुल्क यांच्या करमहसूलातील हिस्सा वाटप केला. परंतु ११ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींवरून केंद्र सरकारच्या सर्व करापासून मिळणाऱ्या करमहसूलातून २९.५ टक्के महसूल वाटप केला. १२ व्या वित्त आयोगाने तर ३०.५ टक्के महसूल वाटप करण्याची शिफारस केली. एकूण कर महसूलातून राज्यांचा हिस्सा वाटप झाल्यानंतर शिल्लक उरते ती केंद्र सरकारची स्वत:ची करमहसूली मिळकत असते. तिलाच निव्वळ महसूल म्हणतात. १९९१-९२ या वर्षी केंद्र

सरकारचा निव्वळ महसूल एकूण कर महसूलाच्या ४७.९ टक्के होता; तो ९६-९७ या वर्षी जास्तीत जास्त ४९.९ टक्क्यापर्यंत वाढला परंतु नंतरच्या काळात तो यापेक्षा जास्त कधी वाढला तर नाहीच उलट २००३-०४ या वर्षी केवळ ३९.३ टक्केच मिळाला. लगेच दुसऱ्या वर्षी मात्र त्यात ५ टक्क्याची भर पडून सुधारणा झाली (तक्ता २) गेल्या पंधरा वर्षापासून केंद्र सरकारची स्वतःची कर महसूली मिळकत एकूण महसूलाच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त कधीच वाढली नाही.

वरील विश्लेषणावरून सहज लक्षात येईल की, भारतीय कररचना संतुलित होण्याच्या दिशेने सरकारने प्रयत्न केले असले तरी अपेक्षित लक्ष्य मात्र अजूनही साध्य करता आलेले नाही. समन्यायी आणि कार्यक्षम असणाऱ्या कररचनेच्या निर्मितीसाठी याहीपुढे भरीव आणि ठोस राजकोषीय निर्णय घेण्याची गरज आहे. विशेषकरून करपात्र सेवांची संख्या वाढवून त्याची व्याप्ती वाढविणे, कर सवलती, कर वजावटी, कर सुट्टी, कर सूट इ. कमी करणे, प्रत्यक्ष कर अधिक प्रगतीशील करणे, कर कायद्यात सतत होणारे बदल टाळून त्यातील क्लिष्टता कमी करणे व कर दात्यांना कर भरणे सुलभ करणे इत्यादी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. परिणामी कर सवलतीमुळे सरकारला करावा लागलेला कर त्याग (Tax Foregone) आणि थकबाकी कमी होईल. त्यामुळे कर महसूलाची लवचिकता आणि उद्‌वर्धनशीलता (Buoyancy) वाढून केंद्र सरकारच्या स्वतःच्या मालकीची कर महसूली मिळकत वाढेल आणि राजकोषीय दूरदृष्टी असणारी करचना निर्माण होईल.

संदर्भ :

1. Government of India,
Mid Term Appraisal of Ninth Five Year Plan, Planning Commission, New Delhi, October 2000

2.Government of India,
Economic Survey (various Issues) Ministry of finance, Economic Division, New Delhi.

3.Government of India,
Receipts Budget (yellow Books) 2000-01 to 2008-09

4.Government of India,
Statement of Revenue Foregone, Ministry of Finance, Department of Revenue, New Delhi, Feb. 2008

5.Government of India,
Statement laid before parliament as required under the Fiscal Responsibility and Budget Management Act, 2003, Feb. 2007 & Feb 2008

6.Government of India,
Budget at a Glance (various Issues)

7. भगवान सो. म्हस्के,
गत दशकातील केंद्रीय अर्थसंकल्पांचा आढावा, अर्थसंवाद, खंड १०, अंक १ एप्रिल -जून २००६

# महाराष्ट्र-ातील नागरीकरण : प्रवृत्ती, कारणे, परिणाम आणि आव्हाने


* रा. सुं. सोळुंके ,

प्राध्यापक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, औरंगाबाद

* ग. बा. गावंडे,

विभागप्रमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

बदनापूर, जि.जालना



मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बार्शी येथे झालेल्या ३१ व्या अधिवेशनात सादर केलेल्या या शोध निबंधाला परिषदेतर्फे दिले जाणारे ग.प्र. पिंपरकर व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती पारितोषिक प्राप्त झाले आहे.


**प्रस्तावना :**

कोणत्याही देशातील, राज्यातील अथवा जिल्ह्यातील नागरीकरणाचे काही दुष्परिणाम दिसून येत असले तरी शहरातील लोकांना ग्रामीण भागापेक्षा अधिक चांगले जीवन जगण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे जगातील प्रत्येक देशात, राज्यात अथवा जिल्ह्यात नागरीकरणाची पातळी सतत वाढत असल्याचे दिसून येते. कारण ग्रामीण भागापेक्षा नागरीभागात आर्थिक विकासाच्या अधिक सोयी सुविधा उपलब्ध असतात किंवा नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध घेऊन त्या निर्माण केल्या जातात. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरांचे महत्त्व अनन्यसाधारण असे वाढत जाते. देशाच्या आर्थिक विकासात शहरे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे नागरी भाग हा आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू बनत जातो. परिणामी भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात शहरी क्षेत्राचे योगदान आज ५० ते ५२ टक्के एवढे आहे.

गतिमान शहरीकरण होत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील दरडोई उत्पन्न, राष्ट्रीय दरडोई उत्पन्नापेक्षा ४० टक्क्यांनी अधिक आहे. यातील बहुतांश उत्पन्न नागरी भागातील द्वितीय व तृतीय म्हणजेच उद्योग व सेवा क्षेत्रातून मिळते. महाराष्ट्र राज्याच्या एकूण देशांतर्गत उत्पादनातील द्वितीय व तृतीय क्षेत्राचा हिस्सा सतत वाढत असून तो सन २००१ च्या आकडेवारीनुसार अनुक्रमे ३४.० व ५२.६ टक्के एवढा झाला आहे. एवढेच नाही तर सर्वाधिक नागरीकरण झालेल्या कोकण विभागात सन २०००-०१ व २००१-०२ यात निव्वळ जिल्हा उत्पन्नात सरासरी १४.६० टक्के एवढी वाढ झाली आहे. तर सर्वात कमी नागरीकरण झालेल्या औरंगाबाद विभागात केवळ सरासरी ८.६५ टक्के एवढीच वाढ झाली आहे. याचा अर्थ आर्थिक विकासाच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रातही शहरे ही आर्थिक विकासाची केंद्रबिंदू बनली आहेत.

कौटिल्याने शेकडो वर्षापूर्वी नागरी जीवनाचे समर्थन केले असल्याचे आढळून येते. कारण नागरीकरणाच्या प्रक्रियेतून पायाभूत सुविधांमध्ये वाढ होते. बाजारपेठा विस्तारतात, तांत्रिक क्षेत्रात बदल होतात. त्याचा कृषी क्षेत्रावर अनुकूल परिणाम होतो व आर्थिक विकासाची गती वाढते. त्यामुळे महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरूप, प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम अभ्यासण्यासाठी व प्रस्तुत शोधनिबंधात नागरीकरण म्हणजे काय? जगातील नागरीकरणाची प्रवृत्ती, भारत आणि महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या प्रवृत्तीची तुलना, भारतातील विविध राज्यातील नागरीकरणाची महाराष्ट्रातील नागरीकरणाशी तुलना, महाराष्ट्रातील नगरांचे व लोकसंख्येचे नगरांच्या श्रेणीवर आधारित वर्गीकरण, महाराष्ट्रातील महसूल विभाग निहाय व प्रदेश निहाय नागरीकरणाची प्रवृत्ती, महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या विभागीय असमतोलाची कारणे, परिणाम व आव्हाने आणि शहरांच्या विकासासाठीचे जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान इत्यादींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**नागरीकरण म्हणजे काय?**

भारतात जनगणेनुसार नागरीक्षेत्राचे पुढील निकष ठरविण्यात आले आहेत. (अ) ज्या वस्तींमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, कँटॉनमेंटस बोर्ड, स्थापन झाले आहेत, अशा वस्त्या की ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केल्या आहेत. (ब) पाच हजारापेक्षा जास्त लोकसंख्या, दर चौ.कि.मी. ला ४०० पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्व आणि बिगर कृषी व्यवसायात ७५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे नागरी क्षेत्र होय.

**१. नेल्स अंडरसन :-** ''ज्या ठिकाणी उद्योगशीलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवनपध्दती नवीन तयार होते त्यास नागरीकरण असे म्हणतात.''

**२. डॉ. माजिद हुसैन :-** ''नागरीकरण म्हणजे नगरे आणि शहरांमध्ये लोकसंख्येचे केंद्रीकरण घडून येणे होय.''

**३. संयुक्त राष्ट्र संघटना : -** ''नागरीकरण हे ग्रामीण वस्तीचे स्थलांतर आहे. व्यवसायाचे तसेच उत्पादनाचे स्थलांतरण आहे.''

४. **आशिष बोस :-** ''नागरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतराची प्रक्रिया होय.''

५. **ओल्सन:-** ''खेड्यातील लोक नगराकडे जाणे म्हणजे नागरीकरण होय.''

ज्याप्रमाणे नागरीकरणाचा अभ्यास करणाऱ्या अनेक तज्ज्ञांनी नागरीकरणाच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. त्याचप्रमाणे नागरीकरणाचे मोजमाप करण्यासाठी नागरीकरणाच्या मोजमापाच्या अनेक पध्दती अनेक तज्ज्ञांनी सांगितल्या आहेत.

१) त्यापैकी नागरीभागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण

२) नागरी-ग्रामीण लोकसंख्या प्रमाण

३) नागरीकरणाची गती या तीन पध्दतींचा वापर या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील नगरांचे व नागरी लोकसंख्येचे नगरांच्या श्रेणीवर आधारित वर्गीकरण अभ्यासण्यासाठी शहरी लोकसंख्येच्या आकारावरून शहरांचे करण्यात आलेले वर्ग तक्ता क्र. १ मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता क्र. १**

**शहरी लोकसंख्येच्या आकारावरून शहरांचे वर्ग**

| वर्ग | लोकसंख्येचा आकार |
|---|---|
| वर्ग-१ | १,००,००० व त्यावरील |
| वर्ग-२ | ५०,००० ते ९९,९९९ |
| वर्ग-३ | २०,००० ते ४९,९९९ |
| वर्ग-४ | १०,००० ते १९,९९९ |
| वर्ग-५ | ५००० ते ९,९९९ |
| वर्ग-६ | ५००० पेक्षा कमी |

संदर्भ - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१- २००२

**जगातील नागरीकरणाची प्रवृत्ती :-**

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यु.एन.डी.पी.) यांच्या वतीने जगातील १७७ देशांतील नागरी लोकसंख्येची सन १९७५ ते २०१५ पर्यंतची आकडेवारी संकलित करण्यात आली. सन २००३ च्या आकडेवारीनुसार विकसित देशात नागरी लोकसंख्येचे प्रमाण अति अधिक प्रमाणात आहे. उदा. ऑस्ट्रेलिया ९१.९ टक्के, न्यूझिलंड ८५.९ टक्के, तर उलट अल्प विकसित देशात नागरी लोकसंख्येचे प्रमाण अतिशय कमी प्रमाणात आहे. उदा. इजिप्त ४२.२, भारत २८.३ व बांग्लादेश २४.३ टक्के.

पुढील तक्ता क्र. २ मध्ये जगातील देशांचे विविध आधारावर वर्गीकरण करून नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण दर्शविले आहे.

### तक्ता क्र.२

### जगातील विविध देशातील नागरीकरणाची प्रवृत्ती : १९७५-२०१५

| अ.क्र | देशांचे गट | नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण | | | सन १९७५ ते २००३ मधील फरक |
|---|---|---|---|---|---|
| | | १९७५ | २००३ | २०१५ | |
| १. | विकसनशील देश | २६.४ | ४२.० | ४८.६ | १५.६ |
| २. | अल्प विकसीत देश | १४.८ | २६.७ | ३३.५ | ११.९ |
| ३. | अरब राष्ट्रे | ४१.७ | ५४.७ | ५९.१ | १३.० |
| ४. | पूर्व आशिया आणि पॅसिफिक | २०.४ | ४१.० | ५१.० | २०.६ |
| ५. | लॅटीन अमेरिका आणि कॅरिब्बीयन | ६१.१ | ७६.७ | ८०.९ | १५.६ |
| ६. | दक्षिण आशिया | २१.३ | २९.८ | ३४.२ | ८.५ |
| ७. | सब सहारन अफ्रिका | २१.० | ३५.६ | ४२.४ | १४.६ |
| ८. | केंद्रीय व पूर्व युरोप आणि सी.आय.एस | ५६.८ | ६२.९ | ६३.८ | ६.१ |
| ९. | ओ.ई.सी.डी. | ६७.२ | ७५.९ | ७८.९ | ८.७ |
| १०. | उच्च उत्पन्न ओ.ई.सी.डी. | ६९.९ | ७७.५ | ८०.४ | ७.६ |
| ११. | उच्च मानव विकास | ६८.७ | ७७.२ | ८०.१ | ८.५ |
| १२. | मध्य मानव विकास | २७.९ | ४२.२ | ४८.६ | १४.३ |
| १३. | कमी मानव विकास | १८.२ | ३४.० | ४१.७ | १५.८ |
| १४. | उच्च उत्पन्न | ७०.१ | ७८.० | ८०.८ | ७.९ |
| १५. | मध्यम उत्पन्न | ३४.८ | ५२.९ | ६०.७ | १८.१ |
| १६. | कमी उत्पन्न | २०.७ | ३०.२ | ३५.७ | ९.५ |
| १७. | जग | ३७.२ | ४८.३ | ५३.५ | ११.१ |

**संदर्भ :** UNDP - Human Development Report -२००५ Page No.२३५

तक्ता क्र.२ वरून असे निदर्शनास येते की, सन १९७५ मध्ये जगातील ३७.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करीत होती. त्यामध्ये वाढ होऊन सन २००३ मध्ये हे प्रमाण ४८.३ टक्के एवढे झाले. तर सन २०१५ मध्ये जगातील नागरी लोकसंख्येचे हेच प्रमाण ५३.५ टक्के एवढे होईल असा अंदाज आहे. याचा अर्थ सन १९७५ ते सन २०१५ या ४० वर्षाच्या कालावधीत जगातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण १६.३ टक्के एवढे वाढेल. असे जगातील नागरी लोकसंख्येच्या प्रवृत्तीवरून दिसून येते.

तसेच तक्ता क्र.२ वरून असेही निदर्शनास येते की, सन १९७५ मध्ये उच्च उत्पन्न, मध्यम उत्पन्न व कमी उत्पन्न प्राप्त गटातील देशात

नागरी लोकसंख्येचे प्रमाण हे अनुक्रमे ७०.१, ३४.८ व २०.७ टक्के एवढे होते. त्यामध्ये वाढ होऊन सद २००३ मध्ये ते अनुक्रमे ७८.०, ५२.९ व ३०.२ टक्के एवढे झाले आहे. सन -१९७५ ते सन २०१५ या ४० वर्षाच्या कालावधीचा विचार केल्यास जगातील उच्च उत्पन्न, मध्यम उत्पन्न प्राप्त देशातील नागरी लोकसंख्येच्याा प्रमाणात अनुक्रमे १०.७ टक्के, २६.० टक्के व १५.० टक्के एवढी वाढ होईल. म्हणजे अर्थिक प्रगती आणि नागरीकरणाचा विचार केल्यास असे दिसून येते की, जे देश उच्च उत्पन्न प्राप्ती गटात येतात म्हणजे ज्यांची अर्थिक प्रगती झाली आहे. त्या देशात नागरीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. याउलट जे देश कमी उत्पन्न प्राप्ती गटात येतात, म्हणजे ज्यांची अर्थिक प्रगती झाली नाही. त्या देशात नागरीकरणाचे प्रमाण कमी आहे. याचा अर्थ नागरीकरण हा अर्थिक प्रक्रियेवर अवलंबून असणारा आणि अर्थिक प्रगतीनुसार बदलणारा चल घटक आहे असे दिसून येते.

**तक्ता क्र. ३**

**भारत आणि महाराष्ट्रातील नागरीकरणाची प्रवृत्ती : १९६१ - २००१**

| देश/राज्य | घटक | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | एकूण लोकसंख्या कोटीत | ३.९६ | ५.०४ | ६.२८ | ७.८९ | ९.६९ |
| | नागरी लोकसंख्या कोटीत | १.१२ | १.५७ | २.२० | ३.०५ | ४.११ |
| | ग्रामीण लोकसंख्या कोटीत | २.८४ | ३.४७ | ४.०८ | ४.८४ | ५.५७ |
| | नागरी-ग्रामीण लोकसंख्येचे गुणोत्तर प्रमाण | १:२.५ | १:२.२ | १:१.९ | १:१.६ | १:१.४ |
| | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण | २८.२ | ३१.१ | ३५.० | ३८.७ | ४२.४ |
| | एकूण लोकसंख्येतील दशवार्षिक वाढीचे प्रतिशतप्रमाण | २३.६० | २७.४५ | २४.५४ | २५.७३ | २२.७३ |
| | नागरी लोकसंख्येतील दशवार्षिक वाढीचे प्रतिशत | - | ४०.८ | ४०.०० | ३८.९ | ३४.३ |
| | ग्रामीण लोकसंख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दीदर | - | २२.१८ | १७.६ | १८.६३ | १५.१ |
| | शहरांची संख्या | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ |
| | शहरांच्या संख्येतल दशवार्षिक वाढ | - | २३ | १८ | २९ | ४२ |
| | शहरांच्या संख्येतील दशवार्षिकप्रतिशत वृध्दीदर | - | ८.६५ | ६.२३ | ९.४४ | १२.५ |
| भारत | एकूण लोकसंख्या कोटीत | ४३.९२ | ५४.८२ | ६८.५२ | ८४.६३ | १०३.८६ |
| | नागरी लोकसंख्या कोटीत | ७.८३ | १०.८३ | १५.८२ | २१.५७ | २८.५४ |
| | ग्रामीण लोकसंख्या कोटीत | ३६.१ | ४३.९९ | ५२.७० | ६२.७६ | ७४.३२ |
| | नागरी-ग्रामीण लोकसंख्येचे गुणोत्तर प्रमाण | १:४.६ | १:४.१ | १:३.३ | १:२.९ | १:२:६ |
| | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण | १८.० | १९.९ | २३.३ | २५.७ | २७.८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत | एकूण लोकसंख्येतील दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण | २१.५१ | २४.८० | २५.०० | २३.८५ | २१.५४ |
| | नागरी लोकसंख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दीवर | – | ३८.३१ | ४६.१ | ३६.३५ | ३२.३१ |
| | ग्रामीण लोकसंख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दीवर | – | २१.८९ | १९.८० | १९.०९ | १८.४२ |
| | शहरांची संख्या | २६५७ | ३०८१ | ३९७१ | ४६१५ | ५१६१ |
| | शहरांच्या संख्येतील दशवार्षिक वाढ | – | ४२४ | ८९० | ६४४ | ५४६ |
| | शहरांच्या संख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दीदर | – | १५.९६ | २८.८९ | १६.२१ | १०.५८ |

संदर्भ : १. महाराष्ट्र मानव विकास अहवाल – २००२
२. महाराष्ट्राची अर्थिक पाहणी १९९५–९६ ते २००५–०६
३. भारत –२००२
४. Government of India, "Maharashtra Development Report" 2007

तक्ता क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की,

१. सन २००१ मध्ये भारतात जेवढे नागरी लोकसंख्येचे प्रमाण (२७.८ टक्के) होते. त्यापेक्षा अधिक नागरी लोकसंख्येचे प्रमाण (२८.२ टक्के) महाराष्ट्रात ४० वर्षापूर्वी म्हणजेच १९६१ मध्ये होते.

२. सन १९६१ मध्ये महाराष्ट्रातील २८.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करीत होती. त्यामध्ये वेगाने वाढ होऊन हेच प्रमाण सन २००१ मध्ये ४२.४ टक्के एवढे झाले आहे. याच कालावधीत भारतातील राष्ट्रीय पातळीवरील नागरीकरणाचे प्रमाण १८.० टक्के वरून २७.८ टक्के एवढे झाले आहे. म्हणजे मागील चार दशकात महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या प्रतिशत प्रमाणात १४.२ टक्के एवढी तर राष्ट्रीय पातळीवरील नागरीकरणाच्या प्रतिशत प्रमाणात ९.८ टक्के एवढी वाढ झाली आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या वाढीचे प्रमाणही भारतातील राष्ट्रीय पातळीवरील नागरीकरणाच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा वेगाने वाढत आहे.

३. परंतु महाराष्ट्रातील शहरांच्या संख्येतील दशकीय प्रतिशत वृध्दी दर हा राष्ट्रीय पातळीवरील शहराच्या संख्येतील दशकीय प्रतिशत वृध्दी दरापेक्षा कमी आहे. कारण महाराष्ट्रात सन १९६१ ते २००१ या कालावधीत शहरांच्या संख्येतील प्रतिशत वृध्दीदर ६.२३ ते १२.५० टक्के या दरम्यान वाढला आहे. तर राष्ट्रीय पातळीवरील शहरांच्या संख्येतील प्रतिशत वृध्दी दर १०.५८ ते २८.८९ टक्के या दरम्यान वाढला आहे. त्यामुळे मोठ्या शहरांची संख्या महाराष्ट्रात झपाट्याने वाढत आहे हे सिध्द होते. थोडक्यात महाराष्ट्रातील शहराच्या संख्येत निम्पटी पेक्षाही कमी प्रमाणात वाढ झाली आहे. तर भारतातील शहराच्या संख्येत जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या शहरांची संख्या व शहरातील गर्दीचा प्रश्न वाढला आहे. परिणामी शहरातील मूलभूत सोयी सुविधांवर ताण निर्माण झाला आहे.

४. सन १९७१ चा अपवाद वगळता महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दी दर हा राष्ट्रीय पातळीवरील नागरी लोकसंख्येतील दशवार्षिक प्रतिशत वृध्दी दरापेक्षा अधिक आहे.

५. सन २००१ मध्ये भारतात नागरी ग्रामीण लोकसंख्येचे गुणोत्तर प्रमाण १:२:६ एवढे आहे. तर महाराष्ट्रात हे गुणोत्तर प्रमाण १:१.४ एवढे कमी आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या नागरी-ग्रामीण गुणोत्तराच्या घटीचा विचार केल्यास असे दिसून येते की, अल्पावधीतच महाराष्ट्रातील हे गुणोत्तर प्रमाण १:१ असे होईल.

### तक्ता क्र.४

## भारतातील विविध राज्यातील नागरी लोकसंख्येचे राज्यातील एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण : सन १९६१-२०००

| अ.क्र | राज्ये | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | १९६१ ते ०१ मधील फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | १७.४४ | १९.३५ | २३.३ | २६.८९ | २७.३० | ९.८६ |
| २. | आसाम | ९.३७ | ८.३२ | – | ११.१० | १२.९० | ५.५३ |
| ३. | बिहार | ८.४३ | १०.०४ | १२.५ | १३.१४ | १०.४६ | २.०३ |
| ४. | गुजरात | २५.७७ | २८.१३ | ३१.१ | ३४.४९ | ३७.३६ | ११.५९ |
| ५. | हरियाणा | १७.२३ | १७.२८ | २२.० | २४.६३ | २८.९२ | ११.६९ |
| ६. | हिमाचल प्रदेश | ६.३४ | ७.०६ | ७.७ | ८.६९ | ९.८० | ३.४६ |
| ७. | जम्मू व कश्मीर | १६.६० | १८.२६ | – | – | २४.८१ | ८.२१ |
| ८. | केरळ | १५.११ | १६.२८ | १८.८ | २६.६९ | २५.९६ | १०.८५ |
| ९. | मध्यप्रदेश | १४.२९ | १६.२६ | २०.३ | २३.१८ | २६.४६ | १२.१७ |
| १०. | महाराष्ट्र | २८.२२ | ३१.२० | ३५.० | ३८.६९ | ४२.४३ | १४.२१ |
| ११. | कर्नाटक | २२.२३ | २४.३१ | २८.९ | ३०.९२ | ३३.९९ | ११.७६ |
| १२. | ओरिसा | ६.३२ | ८.२७ | ११.८ | १३.३८ | १४.९९ | ८.६७ |
| १३. | पंजाब | २३.०६ | २३.८० | २७.७ | २९.५५ | ३३.९२ | १०.८६ |
| १४. | राजस्थान | १६.२८ | १६.६१ | २०.९ | २२.८८ | २३.३९ | ७.११ |
| १५. | तमिळनाडू | २६.६९ | ३०.२८ | ३३.० | ३४.१५ | ४४.०४ | १७.३५ |
| १६. | उत्तरप्रदेश | १२.८५ | १४.०० | १८.० | १९.८४ | २०.७८ | ७.९३ |
| १७. | पश्चिम बंगाल | २४.४५ | २४.५९ | २६.५ | २७.४८ | २७.९४ | ३.५२ |
|  | भारत | १७.०८ | १९.८९ | २३.७ | २५.७३ | २७.८२ | १०.७४ |

संदर्भ : १. N.Jayapalan (2002) "Urban Sociology, Atlantic publishess and distributors", New Delhi, page No. 18

२. रूद्रदत्त के.पी.एम.सुंदरम (२००१) भारतीय अर्थव्यवस्था, पान क्र.३३

३. महाराष्ट्राची अर्थिक पाहणी १९९५- ते २००५-०६

तक्ता क्र. ४ वरून असे निदर्शनास येते की, सन १९६१ ते २००१ या चाळीस वर्षांच्या कालावधीत भारतातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण अतिशय मंद गतीने म्हणजे केवळ १०.७४टक्के एवढेच वाढले आहे. तर याच कालावधीत महाराष्ट्र व तामिळनाडूतील नागरी लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे १४.२१ टक्के व १७.३५ टक्के वाढले आहे. सन १९६१–१९९१ या कालावधीत महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वाधिक नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण असलेले राज्य होते. परंतु १९९१ ते २००१ या कालावधीत तामिळनाडू राज्याने नागरी लोकसंख्येच्या प्रतिशत प्रमाणाच्या बाबतीत महाराष्ट्राला मागे टाकले. त्यामुळे महाराष्ट्राला नागरी लोकसंख्येच्या प्रतिशत प्रमाणाच्या बाबतीत आपले प्रथम स्थान गमवावे लागले. सन २००१ च्या आकडेवारीनुसार नागरी लोकसंख्येच्या प्रमाणाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या खालोखाल गुजरात (३७.३६), कर्नाटक (३३.९२) व हरियाणा (२८.९२) या राज्यांचा क्रमांक लागतो. भारतात हिमाचल प्रदेश हे सर्वात कमी नागरी लोकसंख्येचे प्रमाण (९.८०) असलेले राज्य आहे. महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण जवळपास उत्तरप्रदेश पेक्षा दुपटीने ओरिसापेक्षा तिपटीने आणि बिहार व हिमाचल प्रदेश पेक्षा चौपटीने अधिक आहे.

**तक्ता क्र. ५**

**महाराष्ट्रातील शहरांचे आकारवर्गानुसार प्रमाण सन १९६१–२००१**

| शहरांचे वर्ग | शहरांचे वर्गानुसार प्रमाण | | | | | दशकीय वृध्दीदर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | १९६१ – ७१ | १९७१ – ८१ | १९८१ – ९१ | १९९१ – ०१ |
| वर्ग–१ | ४.५ | ५.९ | ९.४ | ९.८ | १०.६ | ३.५ | ५.३ | १.३ | १.९ |
| वर्ग–२ | ५.६ | ८.७ | ८.१ | ८.९ | ११.६ | ५.१ | ०.० | १.८ | ३.८ |
| वर्ग–३ | १७.७ | २२.५ | २९.० | ३३.९ | ३५.४ | ३.२ | ३.१ | २.५ | १.६ |
| वर्ग–४ | ३३.५ | ३३.९ | ३२.६ | ३०.४ | २७.० | १.० | ०.२ | ०.२ | ०.० |
| वर्ग–५ | ३३.१ | २४.२ | १५.६ | १३.७ | १३.२ | –२.३ | –३.८ | –०.४ | ०.८ |
| वर्ग–६ | ५.६ | ४.८ | ५.२ | ३.३ | २.१ | –०.७ | १.३ | –३.७ | –३.२ |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | – | – | – | – |
| शहरांची संख्या | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ०.८ | ०.६ | ०.९ | १.२ |

संदर्भ :– Govt. of India, "Maharashtra Development Report" - 2007

तक्ता क्र.५ वरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रात सन १९६१ ते २००१ या ४ दशकाच्या कालावधीत वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ मधील नगरांचे महाराष्ट्रातील एकूण नगरातील प्रतिशत प्रमाण वाढत गेले आहे. तर वर्ग-४, वर्ग-५ व वर्ग-६ मधील नगरांचे महाराष्ट्रातील एकूण नगरातील प्रतिशत प्रमाण सतत घटत गेले आहे. सन १९६१ मध्ये महाराष्ट्रातील वर्ग-१ मधील नगरांचे प्रमाण ४.५ टक्के एवढे होते, ते सन २००१ मध्ये १०.६ टक्के एवढे झाले.

विशेष महत्त्वाची बाब म्हणजे सन १९६१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रातील वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ मधील नगरांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. तर याउलट महाराष्ट्रातील वर्ग-५ व वर्ग-६ मधील नगरांचे प्रमाण अडीच पटीने घडले आहे.

**तक्ता क्र.६**

**महाराष्ट्रातील शहरांचे आकारवर्गानुसार नागरी लोकसंख्येचे प्रमाण सन १९६१-२००१**

| शहरांचे वर्ग | नागरी लोकसंख्येचे प्रमाण | | | | | दशकीय वृध्दीदर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | १९६१-१९७१ | १९७१-१९८१ | १९८१-१९९१ | १९९१-२००१ |
| लोकसंख्या (कोटीत) | १.१२ | १.५७ | २.२० | ३.०५ | ४.११ | ३.४ | ३.४ | ३.३ | २.९ |
| वर्ग-१ | ६५.८ | ७०.७ | ७५.३ | ७७.८ | ७९.८ | ४.१ | ४.० | ३.६ | ३.२ |
| वर्ग-२ | ६.९ | ७.४ | ५.९ | ६.५ | ६.७ | ४.१ | १.२ | ४.२ | ३.२ |
| वर्ग-३ | ११.४ | १०.६ | ११.० | १०.४ | ९.४ | २.७ | ३.७ | २.७ | २.० |
| वर्ग-४ | १०.८ | ८.३ | ६.१ | ४.१ | ३.३ | ०.८ | ०.१ | -०.५ | ०.७ |
| वर्ग-५ | ४.७ | २.७ | १.५ | १.० | ०.८ | -२.० | -२.४ | -०.७ | ०.९ |
| वर्ग-६ | ०.५ | ०.३ | ०.२ | ०.१ | ०.१ | -१.३ | १.६ | -३.५ | -२.७ |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | - | - | - | - |

संदर्भ :-Govt. of India,'Maharashtra Development Report'-२००७

तक्ता क्र.६ वरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील शहरांच्या आकारवर्गानुसार वर्ग - १ मध्ये म्हणजे १ लाखा पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरात सन १९६१ मध्ये ६५.८ टक्के एवढी लोकसंख्या राहत होती. त्यामध्ये वाढ होऊन ते प्रमाण सन २००१ मध्ये ७९.७ टक्के एवढे झाले आहे.याच कालावधीत वर्ग-२ व वर्ग-३ मध्ये हे नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण जवळपास स्थिर आहे. परंतु, वर्ग-४, वर्ग-५ व वर्ग-६ मध्ये हे प्रमाण सातत्याने घटत गेले आहे.

सन १९६१ मध्ये महाराष्ट्रातील वर्ग-१ मधील नगरांचे प्रमाण ४.५ टक्के एवढे होते व त्यामध्ये ६५.८ टक्के नागरी लोकसंख्या वास्तव्य करीत होती. सन २००१ मध्ये वर्ग-१ मधील

नगरांचे प्रमाण १०.६ टक्के एवढे झाले व त्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या नागरी लोकसंख्येचे प्रमाण ७९.७ टक्के एवढे झाले. म्हणजे केवळ महाराष्ट्रातील वर्ग-१ श्रेणीच्या १०.६ टक्के नगरांचे प्रमाण असलेल्या नगरांमध्ये एकूण नागरी लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकसंख्या केंद्रित झाली आहे व इतर जवळपास ९० टक्के नगरात केवळ २० टक्के नागरी लोकसंख्या विखुरलेली आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील मोठ्या शहरांची संख्या व मोठ्या शहरात केंद्रित होणारी लोकसंख्या तीव्र गतीने वाढत आहे. म्हणजे महाराष्ट्रातील लोकसंख्येची प्रवृत्ती मोठ्या नगरात केंद्रित होण्याची आहे. याचे कारण म्हणजे वर्ग-१ मधील शहरे ही प्रशासकीय आर्थिक प्रक्रियाची केंद्रे बनली आहेत.

**तक्ता क्र.७**

**महाराष्ट्रातील शहरांच्या आकारवर्गानुसार नागरी लोकसंख्येचे अवशोषण (Absorption) प्रमाण वृध्दीदर : सन १९६१-२००१**

| शहराचे वर्ग | लोकसंख्या अवशोषण/विलयन (Absorption) प्रमाण वृध्दीदर | | | |
|---|---|---|---|---|
| | १९६१-१९७१ | १९७१-१९८१ | १९८१-१९९१ | १९९१-२००१ |
| लोकसंख्या (कोटीत) | ०.४५ | ०.६३ | ०.८५ | १.०५ |
| वर्ग-१ | ८२.७ | ८६.८ | ८४.४ | ८५.२ |
| वर्ग-२ | ८.६ | २.३ | ७.९ | ७.२ |
| वर्ग-३ | ८.७ | ११.९ | ८.९ | ६.६ |
| वर्ग-४ | २.३ | ०.३ | -०.८ | ०.९ |
| वर्ग-५ | -२.१ | -१.०४ | -०.३ | -०.३ |
| वर्ग-६ | -०.१ | ०.१ | -०.२ | -०.१ |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० |

संदर्भ :- **Govt. of India, Maharashtra Development Report** २००७ पान क्र. ३२३

तक्ता क्र.७ वरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रात सन १९६१-७१ या कालावधीत वर्ग - १ मधील शहरांचा लोकसंख्या अवशोषण/विलयन वृध्दी दर ८२.७ टक्के एवढा होता. तर तो वाढून सन १९९१-०१ मध्ये ८५.२ टक्के एवढा झाला. वर्ग-२ व वर्ग-३ मध्ये तो जवळपास स्थिर आहे तर वर्ग-४ वर्ग-५ व वर्ग-६ मध्ये तो अतिशय कमी किंवा वजा आहे. म्हणजे श्रेणी वर्ग-१ मध्ये ८५ टक्के लोकसंख्या अवशोषण/विलयन होत आहे. तर इतर सर्व श्रेणी मधील वर्गात केवळ १५ टक्के लोकसंख्या अवशोषण/विलयन होत आहे. याचा अर्थ मोठ्या शहरातच लोकसंख्या अति अधिक प्रमाणात विलयन होत आहे. त्यामुळे मोठ्या शहरात उपलब्ध सोयी सुविधांवर ताण निर्माण होत आहे. परिणामी या नगरात स्त्री पुरूष प्रमाणावर व झोपडपट्टीवर वाढ होऊन त्याचा नागरी भागातील गरीबी, बेरोजगारी, साक्षरता दर, स्त्री साक्षरता दर, जन्मदर, बालमृत्यू दर यावरही प्रतिकूल परिणाम होत आहे.

## तक्ता क्र.८

## महाराष्ट्रातील महसूल विभाग निहाय व प्रदेश निहाय नागरीकरणाची प्रवृत्ती: सन १९८१-२००१

| अ.क्र. | महसूल विभाग किंवा प्रदेश | नागरी लोकसंख्येचे प्रमाण | | | १९८१ते१९९१ मधील फरक | १९९१ ते २००१ मधील | १९८१ ते २००१ मधीलफरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९८१ | १९९१ | २००१ | | | |
| १. | कोकण | ६६.४ | ७१.६ | ७५.१ | ५.२ | ३.५ | ८.७ |
| २. | नाशिक | २२.१ | २५.६ | २८.२ | ३.५ | २.६ | ६.१ |
| ३. | पुणे | ३०.५ | ३२.३ | ३७.५ | १.८ | ५.२ | ७.० |
| ४. | पश्चिम महाराष्ट्र | ४२.४ | ४६.२ | ५०.५ | ३.८ | ४.३ | ८.१ |
| ५. | औरंगाबाद विभाग/मराठवाडा | १८.६ | २१.९ | २४.६ | ३.३ | २.७ | ६.० |
| ६. | अमरावती | २२.२ | २५.० | २६.५ | २.८ | १.५ | ४.३ |
| ७. | नागपूर | २९.७ | ३५.० | ३७.१ | ५.३ | २.१ | ७.४ |
| ८. | विदर्भ | २५.९ | ३०.२ | ३२.२ | ४.३ | २.० | ६.३ |
| ९. | महाराष्ट्र | ३५.० | ३८.७ | ४२.४ | ३.७ | ३.७ | ७.४ |

**संदर्भ** :- १. Govt. of India, Maharashtra Development Report 2007

२. महाराष्ट्राची अर्थिक पाहणी २००५-२००६

तक्ता क्र. ८ वरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रात सन २००१ मध्ये जेवढे नागरीकरणाचे प्रमाण (४२.४) आहे, अगदी तेवढेच नागरीरकरणाचे प्रमाण (४२.४) पश्चिम महाराष्ट्रात दोन दशकापूर्वी म्हणजे सन १९८१ मध्ये होते. सन २००१ नुसार पश्चिम महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण एक द्वितीअंश पेक्षा अधिक आहे. तर विदर्भ मराठवाड्यातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण जवळपास अनुक्रमे १/३ व १/४ एवढे कमी होते.

महसूल विभाग निहाय महाराष्ट्रातील नागरी करणाचा विचार केल्यास कोकण विभागात सर्वाधिक नागरी करणाचे प्रमाण (७५.१) आहे. तर औरंगाबाद विभागात सर्वात कमी नागरीकरणाचे प्रमाण (२४.६) आहे. कोकण आणि औरंगाबाद विभागाची तुलना केल्यास असे दिसते की, औरंगाबाद विभागापेक्षा कोकण विभागात तिपटीपेक्षाही अधिक प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि विदर्भातील नागपूर विभागात नागरीकरणाचे स्वरूप व प्रवृत्ती जवळपास सारखी आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात नागरीकरणाचे स्वरूप आणि प्रवृत्ती यामध्ये विभागीय असमतोल मोठ्या प्रमाणात आहे.

### महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या विभागीय असमतोलाची कारणे -

**१. महाराष्ट्राचा पूर्व भाग :-** महाराष्ट्रात पूर्व भागात घनदाट वनाच्छादनामुळे व सह्याद्रीच्या पर्वतरांगामुळे शहरांची संख्या अत्यल्प आहे. तसेच या भागात लोकसंख्येची घनता कमी, कारखानदारीचा अभाव व पिकाच्या दृष्टीने अनुत्पादक जमीन यामुळे या भागात नगरांचा विकास होऊ शकला नाही.

**२.मुंबई-ठाणे-पुणे-कोल्हापूर नागरी पट्टा-** (कोकण विभाग)महाराष्ट्रातील सर्वाधिक

शहरीकरण या पट्ट्यात झालेले दिसते. ठाणे, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर व नवी मुंबई यांचे मिळून प्रमहानगर तयार झालेले आहे. हा संपूर्ण परिसर महाराष्ट्राचे प्रमुख औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखला जातो. या प्रमहानगरात वेगवेगळ्या आर्थिक क्रिया अत्यंत सखोल पध्दतीने केल्या जातात. त्यामुळे लाखो लोक मुंबई प्रमहानगर परिसरात कामधंद्याच्या निमित्ताने दैनिक प्रवास करतात व स्थलांतर होतात. तसेच रेल्वे व रस्त्यांच्या विकासामुळे या परिसराच्या आजूबाजूने अनेक लहान नगरे व नागरी वसाहती विकसित झालेल्या दिसतात.

पुणे महानगरात कोयना प्रकल्पामुळे विद्युत पुरवठ्याची समस्या सुटली. तर पानशेत व पवना धरणामुळे मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा होऊ लागला. परिणामी पुणे लोणावळा महामार्ग व रेल्वे रस्त्यांच्या दोन्ही बाजूला कारखानदारीचा जलद गतीने विकास होत गेला. जलद औद्योगिकीकरणामुळे पुणे महागनराच्या सभोवतालच्या वस्त्या शहरात परिवर्तीत झाल्या. सातारा, कोल्हापूर आणि सांगली या शहरी पट्ट्याच्या विकासाचा साखर उद्योग हा मुख्य पाया आहे. कारण हा संपूर्ण भाग ऊस उत्पादक क्षेत्र म्हणून ओळखला जातो.

**३. नाशिक-मालेगाव-जळगाव-धुळे-भुसावळ-अकोला-नागपूर नागरी पट्टा** : या शहरी पट्ट्याच्या विकासात मुंबई कोलकत्ता रेल्वे मार्ग व राष्ट्रीय महामार्ग यांचा महत्त्वाचा वाटा आहे. नाशिकपासून नागपूरपर्यंत संपूर्ण पट्ट्यात द्राक्षे, कांदा, भाजीपाला, केळी, कापूस व संत्री यासारख्या नगदी पिकाबरोबरच धान्य पिके यांचे उत्पादन शहरांच्या वाढीसाठी महत्त्वाची ठरले आहे.

**(नाशिक):-** मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर व मुंबई कोलकत्ता रेल्वे मार्गावर नाशिक नागरी केंद्राचा विकास झाला. या शहरी केंद्राच्या विकासात गोदावरी नदीवरील गंगापूर धरणापासून शेतीसाठी व कारखान्यासाठी होणारा पाणीपुरवठा, गोदावरी खोऱ्यातील सुपीक मृदा, वाहतुकीची सुगमता हे भौगोलिक घटक कारणीभूत आहेत. या ठिकाणी देवळाली येथील लष्करी छावणी, ओझर येथील मिग विमानाचा कारखाना व नाशिक येथील सरकारी टाकसाळ इत्यादींचा सहभाग नाशिक शहरी केंद्राच्या विकासात दिसून येतो.

**(नागपूर नागरी केंद्र):-** नागपूर हे प्रशासकीय विभागाचे मुख्य स्थान आहे. आज महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून या शहराला दर्जा प्राप्त झाला आहे. पूर्व रेल्वे मार्गावरील हे महत्त्वाचे केंद्र असल्यामुळे हे शहर विकसीत झाले आहे. या शहरी केंद्राच्या ५० ते ६० कि.मी. अंतरावरील परिसरात कामटी, रामटेक, कमलेश्वर, सावनेश्वर, खापा आणि मोटापा ही खाण क्षेत्रातील नगरे वसली आहेत. नागपूर हे संत्रा बाजारपेठेचे केंद्र म्हणून प्रसिध्द आहे.

थोडक्यात महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या विभागीय असमतोल विकासात भौगोलिक, आर्थिक व सामाजिक घटक जबाबदार असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील नागरीकरणाचे परिणाम :**

नागरीकरणामुळे पायाभूत सुविधात वाढ होते, बाजारपेठा विस्तारतात. वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागतो, तांत्रिक क्षेत्रात बदल होतात. त्याचा कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर अनुकूल परिणाम होऊन आर्थिक विकासाची गती वाढते. परिणामी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये प्रभावित होतात. विशेषत: साक्षरता दर, स्त्री साक्षरता दर, स्त्री-पुरूष समानता, जन्मदर, बालमृत्यूदर, दारिद्र्य आणि बेरोजगारी इत्यादी मूल्यांवर त्याचा विधायक परिणाम होतो. त्यासाठी तक्ता क्र. ९ मध्ये महाराष्ट्रातील साक्षरता दर स्त्री साक्षरता दर, स्त्री-पुरूष जन्मदर, आणि बालमृत्यू दर दर्शविला आहे.

**तक्ता क्र.९**

**महाराष्ट्र व भारतातील साक्षरता दर, स्त्री साक्षरता दर, स्त्री-पुरूष प्रमाण, जन्मदर,बालमृत्यू दर : सन १९६१:२००१**

| राज्ये/देश | घटक | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | वाढ/घट % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र- | एकूण साक्षरता दर | २९.८२ | ३९.१३ | ५७.२४ | ६४.८७ | ७७.२७ | ४७.४५ |
| | ग्रामीण साक्षरता दर | – | – | ४६.७० | ५५.५२ | ७०.८४ | २४.१४ |
| | नागरी साक्षरता दर | – | – | ७६.३१ | ७९.२० | ८५.७६ | ९.४५ |
| | ग्रामीण व नागरी साक्षरता दरातील फरक | – | – | ३० | २४ | १५ | – |
| | एकूण स्त्री साक्षरता दर १६.७६ | २६.४३ | ३४.९९ | ५२.३२ | ६७.५१ | ५०.७५ | |
| | ग्रामीण स्त्री साक्षरता दर | ९.३४ | १७.८४ | २४.८८ | ४०.९६ | ५९.१२ | ४९.७८ |
| | नागरी स्त्री साक्षरता दर ३७.९६ | ४७.३३ | ५४.६५ | ७०.८७ | ७९.२५ | ४१.३५ | |
| | ग्रामीण व नागरी स्त्री साक्षरता दरातील फरक | २८.५६ | २९.४९ | २९.७७ | २९.९१ | २०.१३ | – |
| | स्त्री-पुरूष प्रमाण | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | –१४ |
| | ग्रामीण स्त्री-पुरूष | ९९५ | ९८५ | ९६७ | ९७२ | ९६० | –३५ |
| | नागरी स्त्री पुरूष प्रमाण ८०१ | ८२० | ८५० | ८७५ | ८७३ | ७५ | |
| | ग्रामीण व नागरी स्त्री- १९४ पुरूष प्रमाणातील फरक | १६५ | ११७ | ९७ | ८७ | – | |
| | एकूण जन्मदर | – | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | ११.५ |
| | ग्रामीण जन्मदर | – | ३३.७ | ३०.४ | २८.० | २१.१ | १२.६ |
| | नागरी जन्मदर | – | २९.० | २४.५ | २२.९ | २०.२ | ८.८ |
| | ग्रामीण व नागरी जन्म – दरातील फरक | ४.७ | ५.९ | ५.९ | ०.९ | – | |
| | एकूण बालमृत्यू दर | – | १०५ | ७९ | ६० | ४५ | ६० |
| | ग्रामीण बालमृत्यू दर | – | १११ | ९० | ६९ | ५५ | ५६ |
| | नागरी बालमृत्यू दर | – | ८८ | ४९ | ३८ | २८ | ६० |
| | ग्रामीण व नागरी बाल मृत्यूदरातील फरक | – | २३ | ४१ | ३१ | २७ | – |
| भारत | एकूण साक्षरता दर | २८.३० | ३४.४५ | ४३.५७ | ५२.२१ | ६५.३८ | ३७.०८ |
| | एकूण स्त्री साक्षरता दर | १५.३५ | २१.९७ | २९.७६ | ३९.२९ | ५४.१६ | ३८.८१ |
| | एकूण स्त्री-पुरूष प्रमाण | ९४१ | ९३० | ९३४ | ९२७ | ९३३ | ८ |
| | एकूण जन्मदर | – | ३६.९ | ३३.९ | २९.५ | २५.४ | ११.५ |
| | ग्रामीण जन्मदर | – | ३८.९ | ३५.६ | ३०.९ | २७.१ | ११.८ |
| | नागरी जन्मदर | – | ३०.१ | ७०.० | २४.३ | २०.३ | ९.८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण व नागरी जन्म-दरातील फरक | – | ८.८ | ८.६ | ६.६ | ६.८ | – |
| | एकूण बालमृत्यू दर | – | १२९ | ११० | ८० | ६६ | ६३ |
| | ग्रामीण बालमृत्यू दर | – | १३८ | ११९ | ८७ | ७२ | ६६ |
| | नागरी बालमृत्यू दर | – | ८२ | ६२ | ५३ | ४२ | ४० |
| | ग्रामीण व नागरी बाल मृत्यूदरातील फरक | – | ५६ | ५७ | ३४ | ३० | – |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९५-१९९६ ते २००५-२००६.

तक्ता क्र.९ वरून असे निदर्शनास येते की,

१) नागरीकरणाच्या साक्षरता दरावरील होणाऱ्या अनुकूल परिणामाचा विचार करता असे दिसून येते की, भारतात राष्ट्रीय पातळीवर आज (२००१ मध्ये) जेवढे नागरी लोकसंख्येचे प्रमाण आहे. तेवढे नागरी लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रात चार दशकापूर्वी (१९६१ मध्ये) होते. तर भारतात राष्ट्रीय पातळीवर आज (२००१ मध्ये) जेवढे साक्षरता प्रमाण आहे तेवढे साक्षरता प्रमाण महाराष्ट्रात चार दशकापूर्वी असावयास पाहिजे होते. परंतु ते केवळ एक दशकापूर्वी (सन १९९१ मध्ये) आहे. म्हणजे महाराष्ट्र नागरीकरणाच्या बाबतीत राष्ट्रीय पातळीपेक्षा जसा चार दशक पुढे आहे, तसा साक्षरता प्रमाणाच्या बाबतीतही चार दशक पुढे असावयास पाहिजे होता. पण तो केवळ एक दशकच पुढे आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील नागरीकरणाचा जेवढा महाराष्ट्रातील साक्षरता दरावर अनुकूल परिणाम व्हावयास पाहिजे होता (राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत) तेवढा झालेला नाही.

२) ग्रामीण आणि नागरी साक्षरता दराच्या वाढीचा विचार करता असे निदर्शनास येते की, सन १९८१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण साक्षरता दर २४.१४ टक्केने वाढला आहे. तर याच कालावधीत नागरी साक्षरता दर ग्रामीण साक्षरता दराच्या वेगापेक्षा अधिक वेगाने वाढणे आवश्यक होते. परंतु नागरी साक्षरता दर केवळ ९.४५ टक्केने वाढला आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी साक्षरता दरावर जेवढा अनुकूल परिणाम व्हावयास पाहिजे होता तेवढा झालेला नाही.

३) एकूण साक्षरता दराप्रमाणेच सन १९६१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्र आणि भारतातील एकूण स्त्री साक्षरता दरातही जवळपास सारखीच परिस्थिती असल्याचे दिसून येते.

४) महाराष्ट्रातील नागरी व ग्रामीण स्त्री साक्षरता दराचा विचार करता असे लक्षात येते की, सन १९६१ ते २००१ मध्ये महाराष्ट्रातील नागरी स्त्री साक्षरता दरात ४१.३५ टक्केने वाढ झाली आहे. तर महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्री साक्षरता दरात ४९.७८ टक्के एवढी वाढ झाली आहे. म्हणजे ग्रामीण स्त्री साक्षरता दरातील वृध्दी एवढी वाढ नागरी दरात साध्य करता आली नाही. कारण सन १९६१ ते १९९१ या कालावधीत नागरी स्त्री साक्षरता दरात व ग्रामीण स्त्री साक्षरता दरात जवळपास २९ टक्केचा फरक सतत होता. तो फरक सन १९९१ ते २००१ या कालावधीत (नागरी साक्षरता दर ग्रामीण साक्षरता दराएवढाच न वाढवता आल्यामुळे) कायम टिकवून ठेवता

आला नाही. त्यामुळे ग्रामीण स्त्री साक्षरता दराच्या तुलनेत नागरी स्त्री साक्षरता दर समान प्रमाणात किंवा त्याहीपेक्षा वेगाने वाढविणे ही नागरीकरणासमोरील एक कठीण समस्या आहे.

५) महाराष्ट्रात भारतातील राष्ट्रीय पातळीवरील नागरीकरणापेक्षा अधिक प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. तरी महाराष्ट्राच्या स्त्री-पुरूष प्रमाणावर त्याचा फारसा अनुकूल परिणाम झालेला दिसून येत नाही. कारण सन २००१ मध्ये भारतात दर हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ एवढे आहे. तर महाराष्ट्रात ते ९३३ पेक्षा अधिक असणे आवश्यक होते. परंतु याउलट ते महाराष्ट्रात ९२२ एवढे कमी आहे. म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाचा महाराष्ट्रातील स्त्री-पुरूष प्रमाणावर अनुकूल परिणाम होण्याऐवजी प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो.

६) महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्त्री-पुरूष प्रमाणाचा तुलनात्मक विचार करता, ग्रामीण स्त्री-पुरूष प्रमाणापेक्षा नागरी स्त्री पुरूष प्रमाण अधिक असणे आवश्यक होते. कारण नागरी भागात नागरीकरणाचा स्त्री-पुरूष प्रमाणावर अनुकूल प्रभाव अपेक्षित मानला जातो. परंतु हे प्रमाण महाराष्ट्रात सन २००१ मध्ये ग्रामीण भागात ९६० व नागरी भागात ८७३ एवढे कमी होते. याचा अर्थ महाराष्ट्रातील नागरीकरणाचा महाराष्ट्रातील स्त्री-पुरूष प्रमाणावर अनुकूल परिणाम होण्याऐवजी प्रतिकूल परिणाम झाला आहे.

असे असले तरी एक अनुकूल परिणाम असा दिसून येतो की, सन १९६१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रातील नागरी स्त्री-पुरुष - प्रमाण सातत्याने ८०१ पासून ८७३ पर्यंत वाढत गेले आहे.

७) सन १९७१ ते २००१ या कालावधीत राष्ट्रीय पातळीवरील बालमृत्यू दर ६३ ने घटला आहे. तर महाराष्ट्रातील बालमृत्यूदर ६० ने घटला आहे. महाराष्ट्रात तो नागरीकरणाच्या प्रभावामुळे राष्ट्रीय पातळीपेक्षा अधिक दराने घटावयास पाहिजे होता. परंतु तो कमी दराने घटला.

८)महाराष्ट्रातील जन्मदर महाराष्ट्रातील अधिक नागरीकरणाच्या प्रभावामुळे राष्ट्रीय पातळीवरील जन्म दरापेक्षा अधिक दराने घटावयास हवा होता. परंतु सन १९७१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रातील व राष्ट्रीय पातळीवरील जन्मदर ११.५ या एकाच दराने घटला.

९)नागरीकरणाच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण जन्मदरापेक्षा महाराष्ट्रातील नागरी जन्मदर कमी असावयास पाहिजे होता. परंतु सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण जन्मदर (२१.१) व नागरी जन्मदर (२०.२) जवळपास सारखेच आहेत. म्हणजे अलिकडील काळात महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी जन्म दरावर अनुकूल परिणाम झालेला दिसून येत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालातही असे मत व्यक्त करण्यात आले आहे की, महाराष्ट्रातील ४२.४ टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करीत असून व नागरी भागातील लोकसंख्या आणि लोकसंख्येची घनता यांच्यात वाढ होऊनही नागरीकरणाचा लोकसंख्या नियंत्रणाबाबत काहीच प्रभाव पडलेला नाही.

## तक्ता क्र. १०

### भारत आणि महाराष्ट्रातील ग्रामीण – नागरी गरीब लोकसंख्या, गरीब लोकसंख्येचे प्रमाण,स्त्री व पुरूष चालू दैनिक स्थिती बेरोजगारी दर आणि रोजगारीचा निर्देशांक : सन १९७७-८८ ते १९९९-२०००

| राज्य | घटक | १९७७-७८ | १९८३ | १९८७-८८ | १९९३-९४ | १९९०-०० | ७७-७८ व ९९-०१ मधील फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | एकूण गरीब लोकसंख्या(कोटीत) | ३.३०० | २.९०९ | २.९६३ | ३.०५२ | २.२८० | १.०२० |
| | ग्रामीण गरीब लोकसंख्या(कोटीत) | २.४९८ | १.९३८ | १.८६९ | १.९३३ | १.२५ | १.२४७ |
| | नागरी गरीब लोकसंख्या (कोटीत) | ०.८०२ | ०.९७१ | १.०९४ | १.११९ | १.०३ | ०.२२७ |
| | ग्रामीण व नागरी लोकसंख्येतील फरक (कोटीत) | १.६९६ | ०.९६७ | ०.७७५ | ०.८१४ | ०.२२ | – |
| | एकूण गरीब लोकसंख्येचे प्रमाण | ५५.८८ | ४३.४४ | १०.४१ | ३५.८६ | २५.०२ | ३०.८६ |
| | ग्रामीण गरीब लोकसंख्येचे प्रमाण | ६३.९७ | ४५.२३ | ४०.७८ | ३७.८३ | २३.७ | ४०.२५ |
| | नागरी गरीब लोकसंख्येचे प्रमाण | ४०.०९ | ४०.२६ | ३९.७८ | ३५.१५ | २६.८ | १३.२८ |
| | ग्रामीण व नागरी लोकसंख्येच्या प्रमाणातील फरक | २३.८८ | ४.९७ | १.०० | २.६८ | ३.०९ | – |
| | ग्रामीण चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी दर | ५.८५ | ६.२५ | २.९० | ४.६० | ६.३० | ०.४५ |
| | नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी दर | ८.९९ | ९.०५ | ८.५० | ६.०० | ७.७० | १.२९ |
| | ग्रामीण नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी दरातील फरक | ३.१४ | २.८० | ५.६० | १.४० | १.४० | – |
| | ग्रामीण चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी दर | ९.३१ | ७.२३ | ३.६० | ४.०० | ६.९० | २.४१ |
| | नागरी चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी दर | १५.७५ | १०.४४ | ९.२० | ७.८० | १०.०० | ५.७५ |
| | ग्रामीण नागरी चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी दरातील फरक | | ६.४४ | ३.२१ | ५.६० | ३.८० | ३.१० |
| | ग्रामीण पुरूष रोजगाराचा निर्देशांक | ५.७ | ६.० | ०.६ | ५.० | ६.६ | ०.९ |
| | नागरी पुरूष रोजगाराचा निर्देशांक | २.४ | ३.१ | १.९ | १.७ | ३.२ | ०.८ |
| | ग्रामीण व नागरी पुरूष रोजगाराच्या निर्देशांकातील फरक | ३.३ | २.९ | १.३ | ३.३ | ३.४ | – |
| | ग्रामीण स्त्री रोजगाराचा निर्देशांक | १३.९ | १२.८ | ५.७ | १२.३ | १४.६ | ०.७ |
| | नागरी स्त्री रोजगाराचा निर्देशांक | ५.१ | १०.५ | २.४ | १०.१ | १०.१ | ५.० |
| | ग्रामीण व नागरी स्त्री रोजगाराच्या निर्देशांकातील फरक | ८.८ | २.३ | ३.३ | २.२ | ४.५ | – |
| भारत | एकूण गरीब लोकसंख्या (कोटीत) | ३२.८९० | ३२.२९० | ३०.७०५ | ३२.०३७ | २६.०२५ | ६.८६५ |
| | ग्रामीण गरीब लोकसंख्या (कोटीत) | २६.४३ | २५.१९६ | २३.१८८ | २४.४०३ | १९.३२४ | ७.१०१ |
| | नागरी गरीब लोकसंख्या (कोटीत) | ६.४६५ | ७.०९४ | ७.५१७ | ७.६३४ | ६.७ | ०.२३६ |
| | ग्रामीण व नागरी गरीब लोकसंख्यांतील फरक (कोटीत) | १९.९६० | १८.१०२ | १५.६७१ | १६.७६९ | १२.६२३ | – |
| | एकूण गरीब लोकसंख्येची प्रमाण (एकूण लोकसंख्येत) | ५१.३२ | ४४.४० | ३८.८६ | ३५.९७ | २६.१० | २५.२२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण गरीब लोकसंख्येचे प्रमाण | ५३.०७ | ४५.६५ | ३९.६९ | ३७.२७ | २७.१ | २५.९८ |
| | नागरी गरीब लोकसंख्येचे प्रमाण | ४५.२४ | ४०.७९ | ३८.२० | ३२.३६ | २३.६ | २१.६२ |
| | ग्रामीण व नागरी गरीब लोकसंख्येच्या प्रमाणातील फरक | ७.८३ | ४.८६ | १.४९ | ४.९१ | ३.४७ | – |
| | ग्रामीण चालू दैनक स्थिती पुरूष बेरोजगारी दर | ७.१० | ७.५० | ४.६० | ५.६० | ७.२० | ०.१० |
| | नागरी चालू दैनक स्थिती पुरूष बेरोजगारी दर | ९.४० | ९.२० | ८.८० | ६.७० | ७.३० | २.१० |
| | ग्रामीण व नागरी चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी दरातील फरक | २.३० | १.७० | ४.२० | १.१० | ०.१० | – |
| | ग्रामीण चालू दैनक स्थिती स्त्री बेराजगारी दर | ९.२० | ९.०० | ६.७० | ५.६० | ७.०० | २.२० |
| | नागरी चालू दैनक स्थिती स्त्री बेरोजगारी दर | १४.५० | ११.०० | १२.०० | १०.५० | ९.४० | ५.१ |
| | ग्रामीण व नागरी चालू दैनिक स्थिती स्त्री दरातील फरक बेरोजगारी | ५.३० | २.०० | ५.३० | ४.९० | २.४० | – |
| | ग्रामीण पुरूष रोजगाराचा निर्देशांक | ६.४ | ५.८ | ०.६ | ५.१ | ६.३ | ०.१ |
| | नागरी पुरूष रोजगाराचा निर्देशांक | ३.४ | ४.० | ३.८ | २.९ | ३.७ | ०.३ |
| | ग्रामीण व नागरी पुरूष रोजगाराच्या निर्देशांकातील फरक | ३.० | १.८ | ३.२ | २.२ | २.६ | – |
| | ग्रामीण स्त्री रोजगाराचा निर्देशांक | १६.६ | १२.८ | ५.९ | १८.० | १९.४ | २.८ |
| | नागरी स्त्री रोजगाराचा निर्देशांक | ११.९ | १०.१ | ७.६ | १३.७ | १३.३ | १.४ |
| | ग्रामीण व नागरी स्त्री रोजगाराच्या निर्देशांकातील फरक | ४.७ | २.७ | १.७ | ४.३ | ६.१ | – |

**संदर्भ : Govt. of India, Maharashtra Development Report २००७**

तक्ता क्र.१० वरून असे निदर्शनास येते की,

१) आर्थिक विकासाच्या अधिक सोयी सुविधा ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे नागरी भागातील गरीबीच्या प्रमाणावर त्याचा अनुकूल परिणाम होत असतो. त्यामुळे ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात गरीब लोकसंख्या कमी असते. परंतु महाराष्ट्रात सन १९९९-२००० मध्ये ग्रामीण गरीब लोकसंख्या (१.२५ कोटी) व नागरी गरीब लोकसंख्या (१.०२ कोटी) जवळपास सारखीच आहे. ग्रामीण गरीब लोकसंख्या १९७७-७८ पासून १९९९-२००० पर्यंत सतत घटत गेली आहे. तर याउलट नागरी गरीब लोकसंख्या याच काळात सतत वाढत गेली आहे. म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी भागातील गरीब लोकसंख्येच्या घटीवर अनुकूल परिणाम झाला नाही.

२) महाराष्ट्रातील वेगाने होणाऱ्या नागरीकरणामुळे नागरी भागातील गरीब लोकसंख्येचे प्रमाण (२६.८१) हे सन १९९९-२००० मध्ये ग्रामीण भागातील गरीब लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा (२३.७२) कमी असणे आवश्यक होते परंतु ते उलट अधिक झाले आहे.

३) सन १९७७-७८ ते १९९९-२००० या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण गरीब लोकसंख्येच्या प्रमाणात ४०.२५ टक्के घट झाली आहे. परंतु महाराष्ट्रातील नागरीकरण वेगाने होऊनही महाराष्ट्रातील नागरी गरीब लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ १३.२८ टक्के एवढीच घट झाली

आहे. म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी भागातील गरीब लोकसंख्येच्या प्रमाणावर अनुकूल परिणाम घडून आला नाही. म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या प्रक्रियेसोबत या प्रक्रियेचा नागरी भागातील गरीब लोकसंख्येच्या प्रमाणावर अनुकूल परिणाम कसा घडवून आणावा ही एक मोठी समस्याच आ वासून उभी आहे.

४) सन १९७७-७८ ते १९९९-२००० या कालावधीत महाराष्ट्रात वाढत्या नागरीकरणबरोबर नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी दर केवळ १.२९ टक्के ने घटला आहे. तर याच काळात भारतातील राष्ट्रीय पातळीवरील नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी दर २.१ टक्के ने घटला आहे. म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारीच्या दरावरसुध्दा विधायक असा परिणाम झाला नाही.

५. सन १९७७-७८ ते १९९९-२००० या कालावधीत महाराष्ट्रात नागरीकरणाचा वेग राष्ट्रीय पातळीपेक्षा अधिक असूनही नागरी चालू दैनिक स्थिती बेरोजगारी दरात महाराष्ट्रात (५.७५ टक्के) व भारतात राष्ट्रीय पातळीवर (५.१ टक्के) समान प्रमाणातच घट झाली आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्रातील चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी दरात नागरीकरणाच्या प्रभावामुळे अधिक घट होणे आवश्यक होते.

**इतर परिणाम :-**

१) देशातील किंवा महाराष्ट्र राज्याच्या अन्य भागातून होणारे स्थलांतर आणि घरांच्या वाढत्या किंमती यामुळे झोपडपट्टी हा महाराष्ट्रात नागरी भागातील एक अविभाज्य घटक झाला आहे.

२)महाराष्ट्रात नागरीकरणाबाबतची विषमता फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसून येते. कारण सन २००१ नुसार राज्यात सर्वाधिक नागरीकरणाचा दर मुंबई या जिल्ह्यात १०० टक्के एवढा दिसून येतो. तर सर्वात कमी नागरीकरणाचा दर गडचिरोली जिल्ह्यात ६.९३ टक्के एवढा दिसून येतो. म्हणजे मुंबई व गडचिरोली या दोन जिल्ह्यातील नागरीकरणाच्या दरात ९३.०७ टक्के एवढा मोठा फरक आहे. या फरकावरून महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांतर्गत नागरीकरणातील विषमता आपल्या निदर्शनास येते.

३. ज्या जिल्ह्यात नागरीकरणाचा दर अधिक आहे. त्या जिल्ह्यात मानव विकास निर्देशांक उच्च आहे. तर ज्या जिल्ह्यात नागरीकरणाचा दर कमी आहे. त्या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी आहे. म्हणजे नागरीकरणाचा मानव विकास निर्देशांकावरही परिणाम झालेला दिसून येतो. कारण सन २००० च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक नागरीकरण झालेल्या मुंबईचा मानव विकास निर्देशांक सर्वाधिक म्हणजे १.०० एवढा आहे तर सर्वात कमी नागरीकरण झालेल्या गडचिरोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी म्हणजे ०.२० एवढा आहे.

**महाराष्ट्रातील नागरीकरणासमोरील आव्हाने**

महाराष्ट्रात तीव्र गतीने नागरीकरण होत असले तरी किंवा महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी देशाच्या नागरीकरणाच्या पातळी पेक्षा अधिक असली तरी यावर समाधान मानता येणार नाही. कारण आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रगत असलेल्या महाराष्ट्रातील नागरीकरणाचा ४२.४ टक्के हा दर जगातील मध्यम मानव विकास प्राप्त

गटातील देशांच्या नागरीकरणाच्या सरासरी दराएवढाच आहे. त्यामुळे आर्थिक विकासाच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राला उच्च मानव विकास प्राप्त गटातील देशांच्या नागरीकरणाच्या सरासरी दरा (७८ टक्के) एवढा नागरीकरणाचा दर प्राप्त करावयाचा असेल तर जवळपास आणखी दुप्पट नागरीकरणाचा दर वाढवावा लागेल. त्यामुळे व नागरीकरणाचा आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक मूल्यांवर ही अपेक्षित विधायक परिणाम झालेला दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्राला येणाऱ्या काळात नागरीकरणाच्या पुढील आव्हानांचा सामना करावा लागेल.

१) राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरीकरणाचा जेवढा महाराष्ट्रातील एकूण साक्षरता दरावर अनुकूल परिणाम व्हावयास पाहिजे होता तेवढा झालेला नाही. म्हणजे महाराष्ट्राला नागरी लोकसंख्येच्या वाढीबरोबरच एकूण साक्षरता दर वाढविण्याचे आव्हान आहे.

२) महाराष्ट्रातील ग्रामीण साक्षरता दराच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी साक्षरता दरावर जेवढा अनुकूल परिणाम व्हावयास पाहिजे होता तेवढा झालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्राला नागरी साक्षरता दरात ग्रामीण साक्षरता दर वाढीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने वाढ करण्याचे आव्हान आहे.

३) राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत महाराष्ट्राला एकूण स्त्री साक्षरता दरात वेगाने वाढ करण्याचेही आव्हान आहे.

४) महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्री साक्षरता दराच्या वाढीच्या वेगाच्या तुलनेत नागरी स्त्री साक्षरता दर समान प्रमाणात किंवा त्याहीपेक्षा अधिक वेगाने वाढविणे.

५) महाराष्ट्रातील अधिक नागरीकरणाचा राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत महाराष्ट्रातील स्त्री पुरूष प्रमाणावर अनुकूल परिणाम घडवून आणणे.

६) महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्त्री पुरूष प्रमाणाचा तुलनात्मक विचार करता महाराष्ट्रातील नागरीकरणाचा महाराष्ट्रातील स्त्री पुरूष प्रमाणावर अनुकूल परिणाम होण्याऐवजी प्रतिकूल परिणाम झाला आहे. तो अनुकूल घडवून आणणे

७) नागरीकरणाच्या प्रभावामुळे भारतातील राष्ट्रीय पातळीवरील बालमृत्यू दरापेक्षा महाराष्ट्रातील बालमृत्यू दर अधिक प्रमाणात घटविणे.

८) नागरीकरणच्या प्रभावामुळे भारतातील राष्ट्रीय पातळीवरील जन्मदरापेक्षा महाराष्ट्रातील जन्मदर अधिक प्रमाणात घटविणे.

९) महाराष्ट्रातील नागरीकरणाचा महाराष्ट्रातील लोकसंख्या नियंत्रणावर काहीही प्रभाव पडलेला दिसून येत नाही, तो प्रभाव लोकसंख्या नियंत्रणावर अनुकूल घडवून आणणे.

१०) महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी भागातील गरीब लोकसंख्येच्या घटीवर अनुकूल परिणाम झाला नाही, तो अनुकूल घडवून आणणे.

११) नागरी भागातील गरीब लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण भागातील गरीब लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी करणे.

१२) महाराष्ट्रातील ग्रामीण गरीब लोकसंख्येच्या प्रमाणात ज्या वेगाने घट झाली त्या वेगाने नागरी गरीब लोकसंख्येच्या प्रमाणात घट घडवून आणणे.

१३) राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी चालू दैनिक स्थिती पुरूष बेरोजगारी घटीच्या दरावर अधिक अनुकूल परिणाम घडवून आणणे.

१४) राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरीकरणाचा नागरी चालू दैनिक स्थिती स्त्री बेरोजगारी घटीच्या दरावर अनुकूल परिणाम घडवून आणणे.

**इतर आव्हाने :**

१) महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या अनुकूल प्रभावाचा विनाश करणारा नागरीकरणाचा एक वास्तव दुर्दैवी परिणाम म्हणजे नागरी भागातील झोपडपट्टी हा होय. सन २००१ नुसार महाराष्ट्रातील १.०६ कोटी लोक झोपडपट्ट्या मध्ये राहत असून त्यापैकी सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी आहे व त्यामुळे आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीचा मान मुंबईने पटकावला आहे. बृहन्मुंबईतील १.१९ कोटी लोकसंख्येपैकी ४९ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये राहते. कोलकत्ता, चेन्नई, दिल्ली व बंगलोरमध्ये हे प्रमाण अनुक्रमे ३३ टक्के, २६ टक्के, १९ टक्के व ८ टक्के एवढे आहे. म्हणजे देशातील इतर महानगरांच्या तुलनेत मुंबईतील झोपडपट्टीचे प्रमाण हा एक अत्यंत तीव्र विरोधाभास आहे.

या झोपडपट्टीमुळे महाराष्ट्रातील नागरीकरणाचे नागरी भागातील गरीबी, रोजगारी, जन्मदर, बालमृत्यू दर, साक्षरता दर, स्त्री साक्षरता दर, स्त्री-पुरूष प्रमाण व नागरीकरणाची गती यावर अपेक्षित परिणाम झालेले दिसून येत नाहीत. कारण या झोपडपट्टीमुळे नागरीकरणाच्या अनुकूल प्रभावाचा विनाश होतो.

त्यामुळे महाराष्ट्रातील मुंबई किंवा कोणत्याही शहरातील झोपडपट्ट्यांची आणि त्यामधील रहिवाशांची संख्या यावर मार्ग काढण्यासाठी विकासाची समांतर केंद्रे उभी करण्याचा एक पर्याय हाताळून बघण्यात आला आहे. पण त्यास फारसे यश मिळाले नाही. त्यामुळे दुसरा पर्याय म्हणून स्थलांतरावर मर्यादा घालावी, याबाबत अनेक वर्षापासून चर्चा सुरू आहे. परंतु भारतीय घटनेने बहाल केलेल्या स्वातंत्र्यानुसार लोकांनी या देशात कुठे वास्तव्य करावे यावर बंधने घालता येत नाहीत. त्यामुळे झोपडपट्टी व त्यामधील रहिवाशांचा प्रश्न कसा सोडवावा हे महाराष्ट्रासमोर एक आव्हान आहे.

२) महाराष्ट्रातील बहुतांश स्थलांतरीत हे मागास जिल्ह्यातलेच होते. त्यांनी आपल्या समवेत त्या त्या भागातील रूढी आणि परंपराही नागरी भागात आणल्या. त्यामुळे नागरी वस्त्यांचे एक प्रकारे ग्रामीणीकरणच होण्यास सुरूवात झाली. परिणामी नागरीकरणाच्या अनुकूल प्रभावास धक्का बसला आहे. असे मत महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तीव्र गतीने होणाऱ्या नागरीकरणाचा तीव्र अनुकूल प्रभाव कसा घडवून आणावा हे एक कोडेच आहे.

३) सन १९६१ ते १९९१ या कालावधीत महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरी लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण असलेले राज्य होते. परंतु १९९१ ते २००१ या कालावधीत तामिळनाडू राज्याने नागरी लोकसंख्येच्या प्रतिशत प्रमाणाच्या बाबतीत

महाराष्ट्राला मागे टाकले आहे. त्यामुळे महाराष्ट्राला नागरी लोकसंख्येच्या प्रतिशत प्रमाणाच्या बाबतीत प्रथम स्थान गमवावे लागले. ते परत प्रथम स्थान प्राप्त करणे व नागरीकरणाच्या विधायक प्रभावासहित टिकविणे एक कठीण आव्हान आहे.

४) आर्थिक, सामाजिक व भौगोलिक घटकांमुळे काही विशिष्ट भागात नगरांचे पुंजकेच्या पुंजके निर्माण झाले आहेत व काही भागात नागरीकरणाच्या बाबतीत फारच विरळ परिस्थिती आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नागरीकरणाची जिल्ह्यांतर्गत विषमता फार मोठ्या प्रमाणात (९३.०७ टक्के) दिसून येते. त्यामध्ये समानता कशी घडवून आणावी हा आर्थिक दृष्टिकोनातून फार मोठा प्रश्न आहे.

५) नागरीकरणाचा मानव विकास निर्देशांकावरही मोठा परिणाम झालेला दिसून येतो. सर्वत्र सारखा मानव विकास करण्यासाठी व विशिष्ट भागातच होणाऱ्या गर्दीचा व स्थलांतरणाचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वत्र सारख्या प्रमाणात नागरीकरण करणे एक आव्हानच आहे.

**महाराष्ट्र आणि जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान :**

एकीकडे शहरासाठी पायाभूत सुविधा आणि दुसरीकडे झोपडीवासियांना दिलासा असे एकत्रित या योजनेचे स्वरूप आहे. परंतु या योजना पुर्णत्वास नेतांना त्यामध्ये स्थानिक नागरिकांनी विरोध केल्यास, केंद्र सरकारने निधी देताना घातलेल्या पूर्व अटी पूर्ण न झाल्यास, केंद्र सरकार पुढील हप्ते अडविण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनसहभाग मिळवून झोपडीवासियांना नागरी सुविधा पुरवितांना भविष्यात नागरी भागात झोपडपट्टी वाढणार नाही याची काळजी घेऊन हे अभियान यशस्वी करणे हे एक आव्हान आहे.

**सारांश :**

महाराष्ट्रात वेगाने नागरीकरण होत आहे. त्यामधून अनेक समस्या उद्‌भवत आहेत. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांवरही नागरीकरणाचा अपेक्षित विधायक परिणाम झालेला दिसून येत नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्राला नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या अनेक आव्हानांचा सामना करावा लागेल. त्यासाठी नियोजनबध्द नागरीकरणाची आवश्यकता असून त्यामध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांवरही नागरीकरणाचा प्रयत्नपूर्वक अपेक्षित विधायक परिणाम घडवून आणण्याची आवश्यकता आहे. तरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील नागरी भागातील लोकांना ग्रामीण भागाच्या तुलनेत अपेक्षित अधिक चांगले जीवन जगण्याची संधी प्राप्त होईल.

**संदर्भ :**

1. Govt. of India, "Maharashtra Development Report" - 2007

2. N. Jayapalan, (2002) "Urban Sociology" Atlantic Publishers and Distributors, New Delhi Page No.18

3. UNDP- Human Development Report -2005 Page No. 225

४. भारत सरकार, भारत २००२.

५. डॉ. जयराज फाटक ,"शहरी विकासाला चालना" लोकराज्य, मार्च २००७ पान क्र.२३ ते २६

६. महाराष्ट्र मानव विकास अहवाल - २००२.

७.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी- १९९५-९६ ते २००५-०६.

***

# रूपयाचे अवमूल्यन व "जे वक्र" सिध्दांत कल्पना - एक तपासणी

मकरंद चिकोडीकर

**प्रस्तावना :** आंतरराष्ट्रीय व्यापारात, व्यवहारशेष किंवा व्यवहारतोलाला (Balance of Payments) फार महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीने व्यवहारशेषाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"व्यवहारशेष म्हणजे एखाद्या देशातील रहिवाशांनी इतर देशाच्या रहिवाशांबरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांचा व्यवस्थाबध्द हिशोब होय."

कुठल्याही देशाचा व्यवहारशेष हा प्रामुख्याने दोन विभागात समाविष्ट केला जातो. ते विभाग म्हणजे -

१. चालू खाते (Current Account)

२. भांडवली खाते (Capital Account)

आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषाच्या ताळेबंदात वेगवेगळ्या तुटीच्या संकल्पना वापरल्या जातात. त्या म्हणजे वस्तू व्यापार तूट, सेवा व्यापार तूट, चालू खात्यावरील तूट, भांडवली खात्यावरील तूट आणि एकूण व्यवहारशेषातील तूट. त्यातील चालू खात्यावरील तूट व एकूण व्यवहारशेषातील तूट ह्या संकल्पना महत्त्वाच्या मानल्या जातात. भांडवली खात्यातील व्यवहार हे व्यवहारशेषात हिशोबी संतुलन घडवून आणत असतात. याच अर्थाने व्यवहारशेष हा नेहमी समतोल असतो.असे म्हटले जाते. (Balance of Payments always balances.)

चालू खात्यावरील शेष हा तीन घटकांचा आहे (वस्तू, व्यापारशेष, सेवा व्यापारशेष आणि उत्पन्न शेष) असे मानले जाते.

चालू खात्यावरील तूट/एकूण व्यवहारशेषातील तूट ही जर प्रमाणाबाहेर असेल तर व्यवहारशेष असमतोल (Disequilibrium in BOP) असे मानले जाते. सर्वसाधारणपणे चालू खात्यावरील तूट ही सकल

देशीय उत्पादनाच्या (GDP) १.५ ते २ टक्के असावी असे अर्थतज्ज्ञ मानतात.

व्यवहारशेषातील असमतोल दूर करण्यासाठी अनेक उपाय केले जातात. त्यातील एक उपाय चलनाचे अवमूल्यन (Devaluation) हा आहे. अवमूल्यनाचा व्यवहारशेषावर होणारा परिणाम कळण्यासाठी १९६० च्या दशकात जे वक्र सिध्दांत कल्पना (J curve Hypothesis) मांडण्यात आली.

प्रस्तुत लेखात, भारताने जुलै १९९१ साली केलेले रूपयाचे अवमूल्यन लक्षात घेऊन, जे वक्र संकल्पना तपासण्यात आली आहे. त्यासाठी १९९०-९१ ते २००४-०५ हा कालावधी निवडण्यात आला आहे. लेखासाठी लागणारे सर्व आकडे हे RBI Handbook of Statistics on Indian Economy २००५-०६ मधून घेण्यात आले आहेत.

**विनिमय दर व अवमूल्यन** – जेंव्हा आपण विनिमय दराची व्याख्या ही एक परकीय चलन मिळवण्यासाठी (उदा.U.S. Dollar) देण्यात येणाऱ्या देशी चलन (उदा.Indian Rupee) ह्याप्रमाणे करतो व त्यानुसार हा दर जर वाढला तर आपण रूपया घसरला असे म्हणतो किंवा हा दर जर घसरला तर रूपया वाढला असे म्हणतो. पण जेंव्हा हाच दर सरकारी किंवा मध्यवर्ती बँकेच्या धोरणानुसार (Policy action) जास्त करण्यात येतो किंवा वाढवण्यात येतो व रूपयाचे मूल्य घसरते तेव्हा त्यास अवमूल्यन (Devaluatio) असे म्हणतात. जेंव्हा विनिमय दर हा सरकारतर्फे किंवा देशाच्या मध्यवर्ती बँकेतर्फे (उदा.RBI) नियंत्रित केला जातो तेंव्हा चलनाचे अवमूल्यन करणे शक्य असते. अन्यथा बाजारप्रणालीनुसार विनिमय दर हा परकीय चलनाच्या मागणी पुरवठ्यानुसार ठरत असतो व त्यानुसार देशी चलनाचे मूल्य आपोआप वधारते किंवा घसरते. याचा अर्थ बाजारप्रणाली मध्ये मध्यवर्ती बँक हस्तक्षेप करत नाही असा नसून, गरज पडेल तेंव्हा मध्यवर्ती बँक हस्तक्षेप करते व विनिमय दर स्थिर (stable) ठेवण्याचा प्रयत्न करते. या प्रकारास 'नियंत्रित तरलता विनिमय दर' (Managed float) असे म्हणतात.

आपल्या चलनाचे बाह्य मूल्य, दुसऱ्या देशाच्या चलन संदर्भात कमी करणे म्हणजे अवमूल्यन. अवमूल्यनाचा समावेश खर्च कलाटणी धोरणात (Expenditure switching policy) होतो. अवमूल्यनामुळे आयात महाग व निर्यात स्वस्त होते व त्यामुळे व्यवहारशेषातील तूट कमी होण्यास मदत होते. अर्थात अवमूल्यनाचा परिणाम काही गृहीतकांवर (Assumptions) अवलंबून आहे.

**जे वक्र सिध्दांतकल्पना** (J Curve Hypothesis)– १९६० च्या दशकांत, अवमूल्यनाचा व्यवहारशेषावर होणारा परिणाम दाखविण्यासाठी जे वक्र सिध्दांत कल्पनेचा वापर अनेक लेखांमधून करण्यात आला. जे वक्र सिध्दांत कल्पनेनुसार अवमूल्यन केल्यानंतर, अल्पकाळामध्ये (Short run/Short term period) आयात निर्यात वस्तूंची मागणी लवचिकता खूपच कमी असते, व त्यांना मार्शल-लर्नर अटी (Marshall- Lerner con dition) लागू होत नाहीत त्यामुळे व्यवहारशेषातील तूट ही वाढतच जाते. पण कालांतराने किंवा दीर्घकाळामध्ये (Long run / Longterm period) ही लवचिकता वाढत जाते त्यांना मार्शल


लर्नर अटी लागू होतात व व्यवहारशेषातील तूट ही नाहीशी होऊन त्यात आधिक्य (Surplus) येते.

आपण जर काळाचे मापन (time period) हे 'क्ष' अक्षांवर (x-axis) व व्यवहारशेषाचे मापन हे 'य' अक्षांवर (y-axis) वर केले, तर त्यानुसार येणारी आकृती ही इंग्रजी अक्षरावरील 'जे' (J) प्रमाणे दिसते व म्हणून त्यास (जे वक्र)(J Curve) म्हणतात.

पहा आकृती क्रमांक १ (Figure I)

**आकृती क्र. १**

**काल्पनिक जे वक्र**




### १९९१ साल एक संक्षिप्त आढावा –

सन १९९१ हे वर्ष भारताच्या व्यवहार शेषातील एक महत्त्वाचा टप्पा. त्या वेळेला भारताला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले होते. उदाहरणार्थ चालू खात्यावरील तूट ही सकल देशीय उत्पादनाच्या (GDP) ३.० टक्के होती, केंद्र सरकारची राजकोषीय तूट ही जी.डी.पी. च्या ७.८५ टक्के होती, परकीय चलनाची गंगाजळी (Foreign Exchange Reserves) केवळ दोन आठवड्यांची आयात भागवू शकेल इतकी कमी होती, देशात राजकीय अस्थैर्य होते व इतर समस्या होत्या. ह्या सर्व समस्यांना दूर करण्यासाठी जुलै १९९१ साली तत्कालीन सरकारने उदारमतवादी आर्थिक धोरण स्वीकारले किंवा उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (Liberalization, Privatisation Globalisation) च्या दिशेने पावले उचलली. त्याचबरोबर रूपयाचे १८ टक्क्याने अवमूल्यन करण्यात आले. तसेच व्यापार, उद्योग व विनिमय धोरणात अनेक बदल केले. ह्या सर्वांचे परिणाम हळूहळू दिसू लागले व भारताची व्यवहारशेषाची स्थिती भक्कम होत गेली.

### रूपयाचे अवमूल्यन व जे वक्र सिध्दांत कल्पना – एक तपासणी :

तक्ता क्रमांक १ (Table 1) मध्ये भारताच्या व्यवहारशेषातील काही महत्त्वाचे आकडे दाखविण्यात आले आहेत. त्यावरून आपण खालील निष्कर्ष काढू शकतो.

१) चालू खात्यावरील तूट ही १९९१-९२ साली १९९०-९१ च्या तुलनेने कमी झाली. ही तूट १९९०-९१ साली जी.डी.पी. च्या ३.० टक्के होती. ती १९९१-९२ साली ०.३ इतकी कमी झाली. म्हणजे अवमूल्यनाचा परिणाम तूट कमी करण्यावर झाला असे मानन्यास हरकत नाही.

२) १९९१-९२ते २०००-०१ पर्यंत चालू खात्यावरील तूट ही जी.डी.पी. च्या १ ते २ टक्क्यादरम्यान होती.

३)२००१-०२ ते२००३-०४ ह्या तिन्ही वर्षी ही तूट नाहीशी होऊन आधिक्य (surplus) दाखवत आहे.ह्यावरून असे म्हणता येईल की मार्शल-लर्नर अटी लागू होण्यासाठी ८-१० वर्षांचा काळ जावा लागला किंवा चालू खात्यावर आधिक्य

होण्यासाठी ८-१० वर्षाचा काळ जावा लागला.

४) १९९०-९१ साली आपल्याकडील परकीय गंगाजळी फक्त २.५ महिन्यांची आयात भागवू शकेल इतकी कमी होती पण कालांतराने त्यात वाढ होऊन २००३-०४ साली ती १६ महिन्यांची आयात भागवू शकेल इतकी झाली.

५) रूपया डॉलर मधील विनिमय दराची तुलना केल्यास असे आढळते की १९९०-९१ साली हा दर Rs.१९.६४ = १ U.S.Dollar इतका होता व १९९१-९२ साली तो Rs. ३१.२२ = १ Rs. U.S.Dollar इतका वाढला म्हणजे रूपयाचे मूल्य ५८ टक्क्यांनी एका वर्षात घसरले. त्यातील १८ टक्के हे अवमूल्यन होते. पण सन १९९१-९२ ते १९९४-९५ हा दर Rs. ३१/३२ प्रति U.S. Dollar च्या दरम्यान स्थिर होता.

१९९५-९६ अखेर तो Rs. ३४. ३५ = १ U.S. Dollar इतका वाढला, म्हणजे रूपयाचे मूल्य ९ टक्क्यांनी घसरले. त्याचे कारण म्हणजे भारताने १९९३-९४ व १९९४-९५ भारतामध्ये मुक्त विनिमय धोरण स्वीकारले होते. (Liberalised Exchange Rate Management System) त्यानंतर भारताने रूपया हा चालू खात्यावर परीवर्तनीय केला (Current Account Convertibility) थोडक्यात, म्हणजे १९९४-९५ नंतर विनिमय दर हा बाजार पध्दतीप्रमाणे ठरत आहे.

६) १९९६-९७ ते १९९०-०० हा दर Rs.३५ to Rs. ४४ च्या दरम्यान होता पण २०००-०१ साली Rs.४६.६४ इतका व गेला व २००१-०२ साली त्याने Rs.४८.८० इतका सर्वोच्च बिंदू गाठला. पण २००१-०२ नंतर हा दर खाली घसरत आहे व त्यामुळे रूपयाचे मूल्य वाढत आहे. २००५-०६ ते २००६-०७ ह्यावर्षी हा दर Rs. ३९/४० च्या दरम्यान आहे. हल्लीच्या काळात डॉलरच्या तुलनेत रूपया वधारणे हा काही अर्थज्ञांच्या मते चिंतेचा विषय आहे, तर काहींच्या मते ही गोष्ट स्वागतार्ह आहे.

तक्ता क्रमांक १ (Table 1) मधील चालू खात्यावरील शेष चे आकडे गृहीत धरून, जे वक्र (J-Curve) काढण्यात आला आहे. (आकृती क्रमांक २) (Fig २) जे वक्र काढण्यासाठी चालू खात्यावरील शेषचे आकडे हे वस्तू-व्यापार शेष किंवा वस्तु व सेवा व्यापार शेष पेक्षा जास्त संयुक्तिक वाटत असल्याने त्यांचा वापर करण्यात आला आहे. आकृती क्रमांक २ असे दर्शविते की १९९०-९१ ते २०००-०१ पर्यंत चालू खात्यावरील शेष ही तूट दाखवत होती. पण तदनंतर २००१-०२ ते २००३-०४ त्यात आधिक्य (Surplus) आले. पुन्हा २००४-०५ साली चालू खात्यावर तूट निर्माण झाली. आकृती क्रमांक २ वरील जे वक्र हा चालू खात्यावरील वार्षिक आकडे गृहीत धरून काढण्यात आला आहे.

थोडक्यात म्हणजे अवमूल्यनाचा चालू खात्यावर दीर्घ काळानंतर (Long run) होणारा परिणाम दाखवण्यासाठी, वार्षिक आकडे गृहीत धरून जे वक्र काढण्यात आला आहे.

अवमूल्यनाचा अल्पकाळानंतर (Short run) होणारा परिणाम दाखवण्यासाठी, तक्ता क्रमांक २ (Table 2) मध्ये, चालू खात्यावरील शेषाचे त्रैमासिक आकडे घेण्यात आले आहेत. तक्ता क्रमांक २ वरून आपण खालील निष्कर्ष काढू शकतो.

१) चालू खात्यावरील सर्वात अधिक तूट २००५

U.S.Million $ ही मार्च १९९१ साली व सर्वात कमी तूट ही मार्च ९७ साली (62 U.S. Million $) होती.

२) चालू खात्यावरील सर्वात अधिक, आधिक्य (Surplus) हा मार्च २००४ साली ७३५७ US $ Million व सर्वात कमी आधिक्य 78 U.S. $ Million हा मार्च ९३ साली होता.

३) जुलै १९९१ मध्ये अवमूल्यन केल्यानंतर पुढील सलग दोन तिमाहीत (Dec 1991 & March 1992) चालू खात्यावरील शेष आधिक्य होते म्हणजे ढोबळ मानाने अवमूल्यनामुळे तूट नाहीशी झाली असे म्हणता येईल.

तक्ता क्रमांक ३ (Table 3) मध्ये चालू खात्यावरील आधिक्याबाबत काही निकष दाखवण्यात आले आहेत.

तक्ता क्रमांक ३ वरून आपल्याला असे आढळून येते की-

१. आक्टो.९१ ते मार्च ९२ च्या दरम्यान सलग ६ महिने चालू खाते आधिक्य दाखवत होते.
२. आक्टो.२००० ते जून २००१च्या दरम्यान सलग ९ महिने चालू खाते आधिक्य दाखवत होते.
३. मुख्य म्हणजे आक्टो.२००१ ते मार्च २००३ म्हणजे सलग १८ महिने किंवा दीड वर्ष आपल्याला चालू खात्यावर आधिक्य ठेवणे शक्य झाले.
४. जुलै २००३ ते जून २००४ म्हणजे सलग १२ महिने आधिक्य ठेवणे शक्य झाले.
५. एकंदरीत ६० महिने आधिक्य ठेवणे शक्य झाले.

तक्ता क्रमांक २ वरील आकडे गृहीत धरून, पुन्हा जे वक्र (J curve) काढण्यात आला आहे. (पहा आकृती क्रमांक ३). थोडक्यात म्हणजे आकृती क्रमांक ३ वरील जे वक्र हा त्रैमासिक आकड्यांवर आधारित आहे. आकृती क्रमांक २ व ३ ची तुलना केल्यास, आकृती क्रमांक ३ वरील जे वक्र हा जास्त सयुंक्तिक वाटतो असे मानण्यास हरकत नाही. (A good fit of the J curve for the Indian case of currency devalvation.)

**समारोप** – या लेखाचा उद्देश भारताच्या संदर्भात जुलै १९९१ साली केलेले रूपयाचे अवमूल्यन व जे वक्र सिध्दांतकल्पना तपासण्याचा होता. त्यासाठी चालू खात्यावरील शेषाचे (वार्षिक व त्रैमासिक) आकडे (१९९०-९१ ते २००४-२००५) गृहीत धरून दोन प्रकारचे जे वक्र काढण्यात आले. दोन्ही वक्रांची तुलना केल्यास, त्रैमासिक आकड्यांवर काढलेला जे वक्र हा जास्त संयुक्तिक वाटतो.

सरतेशेवटी असे नमूद करावेसे वाटते की या लेखात अवमूल्यन हा एक घटक मानून त्याचा भारताच्या व्यवहार शेषावर/ चालू खात्यावर होणारा परिणाम दाखवण्यात आला. पण प्रत्यक्षात व्यवहार शेषावर/चालू खात्यावर इतका घटक सुध्दा परिणाम करत असतात. उदाहरणार्थ आयात-निर्यात, आयात-निर्यात वस्तूंची मागणी लवचिकता, विनिमय धोरण, औद्योगिक धोरण, व्यापार धोरण इत्यादी. ह्या इतर घटकांचा परिणाम तपासण्याची व सिध्द करण्याची (Prove statistically) गरज आहे.

## REFERENCES

1) Dhat D.G. (2007) - Appreciation of Rupee - A Note (In Marathi)- Arthasamvad Vol. 31 No. 3 Oct- 2007, pp. 271-276.

**2) Jhunjhunwala Bharat (2007) -** Appreciation of Rupee - A Welcome Move (In Marathi)-Daily Gomantak 21, Dec. 2007.

3) **Kulkarni B.D. & Dhamdhere S.V. (2007)** - International Economics (In Marathi) - Diamond Publications, Pune.

4) **Kulkarni Kishore (1994)** - J- curve hypothesis and Currency Devaluation : A Test of Kulkarni Hypothesis with Egypt & Ghana- in Readings in International Economics (Selected writings of Prof. Kishore Kulkarni) - Serial Publications, New Delhi.

5) **Kulkarni Kishore (1996)** - Balance of Payment changes and Exchange Rate Devaluation - A Case of India - Indian Journal of Economics Vol. LXXVI No. 303 April 1996 pp 415 - 425.

6) **Kulkarni Kishore (2004)** - Empirical evidence of J- Curve Hypothesis - in Readings in International Economics (Selected wrintings of prof. Kishore Kulkarni) - Serial Publications, New Delhi.

7) **Nadkarni Avadhoot (2007)** - Fiscal Deficit and Current Account Deficit : The twin Deficit Problem (In Marathi) - Shri V.V. Borkar Memorial Lecture - Arthasamvad Vol. 31 No. 2 July- Sep. 2007 pp 120-129.

8) **Salvatore Dominick** - International Economics - John Wiley & Sons Pvt. Ltd. Seventh Edition, 2001.

**तक्ता क्रं.१ भारताचा व्यवहारतोल (काही महत्वाचे आकडे)**

(वार्षिक आकडे सन १९९०-९१ ते २००४-०५)

| आर्थिक वर्ष | चालू खात्यावरील शेष (U.S. मिलियन डॉलर) | चा.खा.तू./स.दे.उ.* (टक्केवारी) | परकीय गंगाजळी (U.S. मिलियन डॉलर) | विनिमय दर (रूपये प्रति U.S.डॉलर) | आयात क्षमता (महिने) |
|---|---|---|---|---|---|
| 1990-91 | -9680 | -3.1 | 5834 | 19.64 | 2.5 |
| 1991-92 | -1178 | -0.3 | 9220 | 31.22 | 5.3 |
| 1992-93 | -3526 | -1.7 | 9832 | 31.23 | 4.9 |
| 1993-94 | -1158 | -0.4 | 19254 | 31.37 | 8.6 |
| 1994-95 | -3369 | -1.0 | 25186 | 31.49 | 8.4 |
| 1995-96 | -5910 | -1.7 | 21687 | 34.35 | 6.0 |
| 1996-97 | -4619 | -1.2 | 26423 | 35.91 | 6.5 |
| 1997-98 | -5500 | -1.4 | 29367 | 39.49 | 6.9 |
| 1998-99 | -4038 | -1.0 | 32490 | 42.43 | 8.2 |
| 1999-00 | -4698 | -1.0 | 38036 | 43.60 | 8.2 |
| 2000-01 | -2666 | -0.6 | 42281 | 46.64 | 8.8 |
| 2001-02 | 3400 | 0.7 | 54106 | 48.80 | 11.5 |
| 2002-03 | 6345 | 1.3 | 76100 | 47.50 | 14.2 |
| 2003-04 | 14083 | 2.3 | 112959 | 43.44 | 16.9 |
| 2004-05 | -5400 | -0.8 | 141514 | 43.75 | 14.3 |

Note :-चा.खा.तू - चालू खात्यावरील तूट/स.दे.उ. - सकल देशीय उत्पादन

आयात क्षमता (Import Cover)

Data for the year 2004-05 is provisional

स्त्रोत : RBI's Handbook of Statistics on the Indian Economy 2005-06

## तक्ता क्रं. २ भारताचा व्यवहारतोल (काही महत्वाचे आकडे)

(त्रैमासिक आकडे सन १९९०-९१ ते २००४-०५)

| अनु.क्र. | तिमाही | चालू खात्यावरील शेष (U.S. मिलियन डॉलर) | अनु.क्र. | तिमाही | चालू खात्यावरील शेष (U.S. मिलियन डॉलर) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Jun-90 | -1626 | 33 | Jun.-98 | -2133 |
| 2 | Sep-90 | -2208 | 34 | Sep.-98 | -1006 |
| 3 | Dec-90 | -2841 | 35 | Dec.98 | -1205 |
| 4 | Mar-91 | -3005 | 36 | Mar. 99 | 306 |
| 5 | Jun-91 | -1439 | 37 | Jun-99 | -1569 |
| 6 | Sep-91 | -1660 | 38 | Sep.-99 | -998 |
| 7 | Dec. 91 | 1666 | 39 | Dec.-99 | -971 |
| 8 | Mar-92 | 255 | 40 | Mar-00 | -1160 |
| 9 | Jun-92 | -1530 | 41 | Jun-00 | -2563 |
| 10 | Sep. 92 | -1331 | 42 | Sep.-00 | -1631 |
| 11 | Dec. 92 | -743 | 43 | Dec.-00 | 755 |
| 12 | Mar-93 | 78 | 44 | Mar.-01 | 773 |
| 13 | Jun-93 | -892 | 45 | June-01 | 1127 |
| 14 | Sep. 93 | -656 | 46 | Sep.-01 | -965 |
| 15 | Dec. 93 | -154 | 47 | Dec.01 | 475 |
| 16 | Mar-94 | 544 | 48 | Mar.-02 | 2763 |
| 17 | Jun-94 | -352 | 49 | June-02 | 1129 |
| 18 | Sep. 94 | -1050 | 50 | Sep.-02 | 1815 |
| 19 | Dec. 94 | -819 | 51 | Dec.-02 | 1354 |
| 20 | Mar-95 | -1148 | 52 | Mar.-03 | 2047 |
| 21 | Jun-95 | -1350 | 53 | June-03 | -422 |
| 22 | Sep. 95 | -2108 | 54 | Sep.03 | 3186 |
| 23 | Dec. 95 | -960 | 55 | Dec.03 | 3962 |
| 24 | Mar-96 | -1493 | 56 | March-04 | 7357 |
| 25 | Jun-96 | -2252 | 57 | June-04 | 3014 |
| 26 | Sep. 96 | -1023 | 58 | Sep.-04 | -3499 |
| 27 | Dec. 96 | -1282 | 59 | Dec.-04 | -5442 |
| 28 | Mar-97 | -62 | 60 | March-05 | 527 |
| 29 | Jun 97 | -1362 | | | |
| 30 | Sep. 97 | 179 | | | |
| 31 | Dec. 97 | -1758 | | | |
| 32 | Mar-98 | -2559 | | | |

स्त्रोत :- RBI's Handbook of Statistics on Indian Economy 2005-06.

### तक्ता क्रं.३ चालू खात्यावरील अधिक्य- काही पाहणी

| अनु.क्र. | कालावधी | चालू खात्यावरील अधिक्य |
|---|---|---|
| १. | ऑक्टो. ९१ ते मार्च ९२ | ६ महिने |
| २. | जाने. ९३ते मार्च ९३ | ३ महिने |
| ३. | जाने. ९४ ते मार्च ९४ | ३ महिने |
| ४. | जुलै ९७ ते सप्टें.९७ | ३ महिने |
| ५. | जाने. ९९ ते मार्च ९९ | ३ महिने |
| ६. | ऑक्टो.२००० ते जून ०१ | ९ महिने |
| ७. | ऑक्टो. ०१ ते मार्च ०३ | १८ महिने |
| ८. | जुलै ०३ ते जून ०४ | १२ महिने |
| ९. | जाने. ०५ते मार्च.०५ | ३ महिने |
| | एकूण | ६० महिने |

स्रोत : Author's observation.


# मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

## अर्थसंवाद

### जाहिरातीचे दर

| | | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|---|
| १) | समोरचे आतील पृष्ठ | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| २) | मागील पृष्ठ (आतील) | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| ३) | मागील शेवटचे पृष्ठ | रू.५,०००/- | रू.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर - डिझाईन - (1/5 = 150 X 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नांवे काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच तो अंक आपल्याला मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद, कळावे.

**आपले विश्वासू**

**अनिल बाबुराव सूर्यवंशी**

कार्यवाह-खजिनदार

गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,

शिवाजीनगर,बार्शी-४१३४११ जि.सोलापूर

फोन:(०२१८४)२२४२९४

भ्रमणध्वनी:९०११३३९९०६

Fig.2 - J- curve for India (Using Annual Data from 1990-91 to 2004-05)





Fig.3 - J- curve for India (Using quarterly Data from 1990-91 to 2004-05)



# अर्थ शब्दांची वाट पाहे

## शि.ना. माने

**Sub-prime lending :**

अमेरिकेच्या संघीय निधी पध्दतीचे (येथून पुढे फेड) हे एक नवे परंतु अवैध(illegitimate) अपत्य आहे. सकृद्दर्शनी धूसर वाटणाऱ्या संज्ञेचा मराठी पर्याय घडविण्याच्या दृष्टिकोनातून पुढील परिच्छेदांत तिचे स्वरूप संक्षेपात स्पष्ट केले आहे.

२००१ मध्ये अमेरिकेतील तेजीचा फुगा फुटला. लगेच फेडने निधी दरात (अल्पमुदती नाणेबाजारातील व्याज दरात) कपात करण्याची तत्परता दाखविली. ती आजपर्यंत (१८ मार्च ०८) न चुकता चालू ठेवली. १९२९ नंतरच्या मंदीविषयी अर्थशास्त्रज्ञांनी विरोधी मते नोंदली आहेत. त्या मंदीचे स्वागत करताना तत्कालीन वित्तमंत्री अँड्र्यू मेलन म्हणाले, ''ती सडलेल्या (अर्थ) व्यवस्थेचे विशुध्दीकरण करील'' ते पुढे म्हणाले की, मंदीचे विरेचक अटळपणे सहन करावयालाच हवे. परंतु 'धोकादायक ढोंगीपणा' या शब्दात मुख्य प्रवाहपतित अर्थशास्त्रज्ञांनी त्या पाखंडी मताचे खंडन केले. सप्टेंबर २००७ ते १८ मार्च २००८ या काळात ५.२५ टक्क्यावरून २.२५ टक्क्यापर्यंत फेड दरात सहा कपाती करून प्रशासनाने दुसऱ्या मताचे समर्थन केले.

१९२९ नंतरची मंदी व तिच्याविषयीची परस्परविरोधी मते यांचा सुरूवातीलाच उल्लेख करण्याचे एक कारण आहे. ते असे की फेड दरातील निरंतर कपातीच्या धोरणाचा आपध्दर्म म्हणून स्वीकार करण्यात आला आहे. परिणामी पुढील प्रश्न निर्माण होतो. २००१ मध्ये कृत्रिम तेजीचा सीमांत फुगा फुटल्यामुळे फेड दरातील सरसकट कपातीमुळे (sub-prime lending)सौम्य चलनवृध्दीकडून (reflation) पुरूत्थानाकडे (recovery) जाण्यासाठी आता किमान एक तरी फुगा शिल्लक नको काय? उलट फेड दरातील कपातीच्या

हव्यासामुळे बचतातिरेक (savings glut), सौम्य मंदी (recession) व अखेरीस बेकारी यांचा धोका संभवतो. नव्हे, आज अमेरिकेत खाजगी क्षेत्रात नोकरकपात अटळ ठरू लागली आहे. म्हणूनच महापुराविरूध्द 'वाळूच्या पोत्यांची संरक्षक भिंत दृष्टिकोन' (sandbag approach) या शब्दात दि इकनॉमिस्टने (मार्च २२-२८, २००८) फेड दरातील कपातीच्या धोरणाचा (पर्यायाने सब-प्राइम लेंडिंगचा) समाचार घेतला आहे. परंतु एक इष्टापत्ति म्हणून या धोरणाचा आसरा करण्याशिवाय फेडपुढे आज तरी दुसरा पर्याय नाही. उत्पादन, प्रक्रिया व विपणि यांच्या स्वरूपातील नवप्रवर्तन (innovation) हा एक चांगला व आश्वासक पर्याय आहे. परंतु ती दीर्घकालीन प्रक्रिया आहे. अशा प्रकारे पतपैशाच्या दुर्भिक्ष्यावरील (credit crunch) सब-प्राइम लेंडिंगच्या या नवीन मात्रेवर मर्यादा पडतात. आता त्यांच्याविषयी दोन शब्द.

किंमतस्थैर्य हे देशाच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख कार्य आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभव निराळा आहे. जमीन, घरदार, शेअर इत्यादी मत्तांचे किंमतस्थैर्य प्राप्त झाल्याशिवाय सर्वसाधारण किंमतस्थैर्य अपूर्ण आहे. त्यासाठी मध्यवर्ती बँकांना आजच्यापेक्षा जास्त स्वातंत्र्य हवे. म्हणजेच राजकीय जनादेश (political mandate) हवा. परंतु राजकीय दृष्टिकोनातून ते परवडणारे नाही, असा आजवरचा अनुभव आहे. स्पष्ट शब्दात सांगावयाचे झाल्यास, येथे राजकारण्यांचा पाखंडीपणा किंवा थोतांड (heresy) आडवा येतो आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, तो पाखंडीपणा किंवा ते थोतांड सांकेतिक शहाणपणाच्या (conventional wisdom)'ब्रँडनेम' खाली सरसकट विकला जातो (म्हणजे खपवून घेतला जातो.) भारतीय संदर्भातील उदाहरणे म्हणून अवांछनीय अर्थसहाय्ये, उच्च शिक्षणसंस्थांतील जातिस्थित/वर्गस्थित आरक्षण, समस्तर क्रीडांगण सिध्दांत (level- playing field doctrine) शेतकऱ्यांची कर्जमाफी इत्यादींचा उल्लेख करता येईल.

आतापर्यंतच्या स्पष्टीकरणाच्या आधारे केवळ कारणाच्या तारणाचा आसरा करून 'प्रस्थापित नियमांना दुय्यम लेखणारा बेबंद कर्जपुरवठा' हा पर्याय सुचवू इच्छितो. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या डायमंड अर्थशास्त्रकोशात (२००८)' सब प्राइम लेंडिंग' हा मराठी पर्याय नोंदला आहे. त्यात शब्दांच्या पलीकडील ध्वनित अर्थबोध क्वचितच सुव्यक्त (explicit) होतो.

**Agflation :**

अडॅम स्मिथ (१७७६) यांच्यापासून आजपर्यंत (२००७) संपत्ती व कल्याण (कुशल, क्षेम, सुस्थिती इ.) यांच्याविषयी अर्थशास्त्रज्ञांनी विचार मांडले. स्मिथ यांनी अमेरिकेचा शोध घेणारे स्पॅनिश लोक (सुवर्ण व चांदी यांसारख्या वस्तू) व १३ व्या शतकातील चंगीझखानाचे वंशज (पशुधन) यांचे कालानुरूप दाखले देवून फरक स्पष्ट केला. त्यानंतर जवळपास चार दशकांपूर्वी सॅम्युअल्सन यांनी राष्ट्रीय उत्पन्नाविषयी भाष्य करताना असे म्हटले आहे की व्यक्ती केवळ भाकरीवर जगू शकत नाही व राष्ट्र केवळ राष्ट्रीय उत्पन्नावर जगू शकत नाही. त्यांच्या पुढे जावून ते म्हणतात की त्यासाठी 'निव्वळ आर्थिक कुशलाचीही' (Net Economic Welfrare)

गरज असते. त्यानंतर अमर्त्य सेन (१९९९) यांनी मानवरूपी विकास व स्वातंत्र्य यांच्यावर जोर देवून म्हटले की सीमित व बैजिक घटकांत बंदिस्त आर्थिक वृध्दी पेक्षा विकास ही संकल्पना जास्त विशाल व समावेशक आहे. आज स्थूल आंतर्देशीय उत्पादित (जी.डी.पी.) या पारंपारिक संकल्पनेची फेरमांडणी करताना जोनायन हॅस्केल (२००७) यांच्या उपहासगर्भ अभिप्रायाचा उल्लेख केल्याशिवाय हे प्रास्ताविक पूर्ण होवू शकत नाही. ते म्हणतात, "टनातील अधिकची गुंतवणूक जी.डी.पी. त ढीगांनी भर टाकते."

आज 'वीट व चुना अर्थव्यवस्थेवर' (brick and mortar economy) अतिरिक्त भिस्त ठेवणाऱ्या अमेरिकी अर्थव्यवस्थेत व पर्यायाने चीन व भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थांत एका नव्या आर्थिक घटिताचा (Phenomenon) उदय झाला आणि यथावकाश त्याचे पडसाद अन्य देशांतही उमटणार आहेत. 'ॲगफ्लेशन' या इंग्रजी संज्ञेने ते ओळखले जाते. माझ्या माहितीप्रमाणे या संज्ञेचा प्रथम आविष्कार डिसेंबर ८-१४, २००७ द इकनॉमिस्टच्या अग्रलेखात ('द एंड ऑफ चीप फूड') व त्याच अंकातील त्याच्याशी संबंधित स्वतंत्र विश्लेषणात ('चीप नो मोअर') करण्यात आला. ती कोणी व कधी विकसित केली याची अधिप्रमाण माहिती आजमितीस मला उपलब्ध झाली नाही. प्रथम या संज्ञेचा ('चीप नो मोअर') विश्लेषणातील प्राथमिक अर्थ पाहू. द इंटरनॅशनल ग्रेन्स कौन्सिल, लंडन या संस्थेच्या खाद्यान्न पिकांच्या अंदाजाचा हवाला देवून विश्लेषण म्हणते. "....ॲगफ्लेशनच्या वर्तमान लाटेचे जास्तीत जास्त उल्लेखनीय वैशिष्ट्य असे आहे की खाद्यान्नांच्या विक्रमी किंमती त्यांच्या दुर्मिळतेच्या काळात नव्हे तर त्यांच्या विपुलतेच्या काळात प्राप्त केल्या जातात" मे २००० मध्ये गव्हाची जागतिक किंमत प्रतिटन २०० डॉलर होती. सप्टेंबर २००० च्या सुरूवातीला ती प्रतिटन ४०० डॉलरपर्यंत वाढली.

या व्याख्येतून स्पष्ट होणाऱ्या या संज्ञेच्या पुढील काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करणे जरूर आहे.

१. खाद्यान्नांच्या किंमतीतील वाढ त्यांच्या दुर्मिळतेऐवजी विपुलतेमुळे शक्य झाली. मागणी पुरवठा सिध्दांताला ही गोष्ट विसंवादी आहे. त्याचे कारण काय?

२. या प्रश्नांचे स्पष्टीकरण व संज्ञेचे दुसरे वैशिष्ट्य असे की विशेषत: नवश्रीमंत मध्यमवर्गातील ग्राहकांच्या उत्पन्नातील वाढ खाद्यान्नांच्या किंमतीतील वाढीपेक्षा जास्त जलद असते.

३. मांसाची व खाद्यान्नांची मागणी यांच्यातील सहसंबंधाचे परिमाणीकरणही करण्यात आले आहे. आज चीन व अमेरिकेत १ कि. पशुधनाच्या मांसासाठी सरासरी ८ कि. खाद्यान्नाची गरज असते. १९८५ मध्ये चीनी ग्राहक वार्षिक सरासरी २० कि. पशुधनाच्या मांसाचे सेवन करत होता. आज तो ५० कि. मांसाचे सेवन करतो. दुसऱ्या विकसनशील देशांत १९८० पासून खाद्यान्नांची सरासरी मागणी जवळपास समस्तरीय (flat) पातळीवर स्थिर आहे. परंतु मांसाची मागणी दोनपट वाढली आहे. तथाकथित आर्थिक वृध्दी व मांसाची मागणी यांच्यात देशनिहाय निश्चित असा सहसंबंध दिसतो. म्हणजे आर्थिक वृध्दी

व मांसाची वाढती मागणी चीन व भारतासारख्या देशांतील नवश्रीमंतांची खाद्यान्नांची मागणी प्रज्वलित करणार आहे.

विशेषत: मागील वर्षापासून भारतात ज्वारीच्या बाबतीत तसा अनुभव येत आहे. गरीबांचे अन्न असलेल्या ज्वारीकडे नगदी पिक व आहाराच्या दृष्टिकोनातून एक पौष्टिक (nutrient) अन्न म्हणून पाहिले जावू लागले. आणि एका वर्षात तिची किंमत प्रति किंटल दीडपटीने वाढून तिने सरासरी रू. १९०० चा विक्रम निर्माण केला.

४. खाद्यान्नांच्या किंमतवृध्दीशी अप्रत्यक्षपणे संबंधित आहे. अमेरिकी प्रशासनाचे इथेनॉल उत्पादनाचे धोरण. खनिज तेलाचे मर्यादित साठे, त्याच्या किंमतीतील अतिरिक्त वाढ व प्रदूषण यांना एक चांगला पर्याय म्हणून चारचाकी वाहनांसाठी इथेनॉलचा वाढता वापर अटळ ठरू लागला. २००० मध्ये १५ दशलक्ष टन मक्याचा इथेनॉलसाठी वापर करण्यात आला. आज त्यात ८५ दशलक्ष टनांपर्यंत वाढ झाली आहे. अमेरिका क्र. एकचा मका निर्यातदार देश आहे. म्हणजे हळूहळू ती निर्यात घटल्यामुळे मक्याच्या आयातदार देशांत मक्याचा पुरवठा घटणार आणि मक्याबरोबर मक्याच्या पर्यायी अन्नांच्या किंमती वाढणार.

५. पूर्वी खाद्यान्नांच्या किंमती हेतुत: मंदीयुक्त पातळीवर नियंत्रित करण्यात आल्या. त्यासाठी उत्पादन अर्थसहाय्यांचा बेछूटपणे वापर करण्यात आला. आज जागतिक पातळीवर खाद्यान्नांच्या किंमत वृध्दीच्या परिस्थितीत नागरी व ग्रामीण गरीब ग्राहकांच्या खाद्यान्न सेवनासाठी अर्थसहाय्य देण्याची गरज निर्माण झाली आहे. दुसऱ्या शब्दात, खाद्यान्न उत्पादन अर्थसहाय्याकडून सेवन अर्थसहाय्या कडील धोरणात्मक संक्रमण अटळ ठरत आहे.

६. २००७-०८ मधील खाद्यान्न किंमतवृध्दीच्या प्रक्रियेच्या अखेरच्या व भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या वैशिष्ट्याला फसवे पुनरूत्थान (phoney recovery) म्हटले तर ते चूक ठरू नये. २००७ मधील मॅकिंझी अहवालात (The Bird of the Gold : the Rise of India's consumer market) या संदर्भात संभवनीय आर्थिक प्रस्फोटाचा गर्भीत इशारा देण्यात आला आहे.

आता आपण 'ॲगफ्लेशन'च्या अर्थाकडे वळू. agflation ही संज्ञा 'ag' आणि 'flation' या शब्दांच्या संयोगीकरणातून विकसित झाली आहे. जसे रासायनिक व सेंद्रीय खतांच्या मिश्रणाला 'रासेंद्रीय' हा आटोपशीर पर्याय रूढ झाला आहे. flation चा विस्तार, वृध्दी किंवा फुगवटा हे अर्थ आपण जाणतो. एखाद्या शब्दाच्या सुरूवातीला येणारा व पुढील शब्दाला जोडणारा उपसर्ग असे ag शब्दाचे स्वरूप आहे. अशा प्रकारे तयार होणाऱ्या जोडशब्दांचे विविध अर्थ संभवतात. द न्यू ऑक्सफर्ड डिक्शनरी ऑफ इंग्लीश (१९९८) व द न्यू शॉर्टर ऑक्सफर्ड इंग्लीश डिक्शनरी (१९९३) मध्ये तीन अर्थ देण्यात आले आहेत.

१. संताप, दु:ख, समाधान, इत्यादी भावनिक छटा व्यक्त करण्याचे साधन उदाहरणार्थ agman.
२. जे उत्पादक नाही ते (not productive)
३. कृषी व कृषिविषयक साठी संक्षेप किंवा लघुरूप.

सदरच्या संज्ञेची सुरूवातीची ६ वैशिष्ट्ये विचारात घेवून वरील तीनपैकी तिसरा अर्थ समुचित ठरतो. कृषित उत्पादित खाद्यान्नांच्या किंमतीतील वृध्दी

किंवा अतिवृध्दी असे ॲगफ्लेशनचे अनपड (crude) व गद्यप्राय भाषांतर करता येईल. परंतु भाषांतर म्हणजे आटोपशीर परिभाषा नव्हे. म्हणून कृधान्य किंमत वृध्दी आटोपशीर पारिभाषिक पर्याय सुचविला आहे.

**सुतोवाच संकटाचे :**

अखेरीस कृधान्य किंमतवृध्दी या मराठी पर्यायापलीकडील कृधान्य किंमतवृध्दीच्या प्रक्रियेविषयी एक आशंका. विशेषत: उपरोक्त वैशिष्ट्ये क्र. एक, पाच व सहा एक भयसूचना देतात. खाद्यान्नांच्या किंमतीतील वृध्दी/अतिवृध्दी मागणीप्रेरित नसून ती 'नवश्रीमंत' मध्यमवर्गाच्या उत्पन्न -प्रज्वलित मागणीमुळे (income-spoked demand)निर्माण झाली आहे. आणि भारतीय मध्यमवर्ग 'नवप्रवर्तनशील' असण्यापेक्षा 'जुळवून घेणारा' आहे. परिणामी उपलब्ध साधनसामग्रीचा वापर व किंमतीतील बदल यांच्यातील सहसंबंधाचे आतापर्यंत विरूपण झालेच आहे. भविष्यात त्याच्या खराबीकरणाचे संकट संभवते. अर्थात, हा एक स्वतंत्र विषय आहे. संभवनीय संकटाचे सूतोवाच करून ही चर्चा आटोपतो.

References :-

1. Bagchi Subroto, "Our middle class is adaptive, not innovative", quoted in the Economist (Entrepreneurial push'),Dec. 15-21, 2007, P.62

2. Haskel Jonathan with Marano and Wallis, 'What Happened to the knowledge Economy?', quoted in the Economist ('GDP redefined) August 4-10, 2007, P.50.

3. Mckinsey Report (2007), The Bird of Gold : the rise of India's Consumer market excerpts in the Economist ('the coming boom'), May 5-11,2007 P.30

4. Samuelson P.A. Economics, (9th Ed.), McGraw Hill Kogakusha, 1973 P. 179.

5. Sen Amartya, Development as freedom, oxford university press, 1999.

6. Smith Adam, An Inquiry into the Nature and Causes of the Wealth of Nations (Great Books of the Western World) Editor William Bentom 1975, P. 182.

7. The Economist (Leader : 'The end of cheap food' Dec. 8 - 14, 2007, PP11- 12.

8. Ibid . 'Cheap no more' PP 81-83.

ग्रंथ परीक्षण

# भारताचा भविष्यवेध नव्या अर्थनीतीचा शोध -बोध

## लेखक : प्रभाकर रघुनाथ जोशी

मौज प्रकाशनगृह मुंबई २००७ पृ.२१+१८२ किंमत रू.१६०.

**सौ.जयश्री उपाध्ये,**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,

आबेदा इनामदार सिनियर कॉलेज आर्टस सायन्स अॅण्ड कॉमर्स,पुणे.

गेल्या अर्धशतकातील वाटचालीच्या पार्श्वभूमीवर भारताला आता आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. '२१ व्या शतकात भारत एक महासत्ता बनेल' असे भाकीत वर्तवले जात आहे. त्या अनुषंगाने भारतात व भारताबाहेरही भारताच्या या लक्षणीय प्रगतीबाबत खूपच उत्सुकता आहे. उदारीकरण व खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारून भारताने जागतिकीकरणाकडे केलेली वाटचाल हेच या प्रगतीच्या वाटचालीचे गमक आहे हे आता सर्व सामान्यांनाही समजले आहे.

आज अगदी साध्या साध्या उद्योगांपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेवा, उद्योग इ. बाबत बोलताना उदारीकरण, खाजगीकरण यांचा काहीना काही संदर्भ असतोच. आज या प्रक्रियेला वेग आला आहे तो मुख्यत: संपर्क-विज्ञानातील क्रांती व मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रचंड रेट्यामुळे आणि याच रेट्यामुळे जगातील सर्वच राष्ट्रांना, अगदी त्यांची वैचारिक बैठक कशीही असली तरी 'खाउजा' धोरण स्वीकारावे लागत आहे. या प्रक्रियेत पुन्हा आंतर्विरोध आहेतच. उदा. ग्लोबल व्हिलेज बरोबरच धर्म व जाती यांच्यासारख्या सीमीत, पारंपारिक चौकटीत नव्याने जखडून घेण्याचे प्रमाणही वाढत आहे. जागतिकीकरणाच्या नावाखाली देशात होणारे अनेक प्रकारचे बदल हे फायद्याचे की तोट्याचे ? इंडिया बर्निंग की शायनिंग ? सकृतदर्शनी तरी 'खाउजा' धोरण आर्थिक वाटले तरी अर्थकारण जीवनाच्या, समाजाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करीत असल्याने सगळे समाजजीवनच या बदलांमुळे

ढवळून निघाले आहे.

या पार्श्वभूमीवर भारताच्या प्रगतीपथाचा भविष्यवेध घेणारे हे पुस्तक आहे. पुस्तकाचे लेखक श्री. प्रभाकर रघुनाथ जोशी हे अर्थतज्ञ, सल्लागार व आर्थिक घडामोडींवरील भाष्यकार म्हणून ओळखले जातात. आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्था या विषयातील ते अग्रणी विशेषज्ञ आहेत. सदर पुस्तकात भविष्यवेध घेताना त्यांनी भारताची जी आर्थिक–सामाजिक कुंडली मांडली आहे ती ग्रहताऱ्यांच्या स्थानावरून नव्हे तर आपला समाजाप्रतीचा आचार विचार व व्यवहारच आपले भविष्य ठरविणार आहे या भूमिकेतूनच.

प्रस्तुत पुस्तकास श्री कुमार केतकरांची प्रस्तावना लाभली असून लेखकाने ज्या पार्श्वभूमीवर विषय मांडला आहे त्यातील ठळक मुद्यांवरील त्यांचे मार्मिक भाष्य वाचनीय, चिंतनीय आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीला 'जागतिक नकाशावर भारत' हे प्रकरण आहे. भारताचा भविष्यवेध घेताना आज आपण नक्की कुठे आहोत? कसे आहोत? हे पडताळणे अगदी सयुक्तिकच आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धा, नव्याने येणारी गुंतवूणक व त्याचे परिणाम, आर्थिक क्षेत्रातील भारताचा खडतर व आव्हानात्मक प्रवास, अर्थनीतीचे स्वरूप व रूपरेषा इ. अनेक बाजूंचा ऊहापोह करताना अर्थव्यवस्थेला मानवी चेहरा हवा या भूमिकेतून समाज मध्यवर्ती ठेवून जागतिक नकाशावरील भारताचा वेध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

मानवी विकासाचा दर्जा व अर्थयंत्रणेची स्पर्धात्मकता या दोन परिमाणांच्या साह्याने लेखकाने भारताची सद्यस्थिती आजमावण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील मानवी विकासाचे विवेचन करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिध्द अहवालांच्या संदर्भातून दिलेली आकडेवारी यामुळे मुद्दे ठळकपणे व्यक्त होतात. या विवेचनात भारतातील उत्पन्नापासून ते घरे, वीजपुरवठा इ. सर्व गरजांना स्पर्श करणारी आकडेवारी दिली आहे. भारतातील निरनिराळ्या विभागांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकताना पारंपारिक घटकांव्यतिरिक्त इतर अनेक पैलू 'डेव्हलपमेंट रडार्स' म्हणून चर्चिले आहेत. त्यात जेष्ठ नागरिकांची स्थितीगती, बालमजुरांची समस्या, अपंग जनतेची देखभाल, स्त्रियांवर होणारे अन्याय–अत्याचार इ. समाजजीवनाची गुणवत्ता दर्शविणाऱ्या बाबींच्या चर्चेतून लेखकाच्या सर्वसमावेशक विचारांचे दर्शन होते. आज भारताला उपलब्ध क्षमतांचा सुयोग्य वापर व वाढ, तसेच नुसतीच धोरणे आखण्यापेक्षा भ्रष्टाचार मुक्त पारदर्शी धोरणांच्या अंमलबजावणींची गरज याचे ओघवत्या भाषेत विवेचन केले आहे.

भविष्यात भारताची अर्थव्यवस्था कशी असेल? आपल्या आर्थिक प्रगतीचा वेग काय असेल? प्रगती सर्वांगीण असेल का? समाजातील सर्व स्तरांवर हे फायदे मिळतील का? या विषयी लेखकाने 'भारताचा भविष्यवेध' या दुसऱ्या प्रकरणात भविष्यातील भारताबद्दल विवचेन केले आहे. अंदाज व्यक्त करताना लेखकाने गृहितके, मर्यादा, अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता, अर्थव्यवस्थेची गतिमानता इ. बाबी विचारात घेऊन आकडेवारीसह अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. भारतात येऊ घातलेल्या सुबत्तेचे, समृध्दीचे अनेक संकेत मिळत असले तरी एका बाजूला

सुबत्ता व समृध्दी तर दुसरीकडे दारिद्र्य व बेरोजगारी हा असमतोल दूर झाल्याशिवाय भारताला सुबत्तेची फळे चाखता येणार नाहीत हे विदारक सत्य अधोरेखीत केले आहे. या विवेचनाला सैध्दांतिक, सांख्यिकी माहितीच्या बैठकीमुळे वजन प्राप्त झाले आहे.

लेखकाने अनेक आंतरराष्ट्रीय अहवालांचा दाखला दिला असला तरी या अहवालांचा मूळ उद्देश बाजारपेठेचा वेध हा असल्यास त्यातील अतिरंजक माहितीचा उपयोग करताना सावधगिरी बाळगायला हवी. सदर प्रकरणात भारताच्या आर्थिक प्रगतीबाबत दिलेल्या आकडेवारीत आयुष्य मर्यादेविषयी आकडेवारीत, २००१ ची आयुष्यमर्यादा ६४ वर्षेतर २०२० चा आयुष्य मर्यादेचा अंदाज ५९ वर्षे हे विसंगत वाटते. याच तक्त्यामधील 'शाळेतल्या नोंदी' या शीर्षकापुढे दिलेली माहिती नक्की काय व्यक्त करते याचा बोध होत नाही.

साठच्या दशकातील पहिल्या हरितक्रांतीची यशस्वीता नव्वदीच्या शेवटाला अपूरी वाटू लागली व भारताला दुसऱ्या हरितक्रांतीची गरज भासू लागली. ही दुसरी हरितक्रांती नव्या तंत्रज्ञानावर व इतर अनेक व्यावसायिक बाजूंचा विचार करणारी म्हणूनच अधिक व्यापक व सर्वसमावेशक ठरणारी आहे. यात नवे तंत्रज्ञान, त्याच्या वापरातील संभाव्य अडचणी, आंतरराष्ट्रीय मागणीतील गुणात्मक बदल, नवे विक्री तंत्र, जोडधंद्याची आखणी या सर्व ताण्या-बाण्यांत भारतीय शेतीची जागतिकीकरणाशी जोडली जाणारी नाळ याचे मार्मिक विवेचन 'दुसऱ्या हरितक्रांतीचे नियोजन' या तिसऱ्या प्रकरणात लेखकाने केले आहे. या संदर्भात भारतीय शेती व्यवसायात पाणी, गुंतवणूक, शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, निर्यात, सुनियोजनाची गरज इ. कळीच्या मुद्यांचा ऊहापोह केला आहे. शेतीच्या यशस्वीतेसाठी शेतीला जोडधंद्याची, शेतमाल प्रक्रिया उद्योगाची व त्यातून रोजगार निर्मिती घडविण्यासाठी सुयोग्य धोरण व त्याची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज विदीत केली आहे.

'भारत हे सेवाक्षेत्राचे जागतिक केंद्र तर चीन उत्पादनाचे' असे वर्णन अर्थविषयातील भाष्यकार करतात. भारताची गेल्या १/२ दशकातील घोडदौड इतकी लक्षणीय आहे की या घटनेकडे भारतच नव्हे तर सर्व जग उत्सुकतेने पहात आहे. दुसरीकडे चिनी ड्रॅगनने उद्योग क्षेत्रात केलेली प्रगती पाहून चिनला जागतिक पातळीवरचा उत्पादन प्रक्रिया राबविणारा कारखाना (work shop of world) म्हटले आहे. सेवाक्षेत्रात जरी भारत आघाडीवर असला तरी निव्वळ सेवाक्षेत्रावर भारताला निर्भर राहता येणार नाही हे लेखकाने 'उद्योग, उद्योजकता आणि स्पर्धात्मकता' या चौथ्या प्रकरणात सांगितले आहे. १९९० च्या दशकात कात टाकून भारतातील उद्योगक्षेत्राने मोठ्या उद्योगांची पुनर्रचना करत उभे केलेले उद्योगपर्व, सार्वजनिक क्षेत्रातील नवनवे प्रयोग यांचा ऊहापोह या प्रकरणात केला आहे. भारतातील सार्वजनिक उद्योगात घडणारे बदल, बदलणारी संरचना, लघुउद्योगांची गती आणि स्थिती, सेवा क्षेत्रातील कामगिरी, नियोजन यातून भारत सक्षम बनत आहे. भारतातील उद्योजकता व त्यांची स्पर्धात्मकता हा जरी जगभरात आकर्षणाचा भाग आहे तरी केवळ सेवा क्षेत्राच्या जोरावर भारत सक्षम बनणे

शक्य नाही. तर औद्योगिक आघाडीवर मुसंडी मारणे ही काळाची गरज आहे, हे लेखकाने आग्रहाने मांडले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून सकारात्मक भूमिकेतून भारताने जागतिक अर्थव्यवस्थेचा एक घटक म्हणून बजावलेली भूमिका व १९९० नंतर बदलत्या जागतिक परिस्थितीबरोबर घडवून आणलेला बदल याचा आढावा घेणाऱ्या 'भारतीय चलनाचे व्यवस्थापन' या पाचव्या प्रकरणात आर्थिक घडामोडिंवरील भाष्यकार म्हणून असलेले प्रभुत्व, विषय मांडणीच्या सहजतेतून दिसून येते. भारतातील परदेशी व्यवहार, परदेशी भांडवली गुंतवणूक, आशियाई/ लॅटीन अमेरिकन राष्ट्रांचा तौलनिक आढावा यांच्या विवेचनासह परिवर्तनीय रूपया संदर्भात पहिली व दुसरी तारापोर समितीचे अहवाल याच्या पार्श्वभूमीवर यथायोग्य चलन व्यवस्थापन यांचा ऊहापोह केला आहे. रूपयाच्या परिवर्तनीयते बाबत घाईने निर्णय घेता येणार नाही, असा इशारा लेखकाने प्रकरणाचे शेवटी दिला आहे. रूपयाची परिवर्तनीयता ही अंतिम टप्यात हाती घ्यायची सर्वोच्च सुधारणा आहे आणि भारतात सर्वच बाबतीत उदारीकरणाचा पाठपुरावा केल्याशिवाय भांडवली खात्यावरील चलनाच्या परिवर्तनीयतेचे धोरण यशस्वीपणे अमलात आणता येणार नाही हे कटू सत्य आहे.

१९८५ नंतर भारतीय बँक व्यवसायात एक नवीन पर्व सुरू झाले. बँका नवीन तंत्रज्ञानाचा वापर करू लागल्या. जरी बँक व्यवसाय आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला तरी भारतातील बँक व्यवसायात काही प्राथमिक स्वरूपाचे असमतोल आढळतातच.' आर्थिक प्रगतीसाठी सुसज्ज बँकिंग' या सहाव्या प्रकरणात लेखकाने भांडवल पुरवठा, बँकिंग यंत्रणा आणि वित्तव्यवहारावरील नियंत्रण याविषयी चर्चा केली आहे. २००५ मधील आपल्या वित्तमंत्र्यांच्या धोरणात्मक निवेदनाचा संदर्भ देऊन लेखक म्हणतात की, भारताच्या आधुनिकतेकडील वाटचालीत बँक सेवा फक्त २७ टक्के इतक्या अल्प लोकसंख्येला उपलब्ध असते, किमान २२ टक्के जनता (शेतकरी) खाजगी सावकारीवर अवलंबून असते म्हणजेच एकूण वित्तव्यवस्था फक्त ४९ टक्के लोकांपर्यंत पोचते. भारतातील सर्वात मोठी बँक (स्टेट बँक ऑफ इंडिया) जागतिक क्रमवारीत ८२ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे आधुनिकतेकडे वाटचाल करायची झाल्यास बँकिंग सेवेतील मागासलेपण दूर झाल्याशिवाय भारतीय बँकिंग क्षेत्र मोठी झेप घेऊ शकणार नाही. (पान ९७)

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणात लेखकाने बँकांची सध्याची रचना, बँकांची पुनर्रचना, भांडवल पर्याप्तता नियमावली, भारताच्या खास वित्त गरजा, त्यातून 'सोशल बँकिंगची' आजची गरज याविषयी चर्चा केली आहे. याच अनुषंगाने आर्थिक प्रगतीसाठी सुसज्ज बँकिंग, त्यासाठी सुचविलेला त्रिसूत्री कार्यक्रम याविषयीचे विवेचन मूळातून वाचावे असेच आहे.

विचार व्यासंगाच्या संस्कारातून लेखक जरी भांडवलशाहीच्या विरोधात आहेत असे लेखांवरून वाटत असले तरी कठोर कम्युनिस्ट विचारसरणीचे पुरस्कर्ते असावेत असेही वाटत नाही. म्हणूनच भविष्यातील भारताचे चित्र रेखाटन करताना नियोजन हा भविष्यवेधाच्या त्यांच्या निवेदनातील कळीचा मुद्दा आहे. सातवे प्रकरण

'नियोजन प्रक्रियेचे विकेंद्रीकरण' हे त्याच्याशीच निगडीत आहे.

लेखक असे म्हणतात की, नियोजन प्रक्रियेचे विकेंद्रीकरण आणि तत्सम गुणात्मक बाकी भारताच्या विकासकार्यात दुर्लक्षित राहिल्या आहेत. स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आणि सहकार्य, आर्थिक साक्षरता निर्माण करण्याचे खास प्रयत्न, 'सोशल ऑडिट' ही संकल्पना राबवून पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आणि या सर्व प्रयत्नातून साध्य होणारा 'समाजाच्या सहभागाने विकास' (Participatory Growth) या त्या बाबी होत. त्यांचा गांभीर्याने विचार केल्याखेरीज भारतातील नियोजन पूर्णार्थाने यशस्वी होणार नाही. (पान १११)

भारताच्या नव्या अर्थनीतीचा शोध घेताना भारताचा नजीकचा प्रतिस्पर्धी चीन या देशाच्या आर्थिक प्रगतीचा व सामाजिक बदलांचा लेखाजोखा 'चिनी मातीची किमया'या आठव्या प्रकरणात घेतला आहे. सदर प्रकरणात लेखकाने चिनी शेती, उद्योग विशेष आर्थिक क्षेत्राचा यशस्वी प्रयोग, प्रशासन, जागतिकीकरणाचा चिनी मार्ग, तेथील सामाजिक समस्या यांचा आढावा घेतला आहे. चीन व भारत यातील तुलनात्मक विवेचन गांभीर्याने विचार करायला लावणारे आहे. चीनमध्ये सामाजिक सहभागाने विकास साध्य झाला. तसे भारतात घडले नाही. चीनला ते जमले ते भारताला जेव्हा जमेल तो सुदिन असेच म्हणावे लागेल. 'चिनी मातीची किमया' हे प्रकरण सदर पुस्तकात घालून लेखकाने भारताला किती मोठा पल्ला गाठायचा आहे याचा धावता आढावा घेतला आहे.

पुस्तकातील वरील आठही प्रकरणात भारतीय अर्थव्यवस्थेचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार केल्यावर लेखकाला अपेक्षित असलेल्या नव्या अर्थनीतीचे स्वरूप व रूपरेषा सांगणारे नववे प्रकरण आहे 'नव्या अर्थनीतीचा शोध-बोध'. आपले भविष्य आपणच घडवायचे असेल तर नवी अर्थनीती शोधायला हवी, अर्थव्यवस्थेला मानवी चेहरा हवा या संदर्भातील लेखकाच्या मनातील रूपरेषा व्यक्त करणारे हे प्रकरण आहे.

लेखक असे म्हणतात की शेजारच्या आशियायी व दूरच्या पाश्चिमात्य देशांना जे जमले ते आपल्याला जमवायचे असेल तर आत्मपरीक्षण करायला हवे, त्रुटी शोधायला हव्यात, भूतकाळाचा जमाखर्च मांडायला हवा. 'सोशल ऑडीटच्या' माध्यमातून नियोजनाचा लेखाजोखा व्हायला हवा. या प्रकरणात त्यांनी नियोजनाची पूर्वतयारी, भारताकरता मानवी चेहरा असणारी अर्थनीती, उदारमतवादी धोरणे, संस्थात्मक जाळे, सार्वजनिक कारभार पध्दत, नियोजन मंडळाचे नेमके प्रयोजन इ. मुद्यांवर चर्चा करताना 'नव्या अर्थनीतीचा शोध-बोध' हे नियोजन मंडळापुढील मोठे आव्हान असल्याचे मान्य केले आहे. या प्रकरणाला जोडूनच अकरावी पंचवार्षिक योजना : नियोजन मंडळाचा दृष्टिकोन हे परिशिष्ट जोडून औचित्य साधले आहे.

नव्या आर्थिक धोरणांमुळे अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले आहे व बदलत आहे. बदलत्या परिस्थितीत सर्वांनीच जागरूक राहणे गरजेचे आहे. जागरूकतेला, सजगतेला आर्थिक साक्षरतेची जोड असली तर समाजाकडून परिणामकारक कृती घडू शकेल. अर्थशास्त्रातील कीचकट संकल्पना व

अर्थव्यवस्थेतील घडणाऱ्या बदलांची पार्श्वभूमी सर्वसामान्य मराठी वाचकांना, काही अंशी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना मातृभाषेत सोपेपणाने सांगण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे व तो मराठी वाचकांना आवडावा असाच आहे. जागतिक घडामोडी आपल्यालाही समजाव्या ही सर्व - सामान्यांची अपेक्षा असते ती या पुस्तकाकडून पूर्ण व्हावी. अर्थव्यवस्थेचा मानवी चेहरा व सोशल ऑडिट या संकल्पना निश्चितच सर्वसामान्यांना आवडतील. त्यासाठी या पुस्तकाचे वाचनच नव्हे तर मननही होणे आवश्यक आहे.

---

# अर्थसंवादच्या लेखकांना आवाहन

अर्थसंवादसाठी लेखन करणाऱ्या लेखकांनी आपले लेखन पूर्वमुद्रित नाही, त्यामध्ये कॉपीराईटचा भंग झालेला नाही व संदर्भाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख झाला आहे. या अर्थाच्या विधानाचा आपल्या पत्रामध्ये उल्लेख करावा. लेखकांनी आपल्या शोध निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत. निबंधामध्ये वापरल्या जाणाऱ्या तक्त्यांचे शीर्षक मराठीतूनच असावे. निबंधातील आकडेवारी, संदर्भ सूचक, सुस्पष्ट, परिपूर्ण व मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे. निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.

लेखकांनी आपला शोध निबंध श्री लिपी - देवरत्न ६.० मध्ये तयार करून निबंधाच्या दोन हार्ड कॉपीज व एक सॉफ्ट कॉपी (सी.डी.) पाठवावी. अशा स्वरूपात निबंध न पाठविल्यास तो स्वीकारणे अडचणीचे ठरेल. विषयाचा तात्कालिक संदर्भ, आवश्यक ती सैध्दांतिक मांडणी, अद्यावत सांख्यिकी विश्लेषणातील शास्त्रशुध्दता, भाषाशैली व नेमके संदर्भ या गोष्टींची दखल घेऊन अर्थसंवादमध्ये लेखन छापण्यासंबंधी निर्णय घेतला जाईल. लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य असणे आवश्यक आहे.लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळवावा.अर्थसंवादच्या संबंधात आपल्या मदतीची अपेक्षा आहे. आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल.

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**बत्तिसावे वार्षिक अधिवेशन**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बत्तिसावे वार्षिक अधिवेशन दि.७ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २००८ या दरम्यान भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव जि. सांगली येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहितीपत्रक पाठविण्यात येईल. प्रतिनिधी शुल्क रूपये सहाशे पन्नास (६५०) असून ते मनीऑर्डर/डिमांड ड्राफ्टने "मराठी अर्थशास्त्र परिषद ,बत्तिसावे अधिवेशन, कडेगांव" या नावाने स्थानिक कार्यवाहाकडे पाठवावे. नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांसाठी आपली सदस्यत्वाची वर्गणी (वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रू. ३०० किंवा आजीव सदस्य वर्गणी रू. १५००/-) अधिवेशनाच्या ठिकाणी घेण्याची सोय करण्यात आली आहे. अशी वर्गणी कार्यवाह - खजिनदाराच्या पत्त्यावर देखील पाठविता येईल. या रकमेची रीतसर पावती संबंधितांकडे कार्यालयाकडून पाठविली जाईल.

**परिषदेतील (चौथ्या चर्चासत्रासाठी)**

आयत्या वेळेचा विषय खालीलप्रमाणे राहील.

**"सहकारी पतव्यवस्थेची फेररचना"**

या विषयावर शोध निबंध मागविले जात नाहीत.

**अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशीलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**

**आत्माराम पोळ**

(स्थानिक कार्यवाह)

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगांव**

जि.सांगली. दूरध्वनी ०२३४७-२४२२१८ भ्रमणध्वनी - ९९२१८७२४८०

**अनिल सूर्यवंशी**

कार्यवाह-खजिनदार

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये.त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए.पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील संख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पध्दतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल, निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा (३०० शब्द)

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# बत्तिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बत्तिसावे वार्षिक अधिवेशन मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव जि.सांगली येथे दि. ७, ८ व ९ नोव्हेंबर २००८ या काळात होणार आहे. विनायक भिसे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चा सत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दांतिक विवेचन

२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – स्वरूप, उपयुक्तता आणि भवितव्य

३) सन १९९० नंतरचे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप

या विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद' जाने–मार्च २००८ च्या अंकात देण्यात आली आहे.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दात विषय मांडावयाचा असून ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध श्री लिपी देवरत्न ६.० मध्ये तयार करून त्याची सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांच्याकडे पाठवाव्यात.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले किंवा प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकानी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

३० सप्टेंबर, २००८ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**विनायक भिसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद ४३१००२
दूरध्वनी : (०२४०) २३७२२३८
भ्रमणध्वनी : ९९७०६२८९४३.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह–खजिनदार

## अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (फॉर्म ४,नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी<br>गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी- ४१३४११ जि. सोलापूर |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. मुद्राकाचे नांव | : | अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी ४१३४११<br>जि. सोलापूर |
| ४. मुद्रणस्थळ | : | प्रतिमा मुद्रणालय ब्राह्मणपुरी, इस्लामपूर. |
| ५. प्रकाशनाचे नांव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नांव | : | जगन्नाथ शामराव पाटील |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय. |
| पत्ता | : | शांती प्लाझा, बी-९, ८८०/८८१,<br>शनिवार पेठ, सातारा ४१५ ००२. |
| ८. मालकाचे नांव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर<br>दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट ६, ब्लॉक एफ,<br>कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत<br>इमारत क्र. ३२३ समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई- ४०००५१ |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**अनिल सूर्यवंशी**
मुद्रक व प्रकाशक